नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका



चित्र : प्रा. विजय रूद्रकार श्री ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय, नवरगाव, जि. चंद्रपूर

युगवाणी

अनुक्रमणिका

युगवाणी

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषयः सारस्वतीजन्मभूः ॥
मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

वर्ष : ६२ वे / अंक : पहिला

एप्रिल-मे-जून २०१२

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

एप्रिल-मे-जून २०१२

संपादक
प्रा. अजय देशपांडे

मुखपृष्ठ व मलपृष्ठ :
श्री ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपूर येथील
संग्रहातील शिल्पाचे छायाचित्र. - प्राचार्य सदानंद बोरकर यांचे सौजन्याने.

आतील रंगीत चित्रे :
प्रा. विजय रूद्रकार
श्वेता पोईनकर
श्री ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपूर

रेखाटने :
प्राचार्य सदानंद बोरकर
श्री ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपूर
अमानिक

अक्षरजुळवणी व मुद्रण :
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर,वणी,जि.यवतमाळ

मूल्य : चाळीस रूपये

वार्षिक वर्गणी : १५० रूपये

प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७


वर्गणी व अंकासंबंधी चौकशीकरिता दूरध्वनी : ०७१२-२५४००१४

संपादकीय पत्रव्यवहार
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,
वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी : ९८५०५९३०३०
ई-मेल : srushti_ajay@rediffmail.com, yugwanivss@rediffmail.com

या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनातील मतांशी संपादक आणि
विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

अनुक्रमणिका


हे सरता संपत नाही
चांदणे तुझ्या स्मरणाचे....




ग्रेस,
यांना भावपूर्ण आदरांजली.

अनुक्रमणिका

अ । नु । क्र । म



युगवाणी
विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन त्रैमासिक



संपादकीय...

महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात वेळोवेळी अनेक महत्त्वाच्या भूमिका पार पाडणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. राजकारणी असणारे यशवंतराव आणि साहित्यिक असणारे यशवंतराव ही एकाच व्यक्तिमत्त्वाची दोन भिन्न आणि परस्पर समांतर अशी रूपे होती. यशवंतराव चोखंदळ वाचक आणि सजग लेखक होते. त्यांच्या लेखनाचे मूल्यमापन त्यांच्या राजकीय जीवनाच्या यशापयशाच्या आधारांनी आणि आयामांनी करणे गैर आहे. यशवंतरावांनी आपल्या मायबोली मराठीवर मनापासून प्रेम केले. ते उत्तम आस्वादक होते, साक्षेपी समीक्षक होते. "वाङ्मयीन संस्कारांचे पाथेय जन्मभर कृतज्ञतापूर्वक मिरवणारे, उत्कटतेने अनुभव घेऊन तितक्याच प्रत्ययकारी शैलीत ते शब्दबद्ध करणारे, भाषेवर मनापासून प्रेम करणारे आणि साहित्याविषयी चोखंदळ जाणकारी बाळगणारे यशवंतराव राजकीय पूर्वग्रहांमुळे वा मतभेदांमुळे दुर्लक्षिले जाता कामा नयेत. एक राजकारणी, मुत्सदी, संसदपटू, कार्यक्षम मंत्री व पक्षनेते हा त्यांचा 'राजकीय' लौकिक जगभर झालेला आहे. मराठी माणसाला त्याचा अभिमानही आहे, पण अन्य राजकारण धुरंधरांपेक्षा यशवंतरावांचे वेगळेपण हे, की त्यांचा आपल्या मायबोलीवर खूप जीव होता, ते स्वतः एक सर्जनशील कलावंत व उत्तम समीक्षक होते... त्यांचा मूळ पिंडच प्रतिभावंताचा होता. राजकारणाच्या धकाधकीत यशवंतराव शिरले नसते, तर कदाचित साहित्याच्या इतिहासात अजरामर ठराव्यात, अशा साहित्यकृती ते निर्माण करू शकले असते, असे त्यांच्या प्रकाशित लेखनावरून व भाषणावरून वाटते" हे डॉ. भा. ल. भोळे (यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य) यांचे मत अगदी खरे आहे. पण यशवंतरावांच्या राजकीय यशापयशाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या लेखनाकडे पाहिले गेल्यामुळे कला, साहित्य, संगीत, नाट्य, क्रीडा आदि क्षेत्रात रमणाऱ्या कलावंत यशवंतरावांकडे महाराष्ट्राचे काहीसे दुर्लक्षच झालेले आहे. अलीकडच्या काळात राजकारणी काय आणि किती वाचतात, कसे बोलतात, याबद्दल न बोललेलेच बरे ! भाषेच्या प्रेमाचा राजकीय फायदा करू पाहणाऱ्या राजकारण्यांचे वाचन बरेचदा शून्य असल्याचेही दिसते. मात्र भाषेवर उत्कट प्रेम करणाऱ्या यशवंतरावांचे भाषाभान अत्यंत प्रगल्भ असे होते. भाषेवर प्रेम


अनुक्रमणिका

करणाऱ्या यशवंतरावांचे मराठी भाषा आणि साहित्याच्या व्यवहारावर लक्ष होते. तत्कालीन ललित साहित्याचे बऱ्यापैकी वाचन त्यांनी केलेले होते. 'साहित्याच्या क्षेत्रात माझी भूमिका नम्र रसिक वाचकाची आहे' असे नमूद करणाऱ्या यशवंतरावांचे वाचन चौफेर होते. 'साहित्य प्रेमी हा आजच्या लोकशाही युगात एक नम्र समीक्षक असतोच' असे मानणारे यशवंतराव कितीतरी कविता, कादंबऱ्या, आत्मचरित्रांविषयीची परखड मते अनेक ठिकाणी व्यक्त करतात. शब्दांच्या शक्तीवर आणि विचारांनी घडून येणाऱ्या क्रान्तीवर त्यांच्या विश्वास होता. ते म्हणतात, ''नवनिर्मितीचे सर्जनशील कार्य जसे शब्द करतात, तसेच साम्राज्यशक्तीला धुळीला मिळवण्याचे संहारक सामर्थ्यही शब्दांत आहे, कल्पना, विचार आणि शब्द यांचा त्रिवेणी संगम ही मानवी इतिहासातील एक जबरदस्त शक्ती आहे''. भाषा, साहित्य हे मानवी प्रगतीचे एक माध्यम आहे, भाषा आणि साहित्याची समृद्धी व्हावी यासाठी ते सतत प्रयत्नशील असत. ''साहित्याचा समाजजीवनासाठी आरशासारखा उपयोग होतो. कारण या साहित्यात सर्वसाधारण लोकांच्या सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक प्रवृत्तीचे प्रतिबिंब सापडते. त्यातच साहित्याच्या उत्पत्तीचे व जनतेच्या अभिव्यक्तीचे रहस्य दडलेले आहे, हे सत्य आहे की ज्याला समस्त मानवी इतिहासाचा पुरावा देता येइल'' अशा शब्दात साहित्याचे समाजजीवनाशी पर्यायाने सामान्य माणसाशी असणारे नाते सांगणाऱ्या यशवंतरावांना ललित साहित्याचाही उपयोग समाजाच्या प्रबोधनासाठी व्हावा असे वाटत होते. ''खरा साहित्यिक समाजापासून दूर असू शकत नाही'' असे मानणारे यशवंतराव ''साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून समाजात सर्व थरांत निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे'' अशा शब्दात साहित्याची समाजाशी असणारी बांधिलकी सांगतात. दलित साहित्य, आदिवासी साहित्य आदी प्रवाहांचे ते स्वागत करतात. ''आदिवासी व उपेक्षित जाती यांची भाषा आता नव्या मराठी भाषेत येणार आहे. हे सामुदायिक चयन किंवा देवाणघेवाण भाषेच्या दृष्टीने उपयुक्त आहे. त्याने मराठीभाषा समृद्ध होईल. म्हणून दलित साहित्याची भाषा कदाचित वेगळी वाटली, तरी तिचा कस, तिच्यातील रंग, जर नव्या मराठीत उतरली तर ती हवीच आहे'' असे यशवंतराव म्हणतात. त्यांचे भाषाभान अत्यंत प्रगल्भ होते, त्यांची भाषा व साहित्यविषयीची भूमिका अलीकडच्या काही राजकारण्यांप्रमाणे तकलादू आणि निव्वळ संकुचित नव्हती. आजच्या राजकारण्यासारखा भाषा आणि प्रदेशाचा आंधळा-पांगळा अभिमान ते बाळगत नव्हते. भाषा आणि प्रदेशाचा अभिमान बाळगतानाही साऱ्या विश्वाचे आणि आपल्या देशाचे भान त्यांना होते. भारतातील आणि जगातील विविध भाषांमध्ये आदान प्रदानाचे निकोप नाते असावे, असे त्यांना वाटत असे. मराठी राजभाषा व्हावी, महत्त्वाचे संशोधन मराठीतून व्हावे, शिक्षण मातृभाषेतून दिले जावे, असेही त्यांना वाटत असे. यशवंतराव द्रष्टे आणि कर्ते लेखक होते. त्यांच्यातल्या सृजनशील लेखकाने आणि चिंतनशील वाचकाने त्यांच्यातल्या राजकारण्याला कमालीचे समाजाभिमुख बनविले होते. भाषा आणि साहित्याविषयीचा यशवंतरावांचा कळवळा अस्सल होता, भारतातील आणि जगातील भाषा आणि साहित्य व्यवहाराची जाण त्या कळवळ्यामागे होती. निव्वळ राजकीय यशासाठी अथवा मतांच्या राजकारणासाठी त्यांनी भाषा आणि साहित्याचा कैवार केला नाही, हे आवर्जुन सांगितले पाहिजे.

आज यशवंतरावांच्या जन्मशताब्दी वर्षात महाराष्ट्रातील किती राजकारण्यांनी यशवंतरावांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला आहे ? मराठी भाषा आणि साहित्याची सर्व पातळ्यांवर गळचेपी होत असताना मतांच्या राजकारणावर डोळा ठेवून भाषाप्रश्न, सीमाप्रश्न ऐरणीवर आणले जातात, भाषा आणि साहित्य व्यवहाराचे जराही भान नसणारी मंडळी वाटेल तेथे वाटेल तसे बोलतात, भाषा व साहित्य व्यवहाराला तथ्यहीन स्वार्थी राजकारणाची वाळवी आज लागली असल्याचे दिसत आहे. वाचन, लेखन ज्ञानार्जन, माहितीचे संकलन आणि त्या आधारे निष्कर्ष आदी अनेक बाबी राजकारण्यांसाठी नाहीतच, असा ठाम समज समकालीन राजकारण्यांचा झालेला दिसतो. एखादा अपवाद असला तरी 'सब घोडे बारा टक्के' असे चित्र आहे. राजकारणी साहित्यिक असावा असा आदर्श घालून देणाऱ्या यशवंतरावांच्या महाराष्ट्रात आज साहित्य व्यवहारात राजकारण घुसले, त्याने साहित्य व्यवहारालाही भ्रष्टाचाराचे कुरण बनविणे सुरू केले आहे, यशवंतरावांच्या प्रतिभेचे, विचारांचे आणि लेखनाचे बळ त्यांचा राजकीय वारसा सांगणाऱ्यांच्या आणि त्यांच्यावर सतत टीका करणाऱ्या विरोधकांच्याही अंगी नाही, हे अप्रिय वाटत असले तरी सत्य आहे.

▌ अजय देशपांडे

अनुक्रमणिका



एकनाथांची कथाकविता

डॉ. रत्नाकर बापूराव मंचरकर

जेष्ठ समीक्षक डॉ. र. बा. मंचरकर यांचे अलीकडेच निधन झाले. त्यांना भावपूर्ण आदरांजली !

डॉ. मंचरकर 'युगवाणी'चे साक्षेपी वाचक होते. या नियतकालिकाविषयी त्यांना आस्था होती, ते आस्थेने चौकशी करीत असत, प्रेमाने काही सूचनाही करीत असत. त्यांनी काही महिन्यांपूर्वी 'युगवाणी'साठी पाठविलेला हा लेख. - संपादक

०१. एकनाथ : व्यक्तिमत्त्व आणि कार्य :

भानुदासांच्या विठ्ठलभक्त कुळात झालेला जन्म, गुरूबोधातून लाभलेली दत्तोपासना आणि पैठणच्या वास्तव्यातील संस्कार या त्रिवेणीवर एकनाथांचे (इ.स.१५३३ ते १५९९) तीर्थस्वरूप व्यक्तिमत्त्व उभे आहे. त्यामुळे वैदिकांचे शास्त्रप्रामाण्य आणि संतांची करूणा, परंपरेने गायिलेला ब्राह्मणमहिमा आणि भागवतधर्माने दिलेला समतेचा विचार, संस्कृतच्या श्रेष्ठत्वाची जाणीव आणि मराठीच्या प्रतिष्ठापनेची निकड अशा परस्परविरोधी प्रवृत्तींचा ताण आणि त्यांच्या समन्वयाचे प्रयत्न नाथांच्या व्यक्तिमत्त्वात आणि वाङ्मयात जाणवतात. वैदिकांचे विद्यापीठ असलेल्या पैठणातील कर्मठपणा आणि पढिकता त्यांनी नाकारली, पण परंपरारक्षणाची प्रवृत्ती व पांडित्याविषयीचा आदर मात्र स्वीकारला. वारकरी संप्रदायातून अभेदभक्ती, समदृष्टी, औदार्य आणि बहुजनांचा कळवळा त्यांना लाभला. दत्तसंप्रदायातील संन्यास आणि सकामता टाळून ह्याची आचारशुद्धी आणि समन्वयशीलता तेवढी त्यांनी घेतली. गुरू जनार्दनांच्या सहवासात 'जनी जनार्दन' या महासूत्राचा त्यांना साक्षात्कार झाला आणि अध्यात्मसुखाचे मर्म गवसले. समानशील सहधर्मचारिणाने त्यांचा प्रपंच शांतिसुखाचे आगर बनविला. या सगळ्यांनी एकनाथांच्या व्यक्तिमत्त्वाला तृप्ती आणि शांती दिली.

अंगभूत प्रकृती आणि समकाळातील संक्रमणाचे आव्हान यामुळे समन्वय व सावधपणा हाच नाथांचा मनोधर्म बनला. त्यामुळे कर्मकांड आणि सन्यास यातील दोन्ही टोके टाळून त्यांचा उचित मेळ ते घालू शकले. नाथांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय केला. आत्मोद्धाराबरोबर लोकोद्धारालाही महत्वाचे मानले. लोकधर्माचे उन्नयन करणाऱ्या आध्यात्मिक तत्त्वांचा पुरस्कार केला आणि स्त्री-शूद्रांची अंधारलेली आयुष्यं भक्तिप्रेमाने उजळून टाकली. सामाजिक नीती आणि सांस्कृतिक मूल्यं यांचा परामर्श घेऊन त्यांनी समाजमनाचे भरणपोषण केले. आपल्या बहुमुखी वाङ्मयातील प्रबोधक शक्तीने लोकसंग्रह केला. त्यांच्या विचार-जागृतीचे क्षेत्र काशीपासून कर्नाटकापर्यंत विस्तारले होते. याची साक्ष त्यांच्या ग्रंथप्रसाराचे विस्तीर्ण क्षेत्र देते. ज्ञानदेवांच्या समाधीचा त्यांनी पुनर्शोध घेतला आणि ज्ञानेश्वरीचे शुद्धीकरण केले. त्याद्वारे आपल्या सांस्कृतिक संचिताला त्यांनी उजाळा दिला. ग्रंथलेखन, अध्यात्मनिरूपण, हरिकीर्तन, तीर्थाटन, लोकसंग्रह आणि परंपरेतील कालसंवादी अंशांचे पुनर्जागरण करून एकनाथांनी ज्ञानदेवांच्या तत्त्वप्रणालीला धर्मशुद्धीच्या आंदोलनाचे स्वरूप दिले.

पडत्या काळात मराठी साहित्य आणि संस्कृती टिकविण्याचे आणि वाढविण्याचे कठीण काम नाथांनी

अनुक्रमणिका

समर्थपणे केले. ज्ञानदेवांच्या उदात्त अध्यात्ममूल्यांना त्यांनी व्यवहाराचा पाया दिला. नामदेवांच्या उत्कट राजस प्रेमभक्तीला व्यवहार्य रूप दिले. परंपरेने आलेले उज्ज्वल जीवनादर्श लोकव्यवहारात कसे उतरावेत याचे दिग्दर्शन त्यांनी केले. परंपरेचा वारसा समृद्ध करून त्यांनी पुढीलांना दिला. नाथांची भेदभावनिर्मूलनाची प्रवृत्ती तुकारामांच्या जीवनकार्यात अधिक धारदार झाली. नाथांची परंपरारक्षणाची प्रवृत्ती पुढे रामदासांच्या पुनरूज्जीवनवादात परिणत झाली. ज्ञानदेवांच्या जोडीला नामदेव होते आणि तुकारामांच्या काळात रामदास होते. एकनाथ त्यांच्या मधोमध एकटे उभे आहेत. आपली ही इतिहासदत्त जबाबदारी नाथांनी मोठ्या खंबीरपणे पार पाडली. आणि म्हणून युगधुरंधर सत्वधीर संत आणि युगप्रवर्तक कवी म्हणून नाथांचा सार्थ गौरव करावा लागतो.

०२. एकनाथांची कविता :

एकनाथ लोकमानसाची नस ओळखणारे लोकनाथ होते. ब्राह्मणापासून महारापर्यंतचा समाज त्यांच्या डोळ्यासमोर होता. गावकुसाबाहेरच्या भटक्या जमाती, आदिवासी जमाती येथपर्यंत त्यांच्या करूणेचे पाझर वाहत होते. या सगळ्यांसाठी त्यांनी लिहिले. आपल्या श्रोतृवर्गाची व्यापकता, विविधता आणि अभिरूची ते ओळखून होते. त्यामुळे आपल्या श्रोतृवर्गाला, वाचकांना सामावून येईल अशीच कवितेची समावेशक संकल्पना त्यांनी स्वीकारली.

ज्ञानी निवती परमार्थबोधे । पंडित निवती पदबंधे
लोक निवती कथा-विनोदे । ग्रंथसंबंधे जग निवे

भावार्थरामायण,बालकांड,अ.१४।ओवी१८३.

ज्ञानवंतांना परमार्थाचा बोध अतिप्रिय असतो. पंडितांना पदबंधाचे लावण्य मोहविते. जनसामान्यांना वेधून घेणाऱ्या कथा आणि खळखळून हसविणारा विनोद आवडतो. हे सारे ज्यात आहे असाच ग्रंथ दुःखकष्टाने तापलेल्या जगाला निववणारा, शांत करणारा ठरतो. अशी त्यांची धारणा होती. परमार्थबोध, पदबंध, कथा, विनोद अशा वैशिष्ट्यांचा स्वीकार त्यांनी केला. तथापि 'प्रतिपदी प्रतिपादावे परब्रह्म' हा संतकवींचा धर्म नाथांनी निग्रहाने पाळला. नाथांच्या लहानमोठ्या कवितेत या चारही वैशिष्ट्यांचा आढळ होतो. त्या त्या कवितेच्या प्रकृतीप्रमाणे त्यांचे प्रमाण कमी-जास्त असते एवढेच.

शांतरसप्रधान तत्त्वकविता (नाथभागवत), नानारसप्रधान पौराणिक महाकाव्य (भावार्थरामायण), प्रेमभक्तीचे प्रबंधरूपककाव्य (रूक्मिणीस्वयंवर), आत्मोद्गारी भक्तिकविता (अभंगगाथा), पौराणिक कथाकविता (बाळक्रीडा, आख्याने), चरित्रपर कविता (संतचरित्रपर कविता), शृंगारप्रधान कृष्णलीलाकथा (राधाविलास), चमत्कृतिपूर्ण संवादाख्याने (सीता-मंदोदरी संवाद/गंगा-गौरी संवाद), लोकसंवादी आणि नाट्यधर्मी कविता (भारूडे, गौळणी, जोहार) अशी सर्व प्रकारची कविता नाथांनी लिहिली.

चार ओळींपासून चाळीस हजार ओव्यांपर्यंत त्यांची रचना आहे. ती विविध काव्यबंधातून आविष्कृत होते. आणि म्हणून ही बहुरंगी कविता विविध थरात विखुरलेल्या समाजाचे समाराधन करणारी कविता ठरली, यादवकालीन वाङ्मयाच्या प्रेरणा, परंपरा, प्रवाह आणि बीजे यांचा फुलोरा नाथकाव्यात फुलून आला आहे. परंपरेच्या या वारशात नाथांनी भर घातली. त्यांच्या चौरस अवधानामुळे वाङ्मयाचा एकांगीपणा नाहीसा झाला आणि मराठी भाषा व वाङ्मय यांची श्रीमंती वाढली. नाथकाव्यातून झालेल्या बीजारोपणाने शिवकाळात मराठी साहित्याचे सुवर्णयुग अवतरले. संतकविता उत्कर्षाला पोहोचली. पंडिती कवितेला बळ चढले आणि शाहिरी कवितेला आपला मार्ग सापडला.

नाथसागराचे पात्र एवढे विशाल आहे की मध्ययुगीन मराठी कवितेच्या प्रेरणा, प्रवाह आणि प्रकार यांचे एकत्रित दर्शन त्यात घडू शकते. नाथांनी मराठी काव्यपरंपरेत विकसीत केलेली कथाकविता आणि शृंगारकवितेची केलेली पेरणी एवढ्याचाच आपण येथे विचार करणार आहेत. नाथांची कथाकविता अतिशय समृद्ध असून वेगवेगळ्या प्रकारांनी लिहिली गेली आहे.

०३. भक्त - भगवंताची लीलाख्याने :

एकनाथांच्या आख्यानांमागे संकीर्तनात्मक भक्तीची प्रेरणा आहे. कीर्तनसंस्था महाराष्ट्रातील भक्तिसाधनेचे एक वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. ज्ञानदेव-नामदेवांनी तिला आकार दिला आणि पडल्या काळात नाथांनी तिच्यात प्राण फुंकला. कीर्तनाच्या पूर्वरंगात तत्त्वबोध केला जातो आणि उत्तररंगात त्यानुसार कथा सांगितली जाते. भक्तीचा आविष्कार-प्रसार, धर्म-नीतीचा पुरस्कार आणि सात्त्विक लोकरंजन हे कीर्तनसंस्थेचे आणि म्हणून आख्यान कवितेचेही प्रयोजन ठरले. चुकलेला मुलगा सापडल्याची वार्ता ऐकणाऱ्या मातेच्या आतुरतेने हरिकथा ऐकणाऱ्या भागवतांसाठी तिची निर्मिती झाली. परमेश्वराच्या लीलांचे गायन आणि त्याच्या गुण-नाम-कर्म यांच्या संकीर्तनाची प्रबळ प्रेरणा या कथांमागे आहे. त्यात आत्मोद्धाराबरोबर लोकोद्धाराची तहान आहे. प्रापंचिकांना

अनुक्रमणिका

नैतिक सदाचाराचा उपदेश करावा आणि मुमुक्षूंना परमार्थ ग्रहणासाठी अधिक समर्थ करावे, हेच या कवितेचे प्रयोजन होते.

कीर्तनोपयोगी आख्याने कीर्तनाच्या काळामुळे अल्पविस्तृत असतात. संतांची अभंनबद्ध आख्याने पुढे वृत्तबद्ध बनली. त्यांचे रचनावैचित्र्य वाढत गेले. अशा आख्यानांची रचना लवचिक असते. आख्यानवस्तूचे काही धागे सुटे असतात. वर्णनांची स्थळे केवळ उल्लेखलेली असतात. प्रत्यक्ष कीर्तनात काही कमी जास्त करून ते रंगविण्याला कीर्तनकारास वाव मिळावा हाच अशा सैल रचनेचा उद्देश असतो.

कीर्तनाश्रयी आख्याने अधिक विस्ताराची असतात. आरंभी ओवीबद्ध असलेली ही आख्याने नंतर श्लोकबद्ध होत गेली. कीर्तनोपयोगी आख्याने बहुधा कीर्तनकारांनीच लिहिली आहेत. पण कीर्तनाश्रयी आख्याने कीर्तनकारांबरोबरच इतरांनीही लिहिली आहेत. त्यांची रचना स्वयंपूर्ण असते म्हणजे ती कीर्तनात ऐकली नाहीत व स्वतंत्रपणे त्यांचे पठण-श्रवण केली तरी त्यांचे हृदगत समजू शकते.

कृष्णाच्या विविध लीलांचे विविध भावातून केलेले कीर्तन म्हणजे लीलाकीर्तन. येथे कृष्णलीला हेच आलंबन असते. अनुभवाचा विषय असते. त्यामुळे लीला कीर्तनाला अनुभूतीच्या आविष्काराचे स्वरूप येते. राधा, गोपी, यशोदा अशी भावभूमिका घेऊन तन्मयतेने लीला कीर्तन केले जाते. पण ह्या भावभूमिकेचा लीलावर्णनापुरता आधार घेतला तर त्याला लीलाख्यानाचे स्वरूप येते. ''भागवत संप्रदायात लीलाकीर्तनाची पद्धती ज्ञानदेवकालापासूनच विद्यमान असली तरी लीलाकीर्तनाच्या प्रेरणेतून लीलाख्यानांची रचना एकनाथकाळापासून होऊ लागली...''[१] (शिवाजी गउळकर,१९६९, पृ.३८२)

एकनाथांनी भगवंताच्या अवतारलीला गायिल्या आहेत त्याप्रमाणे भक्तांच्या निष्ठेच्याही कथा गायिल्या आहेत. भगवंताच्या लीलातून त्याचे गुणसंकीर्तन करावे, त्याचे चरित्र सांगावे. पौराणिक स्त्री-पुरूष भक्तांच्या कथा सांगाव्यात . हीच सर्व संतांप्रमाणे नाथांचीही भूमिका आहे. अशी भक्त-भगवंताची लीलाख्याने हे नाथांच्या कथाकवितेचे एक रूप आहे.

०३.१ बाळक्रीडा :

एकनाथांची ''बाळक्रीडा'' अभंग क्र. ५ ते ३१७ अशा ३१२ अभंगात विस्तारलेली आहे."[१] (सकल संतगाथा, खंड २, का.अ.जोशी,संपा.) श्रीकृष्णाच्या गोकुळातील बाललीलांचे तन्मयतेने केलेले गायन हेच या बाळक्रीडेचे स्वरूप आहे. कृष्णजन्मापासून कंसवधापर्यंतचे कृष्णचरित्रतीत आलेले असून ते प्रायः भागवतातील कथा-प्रसंगांना अनुसरणारे आहे. बालकांचे खेळ, वनक्रीडा, गोपींचे खेळ, गोपींची गाऱ्हाणी, विरहिणी, रासक्रीडा, काला यामध्ये एकनाथ अधिक रमलेले आहेत. महाबळ भटाची फजिती सारख्या मराठी परंपरेतील कथा नाथांनी त्यात समाविष्ट केल्या आहेत आणि वेणी-दादीची ग्रंथी सारखे नवे प्रसंग स्वतंत्रपणे रंगविले आहेत. ही बाळक्रीडा कथेचे अनुसंधान ठेवते पण कथानिवेदनात तिला फारसा रस नाही. श्रीकृष्णाचे परब्रह्मस्वरूप ठसविण्यावर नाथांचा भर आहे. कथाकथनात आध्यात्मिक रूपकांचा वापर करून नाथ ही गोष्ट साधतात. कथेतील भावक्षण पकडणे आणि त्यानिमित्ताने आपल्या श्रीकृष्णप्रेमाला वाट करून देण्याची प्रवृत्ती आहे. त्यामुळे पुष्कळ ठिकाणी श्रीकृष्णस्मरण, श्रीकृष्णगुणवर्णन यात तल्लीन होऊन गायिलेल्या भावगीत मालिकेचे रूप त्यांच्या या बाळक्रीडेला प्राप्त होते.

०३.२ कृष्णविलास लीलाख्याने :

कृष्णाच्या विलासलीलाही नाथांनी वर्णन केल्या आहेत. क्रमांक ५०,५१,५२ या मधून ''राधाविलास'' किंचित फेरफाराने वर्णन केलेला आहे. क.५० मध्ये १९ ओव्यातून तो आलेला आहे. सूर्यबिंबासाठी हट्ट करून रडणारा कृष्ण राधेजवळ गप्प राहतो म्हणून 'नेई घरा कृष्णातें' असे यशोदा राधेला सांगते. राधा त्याला सुमनशय्येवर पहुडविते.

वरी देखोनी एकांत । चुंबन देउन बोले मात
अससी धाकुटा बहुत । न चले कोर्ही (५०/७)

कृष्ण 'धाकुटा' असल्याची खंत ती व्यक्त करते. तेव्हा तिचे मनोगत जाणून कृष्ण 'थोर' होतो. राधा धाऊन मिठी मारते आणि सुखे गोष्टी करीत दोघे शयन करतात. एवढ्यात दारावर राधापती अनयाची थाप बसते. घाबरलेली राधा कृष्णाला 'सान' होण्याची विनंती करते. त्यावर कृष्ण मिस्किलपणे म्हणतो,

कृष्ण बोले हास्य मुखें । मंत्र विसरलों या सुखें
आता होणार ते सुखें । होण यावरी (५०/११)

पण या थट्टेने राधा कासावीस झाल्याचे पाहून तो पूर्वरूप धारण करतो. दहीभात खाणाऱ्या लहानग्या तान्हुल्या कृष्णाला पाहून अनय प्रसन्न होतो. तुला करमत नसेल तेव्हा कृष्णाला अवश्य आणीत जा, ही त्याची आज्ञा राधाकृष्णांना समाधान देणारीच

असते !

नाथांचे हे लहानसे आख्यान मराठी थाटाघाटात अवतरले आहे. त्यात नाट्य आहे, विनोद आहे. चोरट्या शृंगाराची खुमारी आहे. अचानक उभा राहणारा पेच आणि त्याची समाधान देणारी सोडवणूकही आहे. त्यामुळे ते वेधक झाले आहे. त्यातला शृंगार सीमित आहे पण पुढील परंपरेत तो तसा राहिला नाही.

'राधाविलासा'ची कथा 'कार्तिक माहात्म्या'त सापडते. 'ब्रह्मवैवर्तपुराणा'तही ही कथा आढळते. तथापि तिचे स्वतंत्र मराठी रूप दिसते ते नामदेवांच्या गाथेमध्ये. तीन अभंगातून नामदेवांनी ही कथा गायिली आहे. श्रीकृष्णाने तरूण होऊन राधेशी केलेली क्रीडा एवढी कल्पना सोडली तर नामदेवांनी मराठमोळ्या थाटाघाटात हे आख्यान स्वतंत्रपणे फुलविले आहे. एकनाथ नामदेवी आख्यानाचे अनुसरण करतात आणि त्यात थोडी भरही टाकतात. या आख्यानवस्तूला प्रणयाख्यानाचे स्वरूप दिले ते वामनपंडितांनी, राधाविलासाचे ते पूर्ण विकसित रूप आहे. कृष्णानंदनिमग्न, पूर्णप्रकाशानंदनाथ आणि दयाळनाथ यांची आख्याने कमी-अधिक प्रमाणात वामनपंडितांना अनुसरणारी आहेत.

लोककाव्यात 'गाथा-सप्तशती', पुराणात 'ब्रह्मवैवर्त' आणि गीतात जयदेवाचे 'गीतागोविंद' यांनी राधाकृष्णाच्या प्रेमाला आकार दिला. भागवतपुराणाने त्याला प्रेमभक्तीचा पाया मिळवून दिला. बाराव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत निंबार्क, राधावल्लभ व पुष्टिमार्गीय संप्रदाय उदयास आले. त्यांनी याच प्रेमभक्तीचा पुरस्कार केला. याच परंपरेत मराठीतील कृष्णविलास आख्याने येतात. एकनाथांच्या दृष्टीने हा कामभावनेतून केलेला कृष्णभक्तीचा आविष्कार आहे.

जैसा ज्यासी भावार्थ । तैसा पुरवी मनोरथ
एकनाथी भागवत २९/२६९

ज्या भक्ताचा जसा भाव असेल तो पुरविणे, सकाम भक्तांचे काम पुरवून त्यांना निष्काम करणे हे देवाचे बिरूद. गोपींच्या प्रेमाविषयी नाथांचा कृष्ण म्हणतो,

विष म्हणोनि अमृत घेतो । मरण जाऊनि ये अमरता
तंवी जारबुद्धी माते भजतां । माझी सायुज्यता पावल्या
एकनाथी भागवत २०/२०७

विष म्हणून जर अमृत घेतले तर मरण येण्याऐवजी अमरत्व येईल. त्याप्रमाणे गोपींनी जारबुद्धीने जरी भक्ती केली तरी त्यांना सायुज्यता मिळाली. परमात्म्याची प्राप्ती करून देणारी अशीच ही कामभावातून केलेली ईश्वरभक्ती आहे.

कृष्णकथेतील शृंगारविलसिते हेरून नाथांनी कथाकविता लिहिली. त्यामुळे राधा-कृष्ण, कृष्ण-गोपी यांचे विलास, रासक्रीडा रंगवून त्यांनी शृंगारकवितेचे बीजारोपण केले. हा घरातला, पाणवठ्यावरचा 'गाथासप्तशती'च्या जातीचा धीट शृंगार आहे. 'वारियाने कुंडल हाले - डोळे मोडीत राधा चाले' असा तो राधा - कृष्णाची मनबाधा टिपणारा शृंगार आहे. शृंगार, भक्ती आणि अध्यात्म यांची त्यात सरमिसळ झाली आहे. ''इतर संतकवींपेक्षा एकनाथांच्या कवितेत या शृंगारकवितेची व्याप्ती अधिक वाढलेली दिसते. आध्यात्मिक रूपके वापरून एकनाथांनी शृंगारकवितेचे रंगरूप पार बदलून तिला तत्त्वकवितेच्या बरेच जवळ आणले, हे खरे आहे. पण एकनाथांच्या कवितेमुळे शृंगारकवितेच्या संकेतांना एक वेगळी प्रतिष्ठा मिळाली. आणि शृंगारकवितेची पंरपरा अधिक समृद्ध झाली हे एक ऐतिहासिक सत्य आहे. परिणामीनंतरच्या शाहीरी कवितेच्या कालखंडात जी शृंगारकवितेची परंपरा प्रभावी ठरली तिची बिजेही आपल्याला एकनाथांच्या कवितेत दिसतात''[४] यादृष्टीने नाथांची कृष्णविलास आख्याने आणि त्यांच्या गौळणी यांना महत्त्व आहे.

०३.३ भक्तीचे महिमान गाणाऱ्या भक्तकथा :

भगवंताच्या लीलाकथा नाथांनी जशा समरसून गायिल्या. त्याप्रमाणे भक्तीचे महिमान गाणाऱ्या भक्तकथाही त्यांनी समरसून गायिल्या आहेत. दशावतार, रूक्मांगद, तुळशीमाहात्म्य, सत्यभामाव्रत, प्रल्हादचरित्र, ध्रुवचरित्र, उपमन्युकथा, सुदामचरित्र, संदीपनकथा, हळदुली, श्रीदत्तात्रयजन्म, श्रीहनुमानजन्म, शिवशक्तीविवाह, गंगा-गौरी कलह, राम-रावणाची एकरूपता, सीता-मंदोदरीची एकरूपता अशी सोळा आख्याने एकनाथ-गाथेची पृ.६०७-६५७ अशी एक्कावन्न पाने व्यापतात. ह्यात सीता-मंदोदरी संवादाची (पृ.१८९-१९९) अशी अकरा पाने धरली तर बासष्ट पृष्ठांची सतरा आख्याने आपल्याला दिसतात.

'प्रल्हादचरित्र' (क्र. ३४१७-३४३३) ही प्रल्हादाच्या अविचल भक्तिनिष्ठेची कथा आहे. प्रल्हादाची नारायणनिष्ठा उपजत आहे. मातापित्यांची समजावणी, नाराजी आणि क्रोध, त्यांनी दिलेले घोर दंड यातही त्याची हरिभक्ती ढळत नाही. शस्त्रांचे आघात, अग्नीदाह, जलविसर्जन, विषप्राशन अशा आपत्तीतही नामजपाने तो तरून जातो. आपला नारायण सर्वत्र आहे, सर्वांभूती आहे. ही त्याची श्रद्धाच त्याला तारून नेते. अखेरी 'स्तंभ फेडीत कटकट । दाढा व्यंकट विकट' असा नरसिंह प्रकट होतो.

अनुक्रमणिका

जिव्हा लळलळित लटलट । घुरघुरीत कंठ
स्वासें नासापुट उतट । पिंगट जटाजूट दाट

एकनाथ गाथा ३४३३/२

हे त्याचे क्रुद्ध रूप आणि रणावेश अर्थाच्या आधी नादांनी भाव व्यक्त करणाऱ्या शब्दांनी नाथांनी व्यक्त केला आहे. नादानुकारी शब्दांचा असाच वापर आपल्याला पुढे रामदासी रचनेत दिसतो.

नारायण भक्तांचे रक्षण करतो, त्यांचे मनोरथ पूर्ण करतो. ''न पाहे यातीकुळाचा प्रचार । धावे सर्वेश्वर नामासाठी'' (ए.गाथा ३४४६/१) अशी भगवंताची उदारता, भक्तवत्सलता नाथ या आख्यानांच्या निमित्ताने पुन्हापुन्हा सांगतात. या भक्तकथा भक्तीचा एक आदर्श उभा करतात. त्यामधील भक्तितत्त्व श्रोत्यांच्या अंतःकरणात ठसावे अशाच पद्धतीने कथेची मांडणी नाथ करतात. त्यामागे भगवतगुणकीर्तनाची प्रेरणा असते आणि भक्त व भक्ती यांचा महिमा ठसविण्याचा उद्देश असतो.

ही आख्याने घटिताचे धावते निवेदन करणारी आहेत. त्यातील कथेला एक वेग आणि ओघ आहे. तीत विनोद आहे, नाट्य आहे. चमत्कार आहेत, तत्त्वबोध आहे, भक्त व भगवंत यांचे महिमान आहे. सरळसाधे वाहते कथानिवेदन हेच या कथाकवितेचे रूप आहे. तथापि ह्यात नाथांच्या ग्रंथरूप किंवा ग्रंथगत आख्यानाचे लावण्य आणि विभ्रम मात्र दिसत नाहीत.

०४. संवादाख्यानांना आरंभ :

संवादात्मक पद्धतीने ग्रंथाची मांडणी करण्याची पद्धती प्राचीन आर्ष ग्रंथ-पुराणे यांच्यापासून ज्ञानेश्वरी-दासबोधापर्यंत मोठ्या प्रमाणावर दिसते. तथापि या परंपरेत मांडणी संवादात्मक असली तरी ती फारशी सांभाळली गेलेली दिसत नाही. कलगी-तुऱ्यातील सवालजबाब आणि भारूडातील प्रश्नोत्तरात्मक कूटे यातही संवादशैली वापरलेली दिसते. या साऱ्यातून विकसित झालेल्या संवादशैलीचा प्रभावी वापर करून शाहिरांनी पोवड्यातील वीररस प्रतीतीदर्शक आणि लावणीतील शृंगार गुलजार बनविला. रामजोश्यांची छेकापन्हुती अशा ढंगदार चतुरालापाचे व विकसित संवादशैलीचे नमुनेदार उदाहरण आहे.

पण हे थोडे पुढचे झाले. कथाकवितेत संवादात्मक आख्याने लिहिण्याची परंपरा एकनाथांपासून सुरू होते. 'सीता-मंदोदरी संवादा'त (ए.गा.क्र. ९२७-९३२) राम सर्वव्यापक आहे म्हणून तो रावणाच्या देहातही आहे. मग रामाचे अनुसंधान बाळगून रावणाला भजण्यात काय अडचण आहे. असा साळसूद प्रश्न मंदोदरी विचारते. त्यावर रामानुसंधान लावताच चित्त चित्तपण विसरते. दृश्य-दृष्टा, व्याप्य-व्यापक आणि भोग्य-भोक्ता यांना जेथे अवकाशच राहत नाही तेथे राम-रावण कोठे उरतात? असे बिनतोड उत्तर त्याच पारमार्थिक भूमिकेवरून सीता देते. त्यामुळे मंदोदरीचे अष्टसात्विक भाव जागृत होतात आणि ती तिजानंदात निमग्न होते. मंदोदरी आणि सीता यांच्या भूमिकांमधील नाट्य या संवादशैलीमुळे खुलत राहते आणि तत्त्वबांधही घडतो.

नाथांनी 'गंगागौरीकलह'(ए.गा. क्र. ३४८९ ओव्या ५४) असाच बहारदार रंगविला आहे. शिवाची तटस्थता, नारदाचा कळीलावा कावा, गौरीचा क्रोध आणि गंगेचा खट्याळपणा यांनी या आस्थानात रंग भरला आहे. गौरी-गंगा यांच्या रूपाने विद्या-अविद्या यांचा सामना नाथांना वर्णन करावयाचा आहे. तात्त्विक कल्पना आणि पुराणकथासंदर्भ यामुळे या संवादातील नाट्य उत्तरोत्तर वाढत जाते.

प्रणयाख्यानक किंवा विनोदगर्भ कथावस्तूसाठी नाथांनी वापरलेली संवादरचना उपयुक्त ठरली. तत्त्वचर्चेसाठीही तिचा प्रभावी वापर करण्यात आला. एकनाथांच्या संवादात्मक प्रकरणांमधून तशा आख्यानांची परंपरा मराठीत आरंभित झाली. शुकरंभासंवाद, कुडी-आत्म्याचे भांडण (मुक्तेश्वर), सीता - लोपमुद्रासंवाद (वामन), राम - गूहसंवाद (वेणाबाई, विप्रागिरी), सीता - त्रिजटा संवाद, सीता - बिभीषणसंवाद (जगज्जीवन), उमा-रमा संवाद (कृष्णदास गोविंदा), राधाविलास (श्रीधर), सत्यभामाविनोद (श्रीधर, अनाम), पार्वती-लक्ष्मी संवाद (बाळकराम), गंगा-पार्वती भांडण (जनुभट) अशा सारख्या संवादाख्यानांची प्रेरणा नाथांच्या संवादाख्यानात आहे.

०५. सगुणचरित्रे परमपवित्रे :

मांडणी, हेतू आणि फलश्रुती याबाबत स्फुट चरित्रकविता आख्यानाशी समरूप असते. कथात्मकता, व्यक्तिदर्शन, प्रसंगचित्रण, वातावरणानिर्मिती आणि भाषाविलास हे घटक दोन्हीकडेही सारखेच असतात. त्यामुळे मध्ययुगीन मराठीत संतचरित्रे आख्यानरूप घेताना दिसतात. सगुणचरित्रे परमपवित्रे आधी वंदावी (क्र.१७५८) अशी नाथांची धारणा होती. कीर्तनातील पवित्रकथेने श्रोता आणि वक्ता पावन होतात. कीर्तन-श्रवणाने त्यांच्या अंतर्मळाचे क्षालन होते आणि चित्ताची शुद्धी होते. (ए.गा.१३९०) या जाणिवेने नाथांनी नामदेव, गोरा कुंभार, सावता माळी, चोखामेळा, दामाजी यांची चरित्रे

अनुक्रमणिका

गायिली. शूद्रातिशूद्र समाजातील संतांची चरित्रे गाऊन नाथांनी आपल्या सामाजिक समतेचा प्रत्यय घडविला आहे.

यादृष्टीने त्यांनी गायिलेले 'चोखामेळाचरित्र' (ए.गा.क्र.३६८० ते ३६८७) पाहण्यासारखे आहे. अमृताला रोग होतो, त्याची गोडी नासते. चिंतेत पडलेल्या अमरनाथाला नारदमुनी 'कैवल्याची पेठ' असलेल्या पंढरीविषयी सांगतात. तेथे नामाच्या गजरात संत नाचतात आणि संतांच्या कीर्तनात देव नाचतो. ''तया ठायीं जातां शुद्ध होय अमृत'' (३६८२) या नारदवचनानुसार देवांचा राजा पंढरीत येतो. नामदेवांच्या कीर्तनात रंगलेला देव पारणे फेडण्यासाठी चोखामेळ्याच्या घरी येतो. त्या संतांच्या पंगतीत इंद्र शुद्ध करण्यासाठी अमृताचे ताट पुढे करतो. तेव्हा देव चोखा व सोयरा यांना अमृत शुद्ध करण्यासाठी सांगतो. त्यांच्या दृष्टिक्षेपाने अमृत चोख झाले, शुद्ध झाले. पंढरीच्या ब्राह्मणांनी ज्याचा छळ केला त्याच चोख्याकडून देवाने अमृताचे शुद्धीकरण करवून घेतले. त्यामुळे

यातीहीन मी अमंगळ महार
बरें मजलागुनी न पाहती

असा दुःख सोसणारा चोखामेळा सद्गदीत होतो. जो भक्त आहे त्याची याती कोणती आहे. नीच की उंच हे देव पाहत नाही. भक्तीला भुलून तो त्याची हलकीसलकी कामेही करतो.

क्र. ३६८० ते ३६८७ अशा आठ अभंगातून एकनाथ ही कथा द्रुतगतीने सांगतात. स्वर्ग, पंढरीचे चंद्रभागातीर आणि चोखामेळ्याचे घर अशा वेगवेगळ्या ठिकाणी ही कथा घडते. तीत अमरनाथ व नारायण हे देव, नारद हे देवर्षी, नामदेवांच्या कीर्तनरंगात रंगलेला संतमेळा आणि चोखामेळ्याचे कुटुंबीय आहेत. संपूर्ण कथा सरळ-साधे कथन करीत घटनेचा ओघ चित्रित करीत जाते. ब्राह्मणांनी ज्याचा छळ केला, लोक ज्याला बरे पाहत नाहीत अशा कष्टकरी चोखा महाराची ही कहाणी आहे. त्याची निःसीम भक्ती पाहून नारायण भुलला आहे. देवांचे नासलेले स्वर्गीय अमृत एका हीनयाती भक्ताकडून शुद्ध केले जाते, असे सांगून नाथ अनेक गोष्टी साधतात. देवाच्या दारात जातीपातीला महत्त्व नाही. प्रत्येक भक्तासाठी देवाचे महाद्वार खुले आहे. समाजाने ज्याची अवहेलना केली अशा चोखामेळाकडून स्वर्गीय अमृताची शुद्धी करवून नाथांनी काव्यन्याय (पोएटिक जस्टीस) साधला आहे.

नामदेव - एकनाथांनी विठ्ठलाच्या हाताला धरून त्याला देवळा बाहेरच्या जनजीवनात नेले आहे. भक्तीला भुलून हा विठ्ठल चोखामेळ्याची ढोरे ओढतो. सोयराबाईचे बाळंतपण करतो. पितांबराची कास खोऊन तो गोराबाच्या मागे धावून धावून कामे करतो. शेला सावरीत खुरपे चालवतो. सावता माळ्याबरोबर माती तुडवितो. कोणतेही काम लहान - मोठे नसून सारखेच आहे. काम करताना देवाचे स्मरण केले तर ते काम देवकार्यच ठरते. प्रपंचाला परामार्थमय करण्याची ही संतांची रीत आहे. तीच नाथांनी संतचरित्रकथांना चमत्कारबंधातून गुंफून सांगितली आहे.

चमत्कारबधांचा वापर हे संतचरित्रकवितेचे वैशिष्ट आहे ते एकनाथांच्या चरित्रकवितेत ठळकपणे दिसते. श्रीकृष्ण, राम, अजामिळ, प्रल्हाद, ध्रुव, सुदामा, दधिची, अंबरीष, श्रीयाळ-चांगुणा, द्रौपदी यासारख्या पुराणकथात चमत्कारबंधांचा पुरेपूर वापर दिसतो. भक्तिगुणांचा पुरस्कार करावा आणि भक्तांना दैवी रूप देऊन त्यांचा गौरव करावा अशी प्रेरणा त्यामागे असते. एकनाथांनीही याच प्रेरणेने समांतर असे कल्पनाबंध वापरून चरित्रनायकांचा गौरव केला. नामदेवांनी पाषाणांशी केलेला व्यापार, हात लावील तो परीस असा केलेला चमत्कार, सांवतामाळ्याच्या हृदयात लपलेला देव, कीर्तनप्रसंगी टाळ्या वाजविण्यासाठी थोट्या गोरोबांना फुटलेले हात, चोखामेळ्याने दृष्टिक्षेपाने शुद्ध केलेले अमृत असे चमत्कारबंध नाथांनी वैपुल्याने वापरले आहेत. त्यामुळे दैवतकथेतील पूर्वपरिचित कल्पनाबंध आणि संतजीवनातील आख्यायिका, दंतकथा यांचे गंमतीदार मिश्रण त्यांच्या काव्यात झालेले आहे.

काही व्यक्तींच्या ठिकाणी अद्भुत घटना घडविण्याचे सामर्थ्य असू शकते. धावा, अखंड नामस्मरण, भजन या साधनांनी दैवतांच्या ठिकाणी असणारे सुप्त सामर्थ्य जागविता येते अशा श्रद्धांनी घडविलेले श्रातृमातस त्यांच्यासमोर होते. अशा कथांच्या परिभाषेत ही श्रद्धाळू मते विचार करीत. नाथांच्या काळातला श्रोता हा दारिद्र्याने पीडलेला, अस्मानी सुलतानीच्या कचाट्यात सापडलेला आणि संभ्रमित झालेला होता. वास्तवाच्या उग्र दर्शनाने तो अधिक खचला असता त्यामुळे ईश्वरी सामर्थ्य व कृपा यांनी त्याला धीर देण्यासाठी एकनाथांनी कल्पनारंजित, अद्‌भुत प्रसंगचित्रण करणाऱ्या चरितकहाण्या गायिल्या.

त्या त्या संताचे आत्मपर अभंग, त्यांची नामदेवादी संतांनी गायिलेली चरित्रे आणि पंरपरेने चालत असलेल्या आठवणी व आख्यायिका हीच नाथांची चरित्रसामग्री आहे. त्यात नवीन सामग्रीचा शोध घेण्याची धडपड नाही. त्या त्या संताचे नाव, गाव, जात, व्यवसाय, कुटुंबजीवन, आर्थिक दुरवस्था, विठ्ठलभक्ती, साधना, कवित्व आणि समाधी यांचा

अनुक्रमणिका

उल्लेख या प्रकरणांमधून येतो. त्या त्या संताच्या जीवनातील चमत्कारकथांना त्यात महत्त्वाचे स्थान आहे. प्रपंच आणि परमार्थ यातील संघर्ष आणि ताण या संतचरित्रातून व्यक्त होतात. पारमार्थिक सुखकल्पनांचा ध्यास पूर्ण झाल्याचे दाखविणाऱ्या या कथा आहेत. त्या भक्तांच्या देवप्रीतीच्या आणि देवांच्या भक्तप्रीतीच्या कथा आहेत.

०६. 'ज्ञानकथे'तील 'लीलाकथा'

ज्ञानेश्वरी, नाथभागवत आणि तुकोबांची गाथा ही वारकऱ्यांची प्रस्थानत्रयी आहे. अर्जुनाला श्रीकृष्णाने केलेला बोध ज्ञानदेवांनी मराठीत आणला. एकनाथांनी श्रीकृष्णाने उद्धवाला केलेला बोध मराठीत आणून त्याला पूर्णता दिली. या कवींसमोर खंडनमंडनपर आणि न्यायशास्त्राच्या घोटीव व भाषेत तर्कसंगत प्रतिपादन करणाऱ्या संस्कृत भाष्यग्रंथांचा आदर्श नाही. त्यांच्यापुढे आदर्श आहे तो महाभारतातील गीतेचा, भागवतातील उद्धवगीतेचा आणि योगवसिष्ठाचा. कृष्ण आणि अर्जुन, कृष्ण आणि उद्धव, वसिष्ठ आणि राम या जिव्हाळ्याच्या व्यक्तींच्या सलगीच्या संवादातून त्यांचा तत्त्वबोध प्रकट होतो. त्यामुळे त्यात तार्किकतेऐवजी भावशीलता येते. आत्मानुभवाच्या रंगाने ती खुलते. वाग्विभ्रमांनी ती रोचक होते आणि तिला ज्ञानकथेचे रूप येते. एकनाथी भागवत ही अशी ज्ञानकथा आहे.

आम्हासि पाहिजे ज्ञानकथा
वरी तुजसारिका रसाळ वक्ता ।।
- एकनाथी भागवत १/६०.

असा नाथभागवताचे श्रोते एकनाथांजवळ हट्ट धरतात.

मूळ भागवताच्या एकादशस्कंधाचे ३१ अध्याय असून १५०० श्लोक आहेत. त्यावर नाथांनी १८,८०० ओवीसंख्येची ही टीका लिहिली आहे. कृष्ण-उद्धव संवादाची बैठक कायम ठेवून नाथांनी त्याला भागवतपंथीयांच्या धर्मग्रंथाचे रूप दिले आहे. ज्ञानेश्वरीत सुचविलेले अभिप्राय नाथभागवतात विस्ताराने विशद केले आहेत. भागवतासारखा विषय, एकनाथांसारखा रसाळ वक्ता, गुरूकृपेचे पाठबळ आणि श्रोत्यांच्या अवधानामृताचे सिंचन यामुळे या ग्रंथात भावार्थाचा पावलोपावली उठाव झालेला आहे. एकनाथांच्या परमार्थाचा आणि प्रतिभेचा मध्यान्ह नाथभागवतात आहे.

रा.चिं.ढेरे यांनी संतांच्या कथांना 'ज्ञानकथा' म्हटले आहे आणि कथाकवींच्या काव्यकथांना 'लीलाकथा' म्हटले आहे.[५] जेथे प्रमेय रूचीस येते. महाबोधाची कोवळीक दुणावते ती ज्ञानकथा. जेथे लीला प्रमेयाशी गाठ घालून देते ती लीलाकथा. 'नाथभागवत' ही ज्ञानकथा आहे तर नाथांचे 'रूक्मिणीस्वयंवर' ही लीलाकथा आहे. ढेरे यांचे हे प्रतिपादन स्वीकार्य आहे तथापि एक मुद्दा असा की नाथभागवतासारखी ज्ञानकथाही अनेक लीलाकथांनी समृद्ध झालेली आहे या लीलाकथांनाही तत्त्वचिंतनाची बैठक आहे. त्याचप्रमाणे लीलाकथेतील रसिकतेचा रंग ज्ञानकथेवरही चढतो. नाथांच्या लीलाकथा भक्तिप्रेमाने अधिक सुस्नात होतात.

'ज्ञानकथे'तील 'लीलाकथे'चा नमुना म्हणून 'कुमारी गुरूकथा' (एकनाथी भागवत ०६, अध्याय ९, ओव्या ८५ ते ११४) पाहण्यासारखी आहे. मूळ भागवतात (स्कंध ११, अध्याय ९ श्लोक ५ ते ९) अशा पाच श्लोकात ही कथा आलेली आहे. तिचा नाथांनी तीस ओव्यांमध्ये विस्तार केला आहे. महातेजस्वी अवधूताच्या रूपातील श्रीदत्तात्रेय आणि यदुराजा यांच्या दीर्घ संवादात ही कथा गुंफलेली आहे. चोवीस गुरूंपैकी कुमारीला गुरू कसे केले, याची ही कथा आहे. मुळात या कथेची पार्श्वभूमी अत्यंत नाट्यपूर्ण आहे. जिचा विवाह ठरलेला आहे अशा आपल्या कन्येला घरी एकटे ठेवून तिचे आई-वडील बाहेर जातात. त्याच वेळी वराकडील ब्राह्मणमंडळी वाङ्निश्चयासाठी येतात. त्यांचे स्वागत व आतिथ्य करण्याची जबाबदारी तिच्यावर येऊन पडते. ती लाजते पण कोठे चुकत नाही. त्याची ही कथा. ती सरळ-साध्या वाक्यांमध्ये घटितांचे क्रमाक्रमाने कथन करून भागवतकारांनी सांगितली आहे. शेवटी त्यातील तत्त्वबोध सांगितला आहे. सरळ-साधे निरलंकृत गतिशील कथन आणि त्याला जोडलेला तत्त्वबोध हे या कथेचे भागवती रूप आहे.

या कथेची नाट्यपूर्ण परिस्थिती कायम ठेवून नाथांनी तीत निरनिराळे रंग भरले आहेत. वडील माणसे बाहेर कोठे गेली असता (५) असा मूळ उल्लेख. मातापिता स्वगोत्रजांसह कुलदेवीच्या यात्रेला गेली असताना (८७) असा त्याचा नाथांनी विस्तार केला आहे. त्यामुळे ते कुळ सत्शील व धर्माचरणी आहे असे सूचित होते. अशा कुळाच्या संस्कारात वाढलेली कुमारी सदाचरणी असणार, असेही त्यातून ध्वनित होते.

स्वागत केले (५) एवढे म्हणून भागवत थांबते. वातायताद्वारे आसने, गंधाक्षता, सुमने, पाने देऊन तिने दर्शन न देता मौनानेच सारे उपचार पार पाडले (८९-९०), असा तपशील देऊन नाथ कथेला भरीव करतात. भागवतात ती पाहुण्यांच्या भोजनासाठी साळी कांडते पण नाथांची कुमारी मनात विचार करते. घरात साळी नाहीत. आईला यायला

अनुक्रमणिका

उशीर होईल मग साळी कांडल्या तर जेवायला उशीर होईल आणि म्हणून ती साळी कांडू लागते. साळीकांडण करताना कंकणांचा आवाज होऊ लागतो आणि म्हणून ती प्रत्येक हातात दोन-दोनच कांकणे ठेवून कांडू लागते, अशा तिच्या कृतीचे वर्णन भागवतामध्ये येते. नाथ या कृतीमागील तिचा विचार फुलवितात. कांडण तर व्हावे पण आवाज मात्र होऊ नये म्हणून कांकणखळाळा विभागण्याची युक्ती ती शोधू लागते. आता कांकणे फोडावीत तर मुहूर्तालाच अपशकुन होईल. माझा भर्ता शतायु व्हावा म्हणून ती प्रत्येक हातात दोन-दोन कांकणे ठेवून कांडू लागते. या मनोगताला शुभाशुभाच्या संकेतामुळे संस्कृतीचा स्पर्श झाला आहे.

कुमारी पुन्हा कांडू लागली पण तरीही कांकणांचा आवाज होऊ लागला. दोघे एके ठिकाणी असल्यावर आवाज झाल्याशिवाय कसा राहील ? असा विचार करून तिने प्रत्येक हातातील एकेक कंकण काढून टाकले आणि हातात एकेकच ठेवले. मग त्या एकेका कांकणानिशी तिने जेव्हा कोडले तेव्हा आवाज झालाच नाही. अशाप्रकारे 'एकाकी' असले की ध्वनी उठत नाही. हा भाग नाथांनी जवळजवळ भागवतासारखाच सांगितला आहे.

येथे अवधूताने 'अरिन्दम्' (९) असे विशेषण यदुराजाला वापरले आहे. त्याचा ''जिणोनि प्रतिस्पर्धा भूपाळ । किंकर केले राजे सकळ । तू अरिमर्दन सबळ'' (१०३)असा ठसठशीत विस्तार नाथांनी केला आहे. आणि जोपर्यंत कामक्रोधादि शत्रूंना जिंकले नाही, तोपर्यंत 'अरिमर्दन हा बोल व्यंग'(१०४) 'मिथ्या केवळ तो गर्व'(१०३) असे अध्यात्मही त्याला जोडले आहे.

तू अवधूत व ती कुमारी घरात मग हा एकांतीचा वृत्तांत कसा कळला ? अशी मुळात नसलेली राजाची शंका ते स्वतंत्रपणे उपस्थित करतात (१०६) आणि तिजात्मभावाने चैतन्यभान येते असे तिचे निवारणही करतात (१०७-११२). हा सगळा भाग स्वतंत्र आहे. आपला श्रोता कथाश्रवण करताना निःशंक असावा, याची दक्षता नाथ कशी घेतात ते यावरून लक्षात येते शंका विचारून ग्रंथकाराला अडविणाऱ्या श्रोत्यांचा उल्लेख नाथांचे समकालीन असलेल्या दासोपंतांनीही केला आहे.

अशाप्रकारे मुळातील पाच श्लोकांचा नाथ चौदा ओव्यात विस्तार करतात. मूळ घटिताच्या कोरड्या कथनाला तपशीलाची जोड देऊन ते कथेला भरघोस करतात. भागवत कुमारीच्या कृतींचे कथन करते तर नाथ त्या प्रत्येक कृतीमागील तिचे मनोव्यापार टिपतात. त्यातून तिच्या मराठमोळ्या श्रद्धासमजुती, तिची अतिथ्यशीलता आणि तिचे चातुर्य अधोरेखित होते. त्यामुळे कुमारीच्या व्यक्तिरेखेला गुणसंपन्नता प्राप्त होते ती शालीन, चतुर वाग्दत्त वधू साक्षात होते. एका वेगवान आणि नाट्यपूर्ण घटिताचे नाथांनी नाट्यपूर्ण, उत्कंठाजनक आणि चातुर्यपूर्ण कथेत रूपांतर केले आहे. स्फुट आख्यानांपेक्षा नाथांची ग्रंथांतर्गत आख्याने अधिक कौशल्यपूर्ण निवेदनाने नटलेली आहेत, हे अशा ठिकाणी जाणवते.

कुमारी गुरूकथा ही एक चातुर्यकथा आहे. तिचे 'कंडणकाळीचे विंदान' आणि त्यातील चतुरलक्षण रंगवून सांगणे, हे या कथेचे एक अंग आहे. अर्थात ती केवळ चातुर्यकथा नाही, तर एक बोधकथाही आहे. ज्यावेळी या विश्वात सामान्य नजरेला भेदाभेदाचा पसारा दिसतो. एकत्वाऐवजी अनेकत्वाकडे लक्ष विभागले जाते तेव्हा 'आवाज होतो'- म्हणजे संसारयातना सोसाव्या लागतात. जेव्हा अनेकत्वातून एकत्वाची जाणीव प्रकटते तेव्हा परमशांतीचा अनुभव येतो. हा पारमार्थिक अनुभव येतो. हा पारमार्थिक अनुभव 'एकपणा'तून जन्माला येतो. हातात एकेक कंकण ठेवून कांडणाऱ्या त्या कुमारीने आपल्या चतुरलक्षणाने जणू हेच सुचविले होते. यासाठीच अवधूताने तिला गुरू मानिले.

एकाकी जाहल्यावीण तत्त्वतां । ते अवस्था न चढे हाता (८६)

या सूत्राच्या स्पष्टीकरणासाठीच ही कुमारी गुरूकथा सांगितली गेली आहे. कुमारी गुरूकथा अशी चातुर्यकथा आणि बोधकथा आहे. परमार्थ प्रापंचिकांच्या भाषेत सांगणे हा नाथांच्या प्रतिभेचा ध्यास आहे. आणि म्हणून कथानुसंधानाची गोडी कायम ठेवून ते त्यात अध्यात्मनिरूपणाचा रंग भरतात. येथेही कुमारीचे चातुर्यलक्षण सांगता सांगता परमार्थाचे परमगुह्य त्यांनी प्रगट केले आहेत. नाथभागवतात अशी किती तरी लीलाख्याने येतात आणि नाथांच्या कथनकौशल्याची ग्वाही देतात.

०७. रूक्मिणी-स्वयंवर : प्रेमभक्तीचे प्रबंधरूपक

एकनाथांनी केवळ स्फुट किंवा ग्रंथांतर्गत कथाकविता लिहिली नाही. तर काव्यप्रबंध आणि महाकाव्य या दोन्ही प्रकारात अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि गुणपूर्ण कथाकाव्ये लिहिली. त्यामुळे केवळ संतपरंपरेतच नव्हे तर कथाकवींच्या परंपरेतही ते एक महत्त्वाचे कवी ठरतात. त्यांच्या दीर्घ

कथाकाव्यांचा थोड्या विस्ताराने परिचय करून घ्यावयाचा आहे.

मध्यम विस्ताराच्या रसपूर्ण काव्यांना काव्यप्रबंध असे म्हणतात. अशा कथात्म काव्यातील कथानक, प्रसंग, पात्रे, वर्णने रसाला आमुख असावी लागतात. मराठी काव्यप्रबंध 'स्वयंवरप्रधान' आहेत. याचे कारण कथानकाची रचना भरतमुनींच्या संधीनुसार आणि भामहाच्या सर्गलक्षणानुसार करणे सहज शक्य होते. स्वयंवराची आख्यानवस्तु शृंगार आणि वीर अशा दोन रसांना वाव देणारी असल्याने लोकहृदयाला भिडणारी आणि आवडणारी असते. यशस्वी, आकर्षक आणि मनमोहक काव्यनिर्मितीसाठी आवश्यक ते सारे घटक स्वयंवराच्या आख्यानवस्तूत उपस्थित असतात. त्यामुळे स्वयंवराख्याने जशी कविप्रिय असतात तशी जनरूचीशी संवाद साधणारी असल्याने लोकप्रियही होतात.

संस्कृत परंपरेतील स्त्रोतग्रंथ आणि आधारग्रंथ यांच्या अनुरोधाने मराठी कवींनी भक्तिभावनेचा उत्कर्ष होईल अशा पद्धतीने आपापल्या स्वयंवराख्यानांचा विस्तार केला. त्यांना भगवंताच्या लीलाख्यानांचे स्वरूप आले. त्यामुळे त्यात शृंगारवर्णने राहिली पण शृंगाररसाला महत्त्व राहिले नाही. शृंगाराच्या जागी भक्तीला केंद्रिय स्थान मिळाले. मुळातील वीररस मात्र टिकून राहिला. मराठी काव्यप्रबधांना संस्कृत काव्यप्रबंधांपेक्षा असे निराळे रूप प्राप्त झाले.

'रूक्मिणीस्वयंवरा'ची नायिकाप्रधान कथावस्तु आपल्या वेगळेपणामुळे अनेक संभवगर्भ बीजे आपल्या उदरात वागविणारी आहे. त्यांना साक्षात करणारे प्रबंधरूपक म्हणून एकनाथांच्या 'रूक्मिणीस्वयंवरा'" कडे पहावे लागते.

श्रीखंड्यारूपाने नाथांच्या घरी सेवा करून गेलेल्या श्रीकृष्णाचा हा राहून गेलेला विवाहसोहळा आहे, किंवा ज्येष्ठ कन्येच्या विवाहसोहळ्याचे सुखद स्मरण आहे, अशा हृद्य कल्पना 'रूक्मिणीस्वयंवरा'ची निमित्तकारणे म्हणून पुढे आलेल्या आहेत. तथापि नाथांनी तशी काही नोंद केलेली नाही. मनात काही नसताना एकाएकी कृष्णदीप उजळला आणि सांगता येऊ नये अशा अनावर आवेगाने काव्यरचना झाली, असा आपला अनुभव नाथांनी नोंदविला आहे. या उत्स्फूर्ततेचा ताजेपणा आणि टवटवीतपणा 'रूक्मिणीस्वयंवरा'त जाणवतो.

एकनाथांचे 'रूक्मिणीस्वयंवर' (इ.स.१५७१) हे अठरा प्रसंगामध्ये विभागलेल्या १७०३ ओव्यांचे आहे. 'श्रीमद्‌भागवता'च्या दशमस्कंधात येणारी ही कथा 'हरिवंशा'चाही आधार घेऊन नाथांनी गायिली आहे. बहिरा जातवेदांच्या 'भैरवी'टीकेचेही (इ.स.१४६७) काही ऋण त्यांच्यावर आहे. महानुभावीय रूक्मिणीस्वयंवरांची परंपरा ऐन भरात असली तरी ती सांकेतिक लिपीत बंदिस्त झाल्याने नाथांसमोर नव्हती. त्यामुळे तिचे कोणतेही परिणाम नाथांवर नाहीत. महानुभावेतर खुल्या मराठी वाङ्मयव्यवहारात वारकरी संप्रदायाच्या कुशीत फुललेली पहिली स्वतंत्र काव्यकृती म्हणून या 'रूक्मिणीस्वयंवरा'कडे पाहावे लागते.

काशीच्या संस्कृताभिमानी पंडितांमुळे नाथांच्या भागवती टीकेचे लेखन मध्येच काही काळ थबकून राहिले. मनाच्या अशा आविष्कारातुर अवस्थेत नाथांनी भागवतातील गोड कृष्णकथा निवडली आणि तत्त्वचिंतनाने तिला भारून टाकले. काशीच्या प्रवासात आरंभ केलेले हे 'रूक्मिणीस्वयंवर' काशीलाच पूर्णतेस गेले आणि मग नाथ भागवती टीकेकडे वळाले. त्यामुळे कृष्ण-रूक्मिणीची ही प्रीतिकथा जीवाशिवाच्या सायुज्याची कथा झाली आहे.

कृष्ण-रूक्मिणीचे मीलन आणि जीवाशिवाचे सायुज्य अशी दोन अंग असलेली ही कथा आहे. सामन्य संसारी जन आणि मुमुक्षू अशा दोन प्रकारच्या श्रोत्यांसाठी सांगितलेली ही कथा आहे. त्यामुळे ती रूपकांच्या भाषेत बोलकी झालेली कथा आहे. त्यातील सुट्या उपमेयांची आणि उपमानांची संगती प्रत्येक वेळी अन्वर्थक वाटेलच असे नाही. तथापि उपमेयांची संगती व उपमानांची संगती यांची परस्परसंगती पाहिली तर त्यातील औचित्य, समर्पकता आणि सौंदर्य यांची प्रतीती येऊ शकते. नाथांचा अनुभव केवळ लौकिकाचा किंवा अलौकिकाचा नाही, तो लौकिक आणि अलौकिक यांचा संयुक्त अनुभव आहे. त्यामुळे रूपक हीच त्याची स्वाभाविक भाषा ठरते.

शिव हा श्रीकृष्ण, जीव ही रूक्मिणी, विवेक व श्रद्धा म्हणजे भीमक व शुद्धमती, विकल्प हा रूक्मी अशी ही अमूर्त आध्यात्मिक कल्पनांचे मूर्तिकरण करणारी पात्रसृष्टी आहे. त्यांच्या प्रकृतिविशेषातून घडणाऱ्या क्रियाप्रतिक्रियातून 'रूक्मिणीस्वयंवरा'च्या रम्याद्‌भूत कथेचा रसप्रवाह नाट्यपूर्ण वळणे घेत वाहत राहतो. उत्तर भारतात सूफी कवींनी आरंभ केलेल्या रूपकशैलीला दिलेला 'रूक्मिणीस्वयंवर' हा महाराष्ट्रीय प्रतिसाद आहे. एकनाथांच्या बौद्धिक कल्पनाविलासाचा तो चमत्कृतिप्रधान नमुना आहे.

रूक्मिणीहरणासाठी ७ प्रसंग (ओव्या ५५१), युद्धासाठी ६ प्रसंग (ओव्या ५५८) आणि विवाहसोहळ्यासाठी ५ प्रसंग (ओव्या ५९४) अशी नाथांची विभागणी आहे. प्रसंगांची संख्या कमी होत जाते त्याच वेळी ओव्यांची संख्या मात्र वाढत जाते. नाथांनी तिन्ही मुख्य कथाघटकांना सारखाच भाषिक अवकाश दिला आहे. हरण, युद्ध व विवाह या तिन्ही समबल कथाघटकांचा त्यांनी समतोल विस्तार केला आहे. त्यामुळे 'रूक्मिणीस्वयंवर' हे प्रमाणबद्ध बांधणीचे आणि सुयोग्य गुंफणीचे काव्य झाले आहे.

'रूक्मिणीस्वयंवर' ही लौकिक आणि अलौकिक यांचा परस्परानुप्रवेश असणारी दिव्य-मानुष कथा आहे. शृंगार आणि वीर या दोन लोकभोग्य रसांना अवसर देणारी ही काव्यवस्तु एकनाथांनी भक्तीच्या डोळ्यांनी पाहिली आणि नवरसांना ब्रह्मरसाने भिजवून मांडली. त्यामुळे ती शांतरसप्रधान झाली आहे.

धर्ममान्य ग्रंथांनी उभ्या केलेल्या आणि लोकमानसात रूजलेल्या पुरणप्रसिद्ध पात्रांच्या प्रतिमा नाथांनी तशाच उभ्या केल्या आहेत. आध्यात्मिक प्रतीक म्हणून त्यांना एक वेगळेपणाही दिला आहे. नायक परमेश्वर असल्याने लौकिक नाती पुसली जातात आणि त्यांच्यात अलौकिक संबंध प्रस्थापित होतात.

सगुणाचे रेखाटन करताना निर्गुणाचे भान ठेवणारी रूपवर्णने, अनुभवाने रसरशीत झालेली युद्धवर्णने आणि आल्हाददायक शांत मनःस्थितीचा प्रसन्न अनुभव देणारे विवाहवर्णन 'रूक्मिणीस्वयंवरा'च्या सर्वपरिचित कथेत नावीन्य निर्माण करतात. एकनाथांची व्यासंगपूर्ण कथनशैली आणि आलंकारिक कल्पनाविलास 'रूक्मिणीस्वयंवरा'स मनोरम सौंदर्य प्रदान करतात.

'रूक्मिणीस्वयंवरा'ची मोहिनी अशी की त्यानंतर पंचवीस वर्षांनी 'भावार्थरामायणा'तील सीतास्वयंवर रंगविताना नाथांना त्यातील भक्तितत्त्वे, कल्पना, वर्णने आणि शब्द यांचा अनुकार करावासा वाटला. त्याच्या प्रभावाने जनी जनार्दनांना 'सीतास्वयंवरा'तही आध्यात्मिक अर्थ शोधावासा वाटला. सामराज, विठ्ठल बीडकर अशा अनेकांच्या रूक्मिणीस्वयंवरावर नाथांच्या 'रूक्मिणीस्वयंवरा'ची छाप आहे. 'हरिवरदा'कार कृष्णदयार्णवांनी तर नाथांचे 'रूक्मिणीस्वयंवरा' जसेच्या तसे आपल्या ग्रंथात समाविष्ट केले आहे. मध्ययुगीन मराठीतील महानुभावेतर रूक्मिणी व सीता यांची स्वयंवराख्याने नाथांच्या काव्यप्रबंधाने प्रभावीत झालेली आहेत.

आख्यानक कवितेची खंडित झालेली परंपरा एकनाथांनी 'रूक्मिणीस्वयंवरा'च्या निमित्ताने पुनरूज्जीवित केली. प्रपंच आणि परमार्थ यांची मिळणी असणारी ही गोड कथा रूपकशैलीने गुंफून त्यांनी स्वयंवरकाव्याचा व रूपकाख्यानाचा आकर्षक बंध सिद्ध केला. त्याचा काव्यास्वाद घेणारे रसिक श्रोते

आधीच कृष्णकथा सखोल । त्याहीवरी तुझे रसाळ बोल
जाणसी प्रेमाची बोल । येताती डोल सुखाचे
रू.स्व.१५/१६१

असे प्रेमसुखाने डोलत राहतात आणि ते पाहून - ऐकून
ऐकोनि श्रोतयांचे वचन । आनंदला एका जनार्दन
मने करूनि लोटांगण । वंदिले चरण निजभावे
रू.स्व. १५/१६२

अशी कवी एकनाथही धन्यता अनुभवतात.

०८. प्रपंच - परमार्थी सावध करणारे 'भावार्थरामायण'

'भावार्थरामायण'[०८] हे मराठीतील पहिले आणि सगळ्यात मोठे असे रामायण आहे. हा २९७ अध्यायात विभागलेल्या ४०,००० ओव्यांचा ग्रंथ आहे. त्याच्या घडणीत अनेकांचे हात लागले असले तरी तो मुख्यतः एकनाथांच्या नावावर मोडतो. या ग्रंथाची पाच कांडे व सहाव्या कांडाचे चव्वेचाळीस अध्याय अशा एकूण १७२ अध्यायांच्या २५००० ओव्या लिहून नाथ निजधामास गेले (इ.स.१५९९) नाथांचे शिष्य गावबा यांनी युद्धकांडातील ४८ अध्याय व सातवे उत्तरकांड पूर्ण अशा १२४ अध्यायांच्या १५००० ओव्या लिहून या ग्रंथाला पूर्णता दिली. सहावे युद्धकांड संपूर्णपणे नाथांनीच लिहिले असा साधार युक्तिवादी ज.स.करंदीकर[०९] यांनी केला आहे. तो मान्य केला तर नाथांची रचना ३४६०० ओव्यांची ठरते आणि गावबांची रचना ५४०० ओव्यांची ठरते. या युद्धकांडात अहिमहिरावणाख्यान राहून गेले किंवा गहाळ झाले अशा समजुतीने जयरामसुत या कवीने त्यात अध्याय ५१ ते ५४ अशा चार अध्यायांची भर घातली. आणि तशी नोंदही केली. गावबा यांच्या बरोबरच नाथांचे नातू मुक्तेश्वर, कोनेरीसुत शेष आणि कोणी अनाम कवी यांनी उत्तरकांड लिहून आपआपल्या परीने 'भावार्थरामायणा'च्या परिपूर्तीचे प्रयत्न केले. ही बाब 'भावार्थरामायणा'च्या कविप्रियतेची आणि लोकमान्यतेची निदर्शक आहे.

'भावार्थरामायण' हे शीर्षक नाथांची भावशील भक्तीची भूमिका सूचित करेते. 'वाल्मीकिरामायण' ' यथार्थ' दाखविण्याच्या पकडीतून ते स्वतःची सुटका करून घेते आणि श्रीज्ञानदेवांच्या 'भावार्थदीपिका' या ग्रंथशीर्षकाशी संवाद साधते. वाल्मीकिरामायणाबरोबरच इतर संस्कृत रामकथा आणि लोकजीवनात प्रसृत झालेली तिचे रूपे यांचाही नाथांनी आदर केला. त्यामुळे त्यांच्या 'भावार्थरामायणा'ला रामपर भक्तिप्रधान कथाकोशाचे रूप आले आहे. नाथांची बहुरंगी रामायणरचना स्वयंप्रज्ञेबरोबरच त्यांच्या व्यासंगाचीही साक्ष देणारी झाली आहे. त्यामुळे वाल्मीकींपासून नाथांच्या काळापर्यंत रामकथेत जी स्थित्यंतरे झाली त्यांचे प्रतिनिधिक रूप 'भावार्थरामायणा'त आढळते.

रामचरित्र हे साधकाला आत्मसाक्षात्काराकडे नेणारे साधन आहे, असे नाथ श्रोत्यांना दाखवून देतात. राम हेच परब्रह्म आहे हा 'भावार्थ' नाथांनी कधीही नजरेआड होऊ दिलेला नाही. अध्यात्मविवेचन आणि परमार्थबोध 'भावार्थरामायणा'त वेगवेगळ्या प्रकारांनी येतो. कथेच्या ओघात त्यांनी भक्तितत्त्वांचे तन्मयतेने विशदीकरण केले आहे. सगुणभक्तीला धक्का न लावता अद्वैतबोध करून दाखविण्याची कठीण किमया त्यांनी सहजतेने साधली आहे. 'भावार्थरामायणा'त कथाप्रसंगही अध्यात्मपर आहेत आणि अध्यात्मातही सगुण प्रेमाची गोडी कायम राहिली आहे. सगळी पात्रे रामभक्तीच्या रसधारेत भिजून चिंब झाली आहेत. 'कथाप्रसंग, वर्णन, संवाद, इत्यादी काव्यांगाची विणवणी करताना त्यांनी अध्यात्माचा धागा एकदाही सोडला नाही. सीतारामांची ही प्रापंचिक कथा त्यांनी परमार्थमय करून टाकली आहे'[६] असे डॉ. शं.गो.तुळपुळे यांच्या शब्दात म्हणणे योग्य ठरेल.

'भावार्थरामायणा'चा वाच्यार्थ रामकथा असला तरी व्यंग्यार्थ अध्यात्म हाच आहे. त्यामुळे भावार्थरामायण आपल्या वेगळेपणाने उठून दिसते. त्यात भक्ती आणि अवतारकल्पना यांचा अनुप्रवेश होतो. त्यामुळे रामरावणांच्या उग्र संघर्षाची ही कथा पार्थिव राहात नाही. ती धर्म आणि अधर्म, न्याय आणि अन्याय यांची अलौकिक संघर्षकथा बनते. तिचे मानुष रूप पुसले जाऊन तिला दिव्यमानुष कथेचे रूप लाभते. येथेल्या पात्रांचे मनोभाव आणि प्रसंगांची घडण यावर भक्तीची शांत सुषमा पसरली आहे. तथापि एकनाथांनी रामकथेला दिलेला हा नवार्थही सापेक्ष आहे. जैन, बौद्ध आणि भागवत या सांप्रदायिकांनी केलेल्या संस्करणामुळे वीरकाव्य असलेले रामायण, धार्मिकतेकडे झुकले. शांत व करूण रसांना प्राधान्य मिळाले. ते भक्तीने भारले गेले. रामभक्ती पल्लवीत होऊ लागतातच अध्यात्मरामायण, अद्‌भुतरामायण, आनंदरामायण, तत्त्वसंग्रह रामायण यासारखी किती तरी सांप्रदायिक रामायणे अवतरली. संस्कृत रामकथांचे हे भक्तिप्रवण रूप एकनाथांच्या 'भावार्थरामायणा'त मराठी पुराणांच्या थाटाघाटात अवतरले आहे.

काव्यरचनेसाठी रामायणाची निवड करण्यात एकनाथांनी समयज्ञता आणि समाजप्रवणता दाखविली. विजयनगरच्या साम्राज्याचा अस्त झाला आणि इस्लामी वर्चस्वाला बांध घालील असा कोणी राहिला नाही. अशा असाहाय्य अवस्थेत दुष्टांचे निर्दालन करून देवांची बंदिवासातून सुटका करणाऱ्या रणकर्कश रामाचा धावा नाथांना करावासा वाटला. यात नवल नाही. नाथांचा राम केवळ संसारबंधमोचक नाही तो सूरबंधमोचकही आहे. त्याच्या रूपाने आत्मविस्मृत समाजाला कर्तव्योन्मुख करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. रामाची भूतकालीन कथा सांगताना नाथ स्वकालाशी त्याचा अन्वय लावतात. स्वकालाचे चित्रण करताना त्याला एक दिशा देतात. 'उभवा रामराज्याची गुढी' असे एक स्वप्न देतात. इस्लामी आक्रमकांच्या वरवंट्याखाली चिरडल्या गेलेल्या महाराष्ट्राची अपूर्ण स्वप्ने आणि मनोवांछिते येथल्या कौत्सल्येच्या डोहाळ्यातून बोलकी झाली आहेत. धर्माच्या पायावर उभे राहिलेले, सर्व प्रकारच्या समृद्धीने भरलेले आणि दैत्यदुःखाचा निरास करणारे रामराज्याचे स्वप्न त्यातून प्रकटले आहे. जनसामान्यांच्या एकजुटीच्या बळावर मदांध सत्तेवर घाव घालण्याचे दुर्मिळ धैर्य, युद्धोत्साह आणि स्वातंत्र्यकांक्षा त्यात आहे. भूतकालीन परंपरेतून वर्तमानाला भविष्योन्मुख करण्याचे सामर्थ्य नाथांच्या रामायणात आहे. समाजमनाशी स्पंदन पावण्याचे हे सामर्थ्य आहे. हे परिस्थितीजन्य परिमाण पुढे रोकड्या आर्षबोलांनी रामदासी रचनेत अधिक ठसठशीत होते. 'प्रपंच परमार्थी सावधान' करणाऱ्या भावार्थरामायणात पुढील 'समर्थयुगा'ची चाहूल लागते. सीतारामांची ही कथा जशी पारमार्थिक आहे तशी प्रापंचिकही आहे. तिच्यात समकालीन युगमानसाचे हुंकार प्रतिध्वनित झाले आहेत.

देवांच्या रक्षणकर्ता राम आणि त्यांचा छळ करणारा रावण यांच्या संघर्षात मध्ययुगातील स्वदेशी आणि परकीय आक्रमक यांच्यातील झगडा प्रक्षेपित झाला आहे. रामावतराचा हा आदर्श सारख्याच परिस्थितीत जगणाऱ्या भारतभरच्या संतांना सार्वत्रिक असा प्रतीत झाला. याचा पुरावा म्हणून बंगालमधील

कृत्तिवासांचे 'रामायण', उत्तर प्रदेशातील तुलसीदासांचे 'रामचरितमानस', आसामातील माधव कंदलीचे 'विलंकारामायण', कर्नाटकातील तोरवेचे 'रामायण', तामिळनाडूतील केबणाचे 'रामायण' अशा निरनिराळ्या भाषांतील रामायणाकडे पाहता येईल. 'भावार्थरामायण' हा महाराष्ट्रातील असा आविष्कार आहे. नाथांचे 'भावार्थरामायण' म्हणजे स्वदेश, स्वराज्य आणि स्वधर्म यांच्या रक्षणाच्या समकालीन उर्मींना उद्‌गार देणारा वाङ्मयीन प्रतिसाद आहे.

शांत व भक्ती या रसांमध्ये डुंबणाऱ्या मराठी कवितेला विविध मानवी भावनांनी गजबजलेल्या रसविश्वाची दारे एकनाथांच्या 'भावार्थरामायणा'ने उघडली. रसरशीत अशा वीररसाचा उग्र स्पर्शही मराठी कवितेला प्रथम झाला तो या रामायणातून. महानुभावांच्या 'बंद वाङ्मयव्यवहारा' बाहेर खुल्या मराठी परंपरेत 'भावार्थरामायणा'ने वीररसाचा ठसठशीत आविष्कार घडविला. त्याप्रमाणे हास्यरसही खेळविला. नाथांच्या निरोगी जीवनासक्तीची आणि सर्वांगीण दृष्टीची ही साक्ष आहे. मर्यादापुरूषोत्तम श्रीरामाची कथा सांगताना नाथांनी गृहस्थाश्रमातील स्वानुभवांची जोड देऊन कुटुंबनीतीचा आदर्श स्पष्ट केला आहे. परमार्थाप्रमाणे प्रपंचाच्या रंगाने रंगलेल्या या कथेत कौटुंबिक माधुर्याचा गोड आविष्कार होतो. हा कौटुंबिक गोडवा दुसऱ्या कोणत्याही मराठी रामायणात अनुभवायास मिळत नाही.

एकनाथांचा व्यासंग दांडगा होता. त्याला आत्मानुभवाची जोड होती. उघड्या डोळ्यांनी त्यांनी भारतभर यात्रा केल्या होत्या. देशाटनाने आलेली बहुश्रुतता आणि लोकोद्धाराची तळमळ यामुळे सांगण्यासारखे बरचसे नाथांच्या मनात दाटलेले होते. तेच त्यांच्या 'भावार्थरामायणा'तून प्रवाहित झालेले आहे. त्यावेळच्या आचारभ्रष्टतेवर नीतिमान आणि मूल्यगर्भ रामचरित्र हा एक उतारा होता. आपल्या काव्यधारणेप्रमाणे नाथांनी विनोदरम्य अशी रामकथा प्रसन्न मनाने, रेखीव पद्‌बंधातून आणि परमार्थाचा गाभा उघड होईल अशा पद्धतीने येथे सांगितली आहे.

श्री एकनाथांचे 'भावार्थरामायण' हा समग्र रामकथा मराठीत आणण्याचा सगळ्यात मोठा महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे. उपलब्ध वाङ्मयपरंपरा, लोकमानसाचा कल आणि युगधर्माचे स्फूरण यांचा आदर करून नाथांनी समकाळाशी संवाद साधणारे रामकथेचे स्पंदनशील रूप घडविले. 'श्रीराम संचरोचिन पोटी । दाटोवाटी लिहवीत' अशा तन्मयतेच्या तंद्रीत त्याचे लेखन झाले आहे. रामचरित्राच्या सार्वकालिक आदर्शाची व्यापकता आणि समकाळातील त्याच्या अनुसरणाची निकड हेरून सगुणरूपात प्रकटलेल्या निर्गुण परब्रह्माचे गायन व विवरण नाथांनी जाणीवपूर्वक केले. त्याद्वारे त्यांनी ज्ञान, कर्म व उपासना यांचा समतोल साधून धर्मजीवनाची अंगे परिपुष्ट केली. 'भावार्थरामायण' हे एकनाथांच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचा आणि परिणतप्रज्ञेचा आविष्कार आहे.

'भावार्थरामायणा'च्या रूपाने एकनाथांनी प्रदीर्घ कथाकाव्याचा नवा रचनाबंध घडविला. ग्रांथिक आणि मौखिक परंपरेचे बळ शोषून त्यातील मूळ कथा पुष्ट झालेली असते. भक्तीच्या मध्यवर्ती आसाभोवती ती फिरते. साहजिकच देवावतारी नायक तीत प्रधान असतो. त्यामुळे लौकिक आणि अलौकिक, प्रपंच आणि परमार्थ यांची गुंफण तिच्यात सहज होते. या विरूद्ध प्रकृती पातळ्यांना एकत्र आणण्यासाठी रूपकशैलीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे लौकिक घटनांना आध्यात्मिक रंग चढतो आणि कथाकाळ स्वकाळाशी जोडला जातो. प्रसंगाच्या ओघात तत्त्वचर्चा आणि नीतिमूल्यांचे विवरण केले जाते. अतिशयोक्ती, अद्‌भुतरम्यता आणि विनोद यासारखे रंजनपर घटकही उपस्थित असतात. सर्वसाधारणांना भक्तिप्रवण करणारा आशय येथे व्युत्पन्नता, अलंकार आणि नागर पदबंध या विदग्ध वाङ्मयाभिरूचीच्या वळणावाकणांनी अभिव्यक्त होत राहतो. एकनाथांनी घडविलेल्या या रचनाबंधाने मराठी प्रदीर्घ कथाकाव्यांचे रचनाबंध कमी-अधिक प्रमाणात संस्कारित झालेले आहेत.

मराठी रामायणांवर 'भावार्थरामायणा'चा ठसठशीत प्रभाव आहे. गावबा, मुक्तेश्वर, केनेरीसुत शेष आणि अनाम कवी यांनी अपूर्ण राहिलेल्या 'भावार्थरामायणा'ची परिपूर्ती करून नाथांना आदरांजली वाहिली आहे. उत्तरकालीन कवी 'भावार्थरामायणा'च्या रचनाबंधाने कमी-अधिक प्रमाणात प्रभावित होत राहिले. कविप्रवर मुक्तेश्वरांचे 'संक्षेपरामायण' हा 'वाल्मीकिरामायणा'चा संक्षेप नसून 'भावार्थरामायणा'चा संक्षेप आहे. समर्थ रामदासांचे 'दुकांडी रामायण' हे नाथांच्या वाटेने पुढे जाऊ पाहते. श्रीधरस्वामींच्या 'रामविजया'वर 'भावार्थरामायणा'चा जाणवण्यासारखा ठसा उमटलेला आहे. जनी जनार्दनांचे 'जानकीसैंवर' आणि विठ्ठल बीडकर व वेणाबाई यांची 'सीतास्वयंवरे' 'भावार्थरामायणा'चे अनुसरण करणारी आहेत. रंगनाथस्वामी निगडीकरांचा 'रामजन्म' आणि आनंद मेथवडकरांचे 'कुशलवाख्यान' 'भावार्थरामायणा'ने प्रभावित झालेले आहे. आर्षग्रंथांच्या मराठीकरणाला चालना देणारा आणि त्या परंपरेवर प्रभाव गाजविणारा असा हा ग्रंथ आहे.

अनुक्रमणिका

'भावार्थरामायण' हा आकाराने, अंतरंगाने आणि गुणवत्तेने एक मोठा - बृहद्ग्रंथ आहे. त्याच वेळी मराठी रामकथेवर व दीर्घ काव्यांवर प्रभाव गाजविणारा बीजग्रंथही आहे. त्यातील बीजांचा वेगवेगळ्या प्रकारांनी झालेला विस्तार आणि विकास आपल्याला पुढील काव्यपरंपरेत दिसून येतो. त्यामुळे 'भावार्थरामायण' ही मराठी कथाकवितेतील एक महत्त्वपूर्ण भर ठरते.

०९. समारोप

एकनाथांच्या कवितेचे पात्र नाथसागरासारखे विशाल आणि सर्वसमावेशक आहे. धर्मसभेतील विद्वान पंडित, काव्यमर्मज्ञ रसिक, ज्ञानी आर्त मुमुक्षू, शेतकरी, अलुतेदार-बलुतेदार, अस्पृश्य, भटके आणि आदिवासी अशा विशाल समाजाला डोळ्यापुढे ठेवून त्यांच्या सुखदुःखाशी संवाद करणारा आणि विविध श्रोत्यांची काव्यभिरूची लक्षात घेऊन कविता लिहिणारा दुसरा कवी जुन्या मराठीत दाखविता येत नाही.

त्यामुळे नाथांची कविता आपोआपच बहुरूपिणी झालेली आहे. संतकवितेच्या केंद्रस्थानी ईश्वरप्रतिमा आहे. दक्षिणेतून आलेली विठ्ठलभक्ती आणि उत्तरेतून आलेली कृष्णभक्ती यांचा संगम यादवकालीन नामदेव - ज्ञानदेवांच्या कवितेत आहे. एकनाथांनी उत्तरेतील रामभक्तीचा प्रवाह आणून त्याला त्रिवेणीसंगमाचे रूप दिले. वारकऱ्यांच्या 'रामकृष्णहरि' या महामंत्राची सुरूवात रामापासून होते. वारकरी फडावर रामजन्माचे व हनुमानजन्माचे कीर्तन पहिल्यापासून होत आले आहे. रामावरताचे मर्म ज्ञानदेवांनी नेमके सांगितले आहे.

जेणे देवांच्या मानु गिंवसिला । धर्मासि जीर्णोद्धारू केला
सूर्यवंशी उदेला । सूर्य जो कां ।।
ज्ञानेश्वरी १०/२५४

हाच कोदंडधारी, देवांची बांधिवडी सोडविणारा धर्मरक्षक, प्रतापसूर्य रामचंद्र 'भावार्थरामायणा'च्या केंद्रस्थानी आहे. या रामायणानंतर महाराष्ट्रात रामोपासनेला बहर आला. रामोपासनेला केंद्र करणाऱ्या समर्थ-संप्रदायाची काही प्रेरणा 'भावार्थरामायणा'त आहे. श्रीरामविषयक काव्यलेखनालाही त्यामुळे बहर आला.

श्रीविठ्ठलाविषयीची भक्ती आणि प्रीती व्यक्त करणारी आत्मोद्गारी भावकविता त्यांनी लिहिली त्याचप्रमाणे विठ्ठलाच्या वात्सल्याच्या आणि भक्तिकैवाराच्या जुन्या कथांना त्यांनी नवा उजाळा दिला. भक्तांच्या संकटात धावून जाणारा, त्यांच्याबरोबर शेतारानात राबणारा. दळू-कांडू लागणारा असा भक्तवत्सल विठ्ठल त्यांनी समूर्त केला. भक्तीचा गौरव केला. समतेचा पुरस्कार केला. भाव हेच प्रमाण आहे, असे गर्जून सांगितले. पौराणिक भक्तांविषयीची श्रीकृष्णाची लीलाख्याने त्यांनी जशी गायिली तशी श्रीविठ्ठलाच्या भक्तजनांनी संतचरित्रेही त्यांनी गायिली आणि यादवकालापासून आलेला काव्यप्रवाह अधिक समृद्ध केला.

श्रीकृष्णकथेतील शृंगाराला उद्गार देणारी कविता लिहून एकनाथांनी प्रणयकाव्याला भक्तीच्या क्षेत्रात प्रवेश मिळवून दिला. संस्कृत प्रणयाख्यानांच्या कथावस्तू कृश होत्या. त्यात शृंगारवर्णनांवर भर होता. नाथांनी देवविषयक प्रणयाचा आविष्कार करून आख्यानवस्तूला अधिक भरीव केले. त्यामुळे संस्कृत प्रणयाख्यानक कवितेचा पुढचा टप्पा म्हणून मराठी प्रणयाख्याक कविता विकसित झाली. नाथांच्या या कवितेमागे मधुराभक्तीची प्रेरणा नाही. त्यामागे गोपींच्या प्रेमभावाचे वर्णन करण्याची प्रेरणा आहे. आध्यात्मिक प्रतिमानांचा वापर करून नाथांनी शृंगारकवितेच्या संकेतांना एक वेगळी प्रतिष्ठा मिळवून दिली. तिला कृष्ण-गोपीप्रेमाची एक दिशा मिळवून दिली. कधी भक्तीचा भाव व्यक्त केला तर कधी प्रेमाचा भाव व्यक्त केला. त्याच बरोबर प्रेम व भक्ती यांचा एकात्म आविष्कारही घडविला. या प्रकारची कविता लोकसाहित्य - नामदेव - एकनाथ - वामनपंडित या क्रमाने मराठीत विकसित झाली. वामनपंडितांपासून भक्तीच्या आवरणाखाली प्रछन्न शृंगारवर्णनांकडे ती झुकत गेली हे शाहिरी कवितेवरून दिसून येते.

विविध काव्यप्रकारांचा शोध घेणे आणि गरजेनुसार त्यांचा वापर करणे हे नाथांच्या कविप्रकृतीचे एक वैशिष्ट आहे. आरती, जोहर, भारूड, गौळणी, विराण्या, आख्याने, चरित्राख्याने, संवादाख्याने, प्रणयाख्याने, काव्यप्रबंध, महापुराण किंवा महाकाव्य, भाष्यकाव्य, कथाभाष्य असे कितीतरी वेगवेगळे काव्यबंध नाथांनी वापरले. त्यामुळे त्यांची कथाकविताही विविध काव्यबंधातून अवतरलेली दिसते.

नाथांच्या कथाकवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य येथे नोंदविता येईल. ज्ञानोबापासून तुकोबापर्यंतच्या संतांचे प्रतिपाद्य अध्यात्म आहे, परमार्थ आहे. या अलौकिकाचा प्रत्यय जनसामान्यांना यावा म्हणून ते लौकिकाचा आधार घेतात. त्यामुळे त्यांचे लेखन आपोआपच आलंकारिक बनते. तेथे अलौकिक हे उपमेय आहे. आणि लौकिक ह उपमान आहे. देवाचा निरोप घेऊन निघताना तुकोबांचे पाय जड

अनुक्रमणिका

होतात. चित्तात काहूर माजते. हा ईश्वराच्या वियोगाचा अनुभव त्यांना सांगावयाचा असतो. त्यासाठी सासरी निघालेली कन्या पुन्हापुन्हा मागे वळून पाहते. असा सामान्य सांसारिकाला सहज पटण्यासारखा दृष्टांत ते देतात. त्यामुळे श्रोत्याला कन्याविरहाचा अनुभव आठवतो आणि त्याच्या आधारे तो तुकोबांच्या ईश्वरविरहाच्या अनुभवांची कल्पना करू शकतो. अशा प्रकारे अलौकिकाची अनुभूती लौकिकाच्या माध्यमातून व्यक्तविण्याची संतांची रीत आहे. तथापि नाथांची रीत नेमकी उलटी आहे. नाथ लौकिक सांगतात आणि त्याच्या आधारे अलौकिक सुचवितात. त्यांच्या कवितेत लौकिक हे उपमेय आहे आणि अलौकिक हे उपमान आहे. 'रूक्मिणीस्वयंवरा'त त्यांना कृष्ण-रूक्मिणी विवाहाची लौकिक कथा सांगावयाची आहे. पण कृष्ण म्हणजे शिव, रूक्मिणी म्हणजे जीव असे ते सांगतात. लौकिकाचे कथन एकनाथ अलौकिकाच्या परिभाषेत करतात ते असे. गैरसमज होऊ नये म्हणून एक गोष्ट स्पष्टपणे नमूद केली पाहिजे. परमार्थाचे प्रतिपादन हेच सर्व संतांप्रमाणे नाथांचेही मुख्य उद्दिष्ट आहे.

तथापि त्याच्या विशदीकरणासाठी इतर संत प्रापंचिक उपमानांचा वापर करतात तर नाथ मात्र संसारकथा सांगताना आध्यात्मिक उपमानांचा वापर करतात. लौकिक आणि अलौकिक यांचा दुहेरी खेळ सगळ्याच संतकवितेत आहे. फक्त त्यांचा वापर करण्याची नाथांची रीत इतर संतांपेक्षा वेगळी आहे. हा प्रकार त्यांच्या कथाकवितेत विशेषत्त्वाने आढळतो.

कथाकविता लिहितानाही नाथ वेगवेगळ्या काव्यप्रकारांचा शोध घेतात. लौकिकात अध्यात्म शोधण्याची त्यांची रीत त्यांच्या कवितेला वेगळेपणा देते. प्रपंच आणि परमार्थ नाथांच्या दृष्टीने एकात्म आहे. हा संयुक्त अनुभव व्यक्त करण्यासाठी नाथ रूपकशैलीचा सहज वापर करतात. निरंग रूपकांपासून संपूर्ण प्रबंधभर पसरणारी ही रूपके हीही नाथांच्या कवितेला वेगळेपणा देतात. कथोपकथांनी आख्यानवस्तूला भरघोस आणि श्रोत्यांना बहुश्रुत करण्याचा नाथांचा प्रयत्न असतो त्यांची पात्र लौकिक आणि अलौकिक अशा दोन्ही पातळ्यांवर वावरतात. त्यातून नाथांचा विनोद फुलून येतो. रसरशीत अशा वीररसाचा उग्र स्पर्श मराठी कवितेला प्रथम झाला तो नाथांच्या कवितेतूनच. खरं तर मराठी कवितेला नवरसांची दारे उघडी केली ती नाथांच्या कथाकवितेने. रूढ मराठी कवितेपेक्षा संस्कृत उद्धरणांचा किंवा स्वरचित श्लोकांचा नाथांचा वापर अगदी निराळा आहे. लोकव्युत्पत्ती देणे त्यांना प्रिय आहे. मूलाधारांची स्थूल नोंद ते करतात. याबाबतीत त्यांची दृष्टी समावेशक आहे. एतद्‌विषयक परिहार देण्याची त्यांची पद्धत खास अशी आहे. आध्यात्मिकता आणि कथात्मकता, नवता आणि समावेशकता या त्यांच्या वैशिष्ट्यांचा मराठी कथाकवितेवर सर्वदूर प्रभाव आहे.

'लोक निवती कथाविनोदे' या नाथांच्या वचनाचा प्रत्यय त्यांच्या कथाकवितेवरून चटकन येतो. लोकांच्या विचार - भावना त्यांच्या भाषेत व त्यांच्यासाठी बोलून दाखविणारे एकनाथ हे पहिले संतकवी होते, असे म्हटले पाहिजे. साहजिकच अर्थगौरवापेक्षा अर्थविस्तार, सूचकतेपेक्षा स्पष्टता, चित्रणापेक्षा कथनपरता याकडे नाथांचे अधिक लक्ष असते.

कथाकवितेच्या जुन्यापरंपरांना नाथांनी नवे रूप दिले. तिच्या विकासाच्या अनेक शक्यता दाखविल्या. स्वतः त्यांनी कसदार कथाकविता लिहिली. तिचा स्पष्ट ठसा संतांच्या, पंडितांच्या आणि शाहिरांच्या वेगवेगळ्या काव्यपरंपरावर उमटलेला आहे. मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, वामनपंडित आणि श्रीधर ही नाथांच्या प्रभावकक्षेतील गिरिशिखरे आहेत. त्यामुळे एकनाथ केवळ संतपरंपेतीलच नव्हे तर एकूणच मराठी काव्यातील महत्त्वाचे कथाकवी ठरतात.

संदर्भ :

०१. शिवाजी गढळकर, 'प्राचीन मराठी आख्यानक कवितेच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास', मराठवाडा विद्यापीठ, १९६९ पृ. ३८२
०२. एकनाथ, 'सकल संतगाथा', खंड २, का.अ.जोशी (संपा.) श्री संतवाङ्मय प्रकाशन मंदिर, पुणे, दु.आ.१९६७ (प.आ.१९२३) यातील हा संदर्भ आहे.
०३. एकनाथ, 'श्रीएकनाथ गाथा श्री भानुदास, श्रीजनार्दन यांच्या अभंगांसह' संग्राहक श्री नानामहाराज साखरे, वरदा, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण १९९६ (प.आ.१९९०) येथून पुढील संदर्भ या गाथेनुसार आहेत.
०४. प्रकाश देशपांडे केजकर, 'संत कविता एक दृष्टिकोन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,२००६ पृ.१९२
०५. रा.चिं.ढेरे, 'ज्ञानकथा आणि लीलाकथा',पैलतीर, दिवाळी वार्षिक,१९८४ पृ. १०३ ते ११७.
०६. एकनाथ, 'श्रीएकनाथी भागवत', भाग १ व २, श्रीएकनाथ मंडळ, सातारा-पुणे, १९७३, ही प्रत येथे वापरली आहे.
०७. एकनाथ, 'रूक्मिणी-स्वयंवर', सुहासिनी इर्लेकर(संपा.), परिमल प्रकाशन, औरंगाबाद,१९८५ या प्रतीचा येथे वापर केला आहे.
०८. एकनाथ, 'श्रीभावार्थरामायण', न.वि.पणशीकर (संपा.) यशवंत प्रकाशन, पुणे, १९६८ ही प्रत येथे वापरली आहे.
०९. ज.स.करंदीकर, 'श्रीएकनाथी भावार्थरामायण', समाविष्ट 'श्रीएकनाथ दर्शन', श्रीएकनाथ संशोधन मंदिर (प्रका.), औरंगाबाद-हैदराबाद,...... पृ.१३२-१६९.
१०. शं.गो.तुळपुळे, 'पाच संतकवी', व्हीनस प्रकाशन,पुणे, दु.आ.१९३२ (प.आ.१९४८), पृ.२४४.

डॉ. र. बा. मंचरकर
श्रीस्वामीसमर्थ, १९, नंदनवन कॉलनी,
कोहिनूर मंगल कार्यालयासमोर, सावेडी,
अहमदनगर - ४१४ ००३.
स्थायीभाष : ०२४१ - २४२३५७५
चलभाष : ९४२२८६४०७८

अनुक्रमणिका



भारतीय खेडी आणि मराठी-हिंदी ग्रामीण कविता

डॉ. कैलास सार्वेकर

प्रस्तुत लेखात मराठी आणि हिंदी कवितेतून आलेल्या खेड्यातल्या जीवनाची माहिती घ्यायची आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे आणि बहुसंख्य जनता खेड्यापाड्यात राहते. ही स्थिती आजही आहे. स्वाभाविकच मराठीच्या महाराष्ट्राबरोबरच हिंदी ज्या प्रदेशात बोलली जाते उत्तर भारतातील खेडी कशी आहेत, त्या त्या भागातील साहित्यात ती कसकशी येत गेली ते पहावं त्या निमित्ताने या दोन भाषांतील ग्रामीण कवितांचा विचार व्हावा हे या लेखाचं प्रयोजन आहे.

सुरवातीस थोडी पार्श्वभूमी सांगितली पाहिजे. प्रस्तुत अभ्यासकाने पुणे विद्यापीठांत एम्.फिल व पीएच्.डी साठी ग्रामीण कवितेवर संशोधन कार्य केले होते. 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' हा ग्रंथही मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे तर्फे १९९९ ला प्रसिद्ध झाला होता. थोडक्यात मराठी ग्रामीण कवितेचा १९९० पर्यंतचा अभ्यास या निमित्ताने झालेला होता. हिंदीतील या प्रकारच्या कवितेची स्थिती कशी आहे याचा शोध घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली तर्फे 'मराठी आणि हिंदी ग्रामीण कवितेचा तौलनिक अभ्यास (इ.स.१९६० ते २००५)' हा विषय दीर्घ संशोधन प्रकल्पासाठी घेतला, त्याचे साररूप संक्षिप्त निष्कर्ष असे या लेखाचे स्वरूप आहे, असे म्हणता येईल.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपर्यंत तरी मराठी साहित्य शिक्षणक्षेत्र बहुजनांपर्यंत पोचले नव्हते. असेच इंग्रज येण्यापूर्वीच्या संत-पंत-तंत आणि नंतरच्या साहित्यावरून म्हणावे लागते. आधुनिक मराठी साहित्यातून सर्वसामान्यांचे जीवनानुभव साहित्याचे विषय झाले असे आपण म्हणत असलो तरी बहुजन समाजातील लेखकवर्ग शिकला लिहू लागला होता. तिथपर्यंत तरी शिक्षण आणि साहित्यक्षेत्र विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मराठीत होती ही स्थिती जशीच्या तशी हिंदी प्रदेशात मात्र दिसत नाही.

या काळात ग्रामीण जीवनावर 'प्रादेशिक वाङ्मय' या नावे गद्य व 'जानपद गीते' या नावे पद्य साहित्य लिहिले गेले. यातील 'प्रादेशिक साहित्या'त प्रदेशाला महत्त्व होते. तर 'जानपद कविता' शहरी कवींनी ग्रामीण जीवनानुभवाच्या अभावाने लिहिल्याने त्यात कृत्रिमता, खोटेपणा, नटवेपणा अधिक होता त्यामुळेच की काय ग्रामीण कविता पर्यायाने ग्रामीण साहित्य हा मराठी साहित्यात एक चेष्टेचा विषय बनला होता.

महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' हा संदेश स्वातंत्र्य आंदोलकांना दिला होता. साहित्यिकही या संदेशानुसार खेड्याकडे वळले. पण प्रत्यक्ष अनुभवाच्या अभावाने त्यांची कविता प्रत्ययकारी होऊ शकली नाही.

जानपद कवितेच्या काळात ('सुगी'-१९३३) हिंदीत १९३३ ला प्रगतिवादाची धारा सुरू झाली. १९३५ ला लंडनमध्ये प्रगतीशील लेखक संघाची बैठक झाली. १९३६ ला प्रेमचंदांच्या अध्यक्षतेखाली लखनौला अशी बैठक झाली. प्रेमचंदांच्या साहित्यातून 'यथार्थ' ग्रामजीवन हिंदीत येत गेले. पुढे हिंदी कवी नागार्जुन यांनी बिहार मध्ये शेतकरी आंदोलनाचे नेर्तृत्व केले. १९३९-४० मध्ये दोन वेळ त्यांनी तुरूंगवास भोगला.

मराठीतील जानपद कवितेचा काळ आणि हिंदीतील प्रगतिवादाची धारा व नागार्जुन यांच्या शेतकरी चळवळीतील

अनुक्रमणिका

सहभाग या भारतातीलच पण वेगवेगळ्या ठिकाणी साधारणपणे समांतर घटना घडतांना दिसतात. एकीकडे मराठीत जानपद कविता नटवे जीवन मांडत होती तर दुसरीकडे हिंदी गद्यात प्रेमचंद व पद्यात नागार्जुन वासत्व जीवन रेखाटत होते.

१९४७ चे स्वातंत्र्य, १९५० चा प्रजासत्ताक, राज्यघटना, १९६० ला भाषावार प्रांतरचना, घटनेने मागासवर्गीयांना विशेष सवलती दिल्या. महाराष्ट्र शासनाने आर्थिक दुर्बलांना शिक्षणासाठी सवलत दिली. त्यामुळे तळागाळातल्या जाती - जमाती बरोबरच शेतकरी - कष्टकऱ्यांची मुलंही शिकू लागली.

या नवशिक्षित तरूण पिढीला आत्मभान आले. आपले खरे जीवन मराठी साहित्यात आले नाही. ते योग्य तऱ्हेने आले पाहिजे ही जाणीव झाली. १९६० नंतर दलित, ग्रामीण नंतर स्त्रीवादी चळवळी मराठी साहित्यात उभ्या राहिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेवून दलित साहित्याची चळवळ उभी राहिली. आनंद यादव, रा.रं.बोराडे, नागनाथ कोतापल्ले, द.ता.भोसले, चंद्रकुमार नलगे, भास्कर चंदनशिव अशा मंडळींनी ग्रामीण साहित्याची चळवळ उभारली. या साहित्याची तात्त्विक मांडणी केली. दलित साहित्याने मराठी साहित्याला कलावादाकडून जीवनाकडे झुकविण्यात यश मिळवले. कवितेनंतर आत्मकथनांनी मराठी साहित्य ढवळून निघालेच पण मराठी साहित्याला आंतराष्ट्रीय स्तरावर पोहचविण्याचे काम आत्मकथनांनी केलं.

हिंदी साहित्यात हे जीवन अगोदर पासूनच येत राहिले. त्यामुळे अशी चळवळींची आवश्यकता भासली नाही. दलित जीवन जसे आले तसे ग्रामीण-शेतकरी-कष्टकऱ्यांचेही आले.

स्वातंत्र्यानंतरची दोन/अडीच दशकं भारताला चांगली गेली. स्वातंत्र्य,प्रजासत्ताक, भाषावार प्रांतरचना, उदार शैक्षणिक धोरण, स्थानिक स्वराज्यसंस्था, पंचवार्षिक योजना, सहकार चळवळ, धरणं अशा अनेक लोकोपयोगी घटना या काळात घडल्या.

शिक्षणाचा प्रचार सर्व घटकांत झाला. राजकारणात सहभाग आला. पंचवार्षिक योजनांमुळे खेड्यापाड्यांचा पालट होईल, रोजगारहमीमुळे कामधंदा मिळेल, धरणांमुळे शेतीला पाणी मिळेल. हरित क्रांतीने देशाचं रूप पालटून जाईल असा आशावाद निर्माण झाला.

सुरूवातीला या योजनांचा थोडाबहुत फायदा काही राज्यांना झाला. उदा. उत्तर भारतात अनेक ठिकाणी धरणांचा उपयोग तेथील पंजाब-हरयाणा सारख्या प्रांतांना झाला. शिक्षणाने नवी पिढी शिकली. साहित्यादी क्षेत्रात ती लिहू-बोलू लागली वगैरे.

पण हे चित्र फार काळ टिकलं नाही. राष्ट्रभावनेने प्रेरित पहिली पिढी राजकारणात असेपर्यंत भ्रष्टाचार फारसा नव्हता. पण नंतर तो वाढत गेला. आम्हाला सत्तेत सहभाग मिळेल. सर्वसामान्यांचं कल्याण होईल हे आम जनतेचं स्वप्न होतं. पण राजकारणात भ्रष्टाचार शिरला. त्यानं आपला स्वार्थ पाहिला. कारण राजकारण हा नंतर सेवाभाव न राहता धंदा झाला. विशेषतः आणीबाणी (१९७७-७८) नंतर इथले राजकारण, अर्थाभिमुख झाले. त्यामुळे, भ्रष्टाचार, बेकारी, बेरोजगारी, पिळवणूक या गोष्टी आल्या.

कवितेत त्याचे प्रतिबिंब उमटले. विठ्ठल वाघांच्या कवितेत स्वातंत्र्योत्तर ग्रामीण जनतेची अवस्था 'मेंढरा' सारखी झाली. वारंवार 'ढगामुचुक आभाय' (दुष्काळ) पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. पंचवार्षिक योजनेची 'म्हैस' दारोदार येईल. सर्वांच्या मुलाला दूध देईल असं वाटत होतं. पण तसं कधी झालच नाही. शेती तोट्यात गेली. म्हणून 'साहेबराव पाटील' या कास्तकाराला बायको मुलांसह फाशी घ्यावी लागली.

हिंदीतील शेतकऱ्यांच्या हालाखीच्या जीवनाचे चित्रण नागार्जुन करतात. 'तंग आ गये है । किसान' असं ते म्हणत असले तरी 'स्वातंत्र्य संघटन बनाने की प्रेरणा' ते देतात 'खुद ही झंडा लाल उडाते है' असा पक्षविचार धारेचा रंग त्यांच्या रचनेत मिळतो तथापि 'कागजपर खेती होती है । कलम हुई हर फार । छोड रहे है गाँव गाँव । खेत मजुरोके परिवार । कृषि विकास की खबरे । प्रती हित छाप रहे अखबार । असेंब्ली की छत पर फसलें उगा रही सरकार ' (नागार्जुन रचनावली -२ पृ. ३५२) शेती आणि शेतकऱ्यांची स्थिति, सर्वत्र पसरलेला भ्रष्टाचार यामुळे स्वातंत्र आणि प्रजासत्ताकाचा सर्वसामान्यांना काय उपयोग ?

किसकी है जनवरी किसका अगस्त है ?
कौन यहा सुखी है और कौन मस्त है ?
(नागार्जुन रचनावली -२, पृ. १८९)

हा सवाल मराठी विद्रोही कवी नामदेव ढसाळांच्या 'स्वातंत्र्य कोणत्या गाढवीचं नाव आहे' या विधानाशी जुळणारा आहे.

मराठी कवी विठ्ठल वाघांच्या एका कवितेत पंचवार्षिक योजनेसाठी 'म्हशी' ची प्रतिमा येते तर हिंदी कवी सर्वेश्वर दयाल सक्सेना यांच्या कवितेत 'म्हैस' संपूर्ण राजनैतिक

भ्रष्टाचाराच्या / संवेदनाशीलतेच्या रूपात येते. 'यह खेती हर मजदूर भूक से मर गया', 'यह चौपाये के साथ बाढ मे बह गया' अशी शेतकऱ्यांची स्थिती येते. (स.द.स.ग्रं. २, पृ. २३-२४)

स्वातंत्र्यानंतरच्या पंचवीस वर्षात सत्ताधारी, बुद्धिजिवी, कलाकार या साऱ्यांची पाठ काळीशार, संवेदनशून्य चमकदार, चारीबाजुला 'गोबरैल' पसल्यासारखी झाली आहे. 'पचीस वर्षोसे लगातार । यही देखते - देखते । लगता है हम सब गोबरैल में बदल गये है' (स.द.स.ग्रं.२, पृ.४६)

शेतकऱ्यांची जी मुलं शिकली. नोकरीला लागली, शहरात स्थिरावली. त्यांची संवेदनशीलता मात्र खेड्याशीच जुळलेली राहिली. गावापासून तुटलेपणाची ही भावना मराठी व हिंदी दोन्ही भाषेतून येत राहिली. आनंद यादवांच्या कवितेपासून हे दिसते. कवी जेव्हा शहरातून आपल्या शेतीमातीकडे येतो तेव्हा हळहळतो, तो स्वतःच 'बघ्या पाव्हणा' झाल्याचा प्रत्यय त्याला येतो. रक्ताचं नातं तुटल्यासारखं वाटतं (म.मा. पृ. ७९) नोकरीने आपल्याला 'पांढरी घरकोंबडी' बनवली. शेतातील बाळपीकं, केळी, सुरवणी, गाळ, लोळाघाट, गुन्हाळाचा रस या साऱ्याच आठवणी त्याला अस्वस्थ करतात. 'ध्यायीची माती त्या मातीत मिसळून जावी' ही कवीची इच्छा मातीशी असलेले नाते टिकून रहावे अशी अपेक्षा व्यक्त करणारी आहे.

यादव (१९६०) ते अलीकडे ज्यांचा 'खुंट्यावर टांगलेली दुःख' (२००९) संग्रह प्रसिद्ध झाला आहे, त्या एकनाथ पाटील यांची कविता अशा अनेक कवींच्या कवितातून हा भाव येतो. पैकी 'शोध यात्रा', 'हे माझ्या प्रिय गावा' मध्ये त्याला येणारी आठवण अधिक तीव्र आहे. एखादं झाड मुळासकट फेकलं जावं तसं कवीचं गावच त्याला नाकारतंय, ते त्याला सामावून घेत नाही. गावाची तीव्र आठवण - तो त्याच्याजवळ जाऊ शकत नाही, आणि शहराने त्याला पूर्ण जखडून टाकलंय. त्याच्या चौकात उभा राहून तो त्याला साद देतो.

उत्तरप्रदेश, गुजरात, दिल्ली अशा विविध राज्यात स्थलांतरित होत गेलेल्या रामदशरत मिश्रांचं गावाशी असलेलं नातं मात्र वेगळं आहे. 'मै जहाँ कही गया, गाँव मेरे साथ रहा / वहा माँ है, पिता है, भाई बहन है, पडोसी है' (क.क.इ.दि. पृ.१३५) म्हणूनच तर त्याला एकटेपण जाणवतं, संवादहीनता त्रासदायक वाटते, तेव्हा गावच हसून म्हणतं 'मै हूँ ना' (क.क.इ.दि. पृ.१२७) मात्र कधीतरी गावाकडचं आपलं घर विकून तो येतो. सर्वस्व गमावल्याचं दुःख त्याला होते 'क्या सच मूच छूट गया वह ? / फिर इस दर्द को क्या नाम दूँ ?' असं तो म्हणतो.

खेड्यातून शहरात आलेल्या मजुराचं चित्र हिंदीतील रामदशरत मिश्र यांच्या 'बचपन' आणि सुरेश कुसुंबीवाल यांच्या 'सरनू' या व्यक्तिचित्रणपर कवितेतून येतं. ते चटका लावणारं आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा तर कृषिप्रधान देशातला सर्वात महत्त्वाचा, हादरवून सोडणारा प्रश्न आहे. 'साहेबराव पाटील' ही विठ्ठल वाघांची शेतकरी आत्महत्येवरची कविता. त्यानंतर इंद्रजित भालेरावांनी या आत्महत्यांवर अनेक कविता लिहिल्या. शंकरराव दिघे यांच्या दीर्घ कवितेत 'आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जागरणा'वर सुमारे सहा पानं लिहिली. ही काही ठळक उदाहरणं, पण ग्रामजीवनाबद्दल आस्था असणाऱ्या १९९० नंतरच्या जवळ जवळ प्रत्येक कवीने आत्महत्येचा प्रश्न हाताळला.

११ मार्च १९८६ ला साहेबराव पाटील या कास्तकाराच्या आत्महत्येची दुर्दवी घटना घडली. ती विठ्ठल वाघांच्या काव्यनिर्मितीला कारणीभूत ठरली. याच दरम्यान जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. गॅट करार झाला. १९९० नंतर जागतिकीकरणाचे परिणाम दिसू लागले.

इंद्रजित भालेराव आणि समकालीन कवींची कविता आजुबाजूची परिस्थिती आणि तिचे ग्रामीण जनतेवर, त्यांच्या व्यवसायावर होणारे परिणाम सहभावनेने अनुभवत होती. आपल्या कवितेतून तिचे भावचित्र रेखाटत होती. भालेरावांनी वेगवेगळ्या विषयांवर अनेक कविता लिहिल्या पण आत्महत्या - जागतिकीकरणासंदर्भात त्यांच्या कविता लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. 'शिक बाबा शिक लढायला शिक (पेरा, पृ.५८) भूमाते घे प्रणाम शेवटचा' ही कविता भू मातेला, आभाळबापाला, सरकारला आणि चिल्या पिल्यांना उद्देशून लिहिली आहे. 'सांग माझ्या बापानं नाही केला पेरा तर तुम्ही काय खाल धतुरा' (पेरा, पृ.५२) हा तमाम पांढरपेशांना केलेला सवाल. 'माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता' ही गावाची शहरी मित्राला करून दिलेली ओळख, 'पेरा' संग्रहातल्या या विषयावरच्या अशा अनेक कवितांची उदाहरणं सांगता येतील.

उत्तम कांबळे यांनी जागतिकीकरण या विषयावर एक प्रातिनिधिक संग्रह काढला. स्वतःसह सुमारे सत्तावीस कवींच्या तीस-पस्तीस कविता या संग्रहात आहेत. ते स्वतः 'बळीराजाला कधी कुणी / पावला खाली गाडलं, कुणी व्याजाखाली गाडलं / कुणी बाजारात मारलं तर कुणी तो बाजारात जाण्यापूर्वीच मारलं' (जा.क. म.क., पृ.७३) अशी पुराणकालीन वामन, आताचे सावकार - व्यापारी - सरकार

अनुक्रमणिका

अशा अस्मानी सुलतानी संकटाची मालिका शब्दात सांगतात. 'विरोधकांनी सत्य समजून न घेता / त्याच्या डेड बॉडीवर / कफनाऐवजी राजकारण पांघरले' (जा.क.म.क.,पृ.१२) असे त्याच्या आत्महत्येचं राजकारण करणाऱ्या इथल्या सत्ताधारी व विरोधी दोन्हीही नेत्यांच्या दांभिकतेवर प्रकाश टाकतात.

एकनाथ पाटील यांच्या 'पतझडीच्या काळात' या कवितेत जागतिकीकरणाचं समर्थन करणारा शहरी मित्र, 'जागतिकीकरणाच्या लाटेत सर्वांचच वैश्विकीकरण होणार आहे. गावचा माणूस आपोआप ग्लोबल होत जाईल. तेव्हा परिवर्तनात गावावर लिहिलेली तुझी कविता टिकेल का?' असा प्रश्न करतो. त्यावर 'अगदी सर्व नष्ट झालं तरी चालेलं / पण मातीत राबणारा माणूस जगला पाहिजे या पडजडीच्या काळात' (खु.टां.दु.,पृ.५३) अशी राबणाऱ्यांबद्दलची कळकळ व्यक्त करतो या दशेला 'पुढारी, भांडवलदार, माफिया, नोकरशहा साऱ्यांची मुलं परंपरा सांभाळतील पण शेतीची अवस्था वाईट होईल. शेतकऱ्यांचा वंश नाश होई तेव्हा शेतकऱ्यांच्या पोराने काय करावे आता?' (खु.टां.दु.,पृ.७७) असा अस्वस्थ करणारा प्रश्न उभा करतो.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या, जागतिकीकरण - उदारीकरण या संदर्भात भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, भा. ल. भोळे, उत्तम कांबळे, जेम्स पेत्रास, एजाज अहमद हिंदीतील रामशरण जोशी, गिरीश मिश्र या विचारवंतांची अवतरणं नेमका प्रकाश टाकतात. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील इतर राज्यातही शेतकऱ्यांची - ग्रामीणांची आजची आणि त्यापेक्षाही उद्याची परिस्थिती किती वाईट आहे याची कल्पना येते.

शेतकऱ्यांच्या या अवनतीबद्दल हा शेतकरीपुत्र विद्रोहही प्रकट करू लागला आहे. कुणब्याच्या पोराला परिस्थिती विरूद्ध लढायला, घेतलेली कर्ज बुडवायला, निवडून दिलेल्याला पाडायला, स्वतः न मरता इतरांना मारायला शिकवणारी इंद्रजित भालेरावांची कविता हा विद्रोह पेरते. त्या अगोदर नारायण सुमंत यांच्या कवितेत दौलती, भैरू आणि हैबती 'आटलेल्या विहीरीचे कनेक्शन तोडू नका' हे सांगण्यासाठी तालुक्याच्या गावाला जाणार आहेत. त्यानेही उपयोग होणार नसेल तर 'उद्या ते संसदेच्या दिशेने जोडेही भिरकावतील' अशी उद्याच्या संघर्षाची शक्यता व्यक्त केली जाते. अमोल बागुलसारखा नवीन कवी आत्महत्याग्रस्तांना आरक्षण मागतो. शेतकऱ्यांच्या बायकोला 'सरकारी विधवा' म्हणून पेन्शन मिळावे. एवढेच नव्हे तर, 'फक्त एक एक पुढारी करा आमच्या हवाली / पिकावर आम्ही त्याचं रक्त फवारू' (परिवर्तनाचा वाटसरू, जुन २००८, पृ. ८ ते २०) अशी क्रांतिकारी विद्रोहाची भाषा वापरतो.

हिंदी कवितेतही हा विद्रोह आहे. याचे मुख्य कारण केवळ शेतकऱ्यांच्या आत्महत्या एवढेच नाही तर शेतकऱ्यांच्या अस्तित्त्वाचा प्रश्न, तोट्यात जाणारा - बुडू पाहणारा शेती व्यवसाय हाही आहे. केदारनाथसिंह यांच्या 'कुदाल' या कवितेचा प्रतिकात्म शेवट ह्या दृष्टीने निश्चित विचार करायला लावणारा आहे. शहरी मध्यामवर्गीयांच्या घरातील ही कुदळ, तिचा आकार मोठा होत जाणे. तिला घरात दरवाजाजवळ सोडणं खतरनाक आणि सडकेवर ठेवणं असंभव ठरतं. कृष्ण मोहन झा यांनी या कवितेवर लिहिले आहे. 'यह (कविता) बताती है की उनमेंसे (प्रेमचंद की कथा के पात्र) कुछ पढ लिखकर जाविकोपार्जन के लिए और फिर न कभी लौटाने के लिए शहर चले गए / शेष प्रगति की प्रतियोगीतामें पिछड गऐ। यह छुटी हुअी सुनसान अंधेरी जगह जिसे हम ग्रामीण भारत के नाम से जानते है । अशिक्षा और अभावमें डूबा भारत आत्महत्या के उद्योग मे शामिल किसानो का भारत - प्रगती के नामपर हमारे गाँव शहर की कॉलोनी बन गये । अब गाँव का मतलब है आलू, प्याज, टमाटर, फल और मजदूर । शहरमें गाँवका मजदूर विघटित होकर कुदाल बन जाता है । (वागर्थ, फरवरी २०११, पृ. १०३) ग्रामीण शोषितांचं संघटित होत जाणाऱ्या, वाढत जाणाऱ्या शक्तीचं हे रूप कुणालाही न परवडणारं म्हणूनच क्रांतिकारक आहे.

सुरेश कुसंबीवाल यांच्या 'उसके आत्महत्या के बाद' या कवितेत गावात एकूण अकरा आत्महत्या घडल्याहेत. कोणी भेटायलाही येत नाही. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची बायको व तिची आई एकमेकीला भेटतात. या दोन विधवांमध्ये चाळीस वर्षाचं अंतर मिटलं आहे. तेजपाल चौधरींच्या 'और होरी मर गया' या कवितेत शेतकरी आत्महत्येचं हृदयद्रावक चित्रण आहे. या दृष्टीने उपायही या कवितेत आहेत. प्रश्नाबरोबर उत्तर सुचवणं हे हिंदी कवितेत नागार्जुन, सर्वेश्वर दयाय सक्सेनांपासून तेजपाल चौधरींपर्यंत दिसतं.

मराठी कवितेत ना.धों.महानोर, इंद्रजित भालेराव, संतोष पवार, प्रकाश किनगावकर, कल्पना दुधाळ असा अनेक कवींच्या कवितांतून वेगवेगळ्या पद्धतीने आले त्याचप्रमाणे हिंदी कवींच्या कवितांतूनही आले. सुरेश कुसुंबीवाल यांच्या कविता हे ठळक उदाहरण सांगता येईल.

इतर भाषांतून भाषांतरीत झालेल्या कवितांवरून त्या भाषेतील व देश - प्रदेशातील ग्रामजीवन आणि या

अनुक्रमणिका

जीवनावरील कवितांची कल्पना येते. उदा. तेलगु भाषेतील साहित्य आणि त्यावरून तामिळनाडूतील सध्याची स्थिती कळते. विशेषतः तेलगु भाषा प्रदेश जागतिकीकरणामुळे कसा होरपळला जातो आहे. याची कल्पना येते. 'समकालीन भारतीय साहित्य' न.दि.२०१० च्या अंकातील द्वा.ना.शास्त्री यांचे एक टिपण आहे. त्यातून तामिळनाडूचे दर्शन घडते. रेमिका थापा यांनी भारताशेजारच्या नेपाळमधील ग्रामजीवन आपल्या कवितांतून उभं केलं आहे. उपरोक्त 'समकालीन....'च्या अंकात सुवास दीपक यांनी रेमिका थापांच्या सोळा कवितांचं हिंदी रूपांतर केलं आहे. त्यातून हे दिसते.

उत्तर भारतातील नदी आणि वारंवार येणारे पूर यांचं दर्शन नार्गाजुन, केदारनाथसिंह, तेजपाल चौधारी, राज्यवर्धन अशा अनेक कवींच्या कवितातून घडतं. महाराष्ट्रातील कोरड्या दुष्काळाचे परिणाम जसे मराठी कवींच्या कवितांतून दिसतात तसे पुराचे - ओल्या दुष्काळत्तचे परिणाम उत्तर भारतातल्या या हिंदी कवितेतून पहायला मिळतात.


अभिव्यक्तीबाबत बोली, लोकवाङ्मय आणि ग्रामीण प्रतिमा या घटकांचा समावेश मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषेतील ग्रामीण कवितेत दिसतो. विशेषतः हिंदीत बोलीला आणि लोकवाङ्मयाला अगोदरपासून प्रतिष्ठा आहे. मराठीत त्यासाठी १९५२ पर्यंत (बहिणाईची गाणी) चा काळ जावा लागला. समर्पक ग्रामीण प्रतिमांचा वापर दोन्ही भाषांत दिसतो. उपरोक्त तिन्ही वैशिष्ट्यांमुळे दोन्ही भाषांतील ग्रामीण कवितांचे पृथकत्व दाखविता येते.

या कृषीप्रधान देशात सर्वात वाईट स्थिती शेतकऱ्यांची आहे. आपल्या देशात संख्येने तो अधिक आहे. पण कर्जबाजारीपण, अस्मानी आणि सुलतानी संकट, सावकार, व्यापारी, सरकार, निसर्ग या सर्वांकडून त्याची मुस्कटदाबी होते. असंघटित असा हा वर्ग उपरोक्त अनेक कारणांमुळे संघटित होऊ शकत नाही. संघटित नसल्याने गठ्ठ मतदान हे लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचे हत्यारही त्याच्याजवळ नाही. त्याच्या श्रमाला प्रतिष्ठत नाही. शेती मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव नाही. म्हणूनच, 'गाव सोडतो तो प्रतिष्ठित / आणि गावच्या मातीला चिकटून राहतो तो अप्रतिष्ठित' (खुं.टा.दु., पृ.५२) अशी वस्तुस्थिती आहे.'....शेतकरी सोडल्यास... / सुखी असणाऱ्या जाती इथं खूप आहेत' (या.श.सा.हो.को., पृ.३९) ही या देशाची शोकांतिका आहे.

लेखातील संक्षिप्त रूपे व संग्रहांची शीर्षके :

०१. स.द.स.ग्रं.२ - सर्वेश्वर दयाल सक्सेना ग्रंथावली - २ : सर्वेश्वर दयाल सक्सेना.
०२. म.ना. - मळ्याची माती : आनंद यादव.
०३. क.क.इ.दि. - कभी कभी इन दिनो : रामदरश मिश्र.
०४. जा.क.म.क. - जागतिकीकरणात मराठी कविता : उत्तम कांबळे.
०५. खुं.टा.दु. - खुंट्यावर टांगलेली दु:ख : एकनाथ पाटील.
०६. या.श.सा.हो.को. - या शतकाचा सातबाराच होईल कोरा : शंकरराव दिघे.

डॉ. कैलास सार्वेकर
सहयोगी प्राध्यापक,
तौलनिक भाषा व वाङ्मय विभाग,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
मो. ९४२१५६८९५९, ७७९८३११०५०



गो. वि. करंदीकरांची साहित्यसमीक्षा : एक दृष्टिक्षेप

डॉ. पुरूषोत्तम माळोदे

गो. वि. करंदीकराचे एकूण तीन समीक्षाग्रंथ प्रकाशित झाले आहेत. (१) परंपरा आणि नवता (प्र.आ.१९६७),(२) उद्‌गार (१९९६), (३) साहित्यमूल्यांची समीक्षा (२००४).

१९९७ ला प्रकाशित झालेल्या 'अ क्रिटिक ऑफ लिटररि व्हॅल्यूज' या करंदीकरांनी लिहिलेल्या इंग्रजी ग्रंथाचा श्री. आ. ना. पेडणेकरांनी केलेला मराठी अनुवाद म्हणजे 'साहित्यमूल्यांची समीक्षा' हा समीक्षाग्रंथ होय. 'उद्‌गार' या ग्रंथाचे स्वरूप भाषणे, मुलाखती, पत्रे ह्यांच्या संग्रहाचे आहे. या ग्रंथात करंदीकरांचे कला-साहित्य-वाङ्‌मयीन मूल्ये इत्यादी संबंधी जे चिंतन प्रगट झाले आहे, तेच त्यांनी अधिक विस्ताराने 'साहित्यमूल्यांची समीक्षा' या ग्रंथात मांडले आहे, त्यामुळे करंदीकरांच्या साहित्यसमीक्षेचा विचार करताना 'परंपरा आणि नवता' आणि 'साहित्यमूल्यांची समीक्षा' या दोनच समीक्षाग्रंथाचा विचार करावा लागतो.

करंदीकरांचा समीक्षक म्हणून जो पिंड आहे, तो मर्ढेकर, मुक्तिबोधांप्रमाणेच निबंधकाराचा आहे. निबंधकार आपला विषय खंडण-मंडणाच्या पद्धतीने मांडत असतो.

करंदीकरांचा 'परंपरा आणि नवता' हा अर्वाचीन मराठी कवितेवर भाष्य करणारा एक मौलिक समीक्षाग्रंथ आहे. या ग्रंथात १९५४ ते १९६६ या दरम्यान प्रसिद्ध झालेले लेख संग्रहित करण्यात आले आहेत. या लेखांचे वर्गीकरण लेखकानेच तात्त्विक, मूल्यमापनात्मक आणि आत्मनिवेदनपर असे केले आहे. गो. वि. करंदीकरांच्या समीक्षेमध्ये वाङ्‌मयकृतीचे केंद्र शोधून विश्लेषण करण्याला विशेष स्थान नाही. करंदीकर मुख्यत्त्वे वाङ्‌मयातील विविध प्रश्न तात्त्विक संकल्पना यांच्यासंबंधी लेखन करतात. परंपरा व नवता या ग्रंथातील महत्त्वपूर्ण तात्त्विक लेख म्हणजे (१) मर्ढेकरी समीक्षेची मूलतत्त्वे (२) ललित वाङ्‌मयाची सांस्कृतिक फलश्रुती (३) काव्य आणि सामाजिक जाणीव (४) कविता कशी भोगावी ? (५) काव्यात्म दुर्बोधता १,२,३ हे होत. या लेखसंग्रहाचा सर्वात महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांनी मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राचा आणि मर्ढेकरी कवितेचा घेतलेला वेध होय. 'मर्ढेकरी समीक्षेची मूलतत्त्वे' या १९५६ ला प्रसिद्ध झालेल्या दीर्घ लेखातून मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राचे महत्त्व विशद केले आहे. त्यांच्या मते, मर्ढेकरी काव्याचे मौलिकत्त्व हे फक्त मराठीपुरते मर्यादित आहे, पण त्याच्या समीक्षेमध्ये अंतर्भूत असलेल्या मूलतत्त्वांना आंतरराष्ट्रीय महत्त्व आहे, सौंदर्यशास्त्रातील माध्यमाच्या कल्पनेचे त्यांनी केलेले विश्लेषण आणि ललित वाङ्‌मयाच्या माध्यमविषयी त्यांनी केलेले संशोधन ही जागतिक कलामीमांसेतील एक क्रांतीकारक घटना आहे. (पृ.१५) करंदीकरांना मर्ढेकर हे जागतिक दर्जाचे सौंदर्यशास्त्रज्ञ वाटतात, इतकेच नव्हे तर सौंदर्यशास्त्रातील जागतिक दर्जाचे क्रांतिकारक संशोधक वाटतात. करंदीकर हे इंग्रजी वाङ्‌मयाचे गाढे विद्वान असून पाश्चात्य कलाविचाराचा त्यांचा प्रगाढ व्यासंग आहे. म्हणूनच मर्ढेकरांसंबंधीच्या त्यांच्या मताला विशेष महत्त्व आहे. करंदीकरांच्या मते, ''वाङ्‌मयीन समीक्षेला सौंदर्यशास्त्राच्या व्यापक पायावर उभे करणे आणि सौंदर्यशास्त्रातील माध्यमाच्या विचारात सुसंगती आणून माध्यमाच्या कल्पनेपासून साधनाच्या कल्पनेची फारकत घेणे हे मर्ढेकरांचे जागतिक कलामीमांसेतील महत्त्वाचे कार्य आहे.'' (पृ.२४)

मर्ढेकरी समीक्षेची मूलतत्त्वे सांगताना करंदीकर मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रीय विचाराने थक्क झाले आहेत. विचारवंत म्हणून आपल्यावर मार्क्सवादाचा प्रभाव आहे हे करंदिकरांनी स्पष्ट म्हटले असले तरी, 'परंपरा आणि नवता' या समीक्षाग्रंथात मार्क्सवादी समीक्षापद्धतीचा त्यांनी कुठेही

अंगीकार केल्याचे दिसत नाही. मार्क्सवादी समीक्षापद्धतीत कुठल्याही वाङ्मयकृतीचा समाजापेक्ष विचार केला जातो. वाङ्मयकृतीत प्रगट झालेली सामाजिक जाणीव आणि लेखकाने केलेला सामाजिक बांधीकलीचा स्वीकार मार्क्सवादी समीक्षापद्धतीचा महत्त्वपूर्ण ठरतो. याबाबत 'परंपरा आणि नवता' या समीक्षाग्रंथात करंदीकरांनी कोणती भूमिका घेतली ते पाहण्यासारखे आहे.

१) 'काव्य आणि सामाजिक जाणीव' या लेखात ते म्हणतात, ''व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधातून निर्माण झालेली ही सामाजिक जाणीव ही काही श्रेष्ठ काव्याची अटळ अट नव्हे (पृ.४६)'' पुढे ते आणखीच स्पष्टपणे म्हणतात ''काव्याचे अस्तित्त्व किंवा श्रेष्ठत्त्व ही निव्वळ त्यांतील सामाजिक जाणिवेवरच अवलंबून आहेत, असे समजणे चुकीचे होईल.'' त्यांच्या मते, ''सामाजिक जाणिवेची कविता कमी काव्यात्म आहे असे मानणे हे सुद्धा तर्कदुष्ट आहे (पृ.४६)'' ''एखाद्या कवितेतील सामाजिक जाणीव ही उत्कटतेने भावगर्भ असेल व तिची भाषेत साधलेली बंदीश ही त्या जाणिवेतील अंगभूत घाट अनुभवाला आणण्याइतकी समर्थ असेल तर ती कविता ही एक श्रेष्ठ कलाकृती आहे, असाच निर्णय द्यावा लागेल. (पृ. ४७)'' त्यांच्या वरील विधानावरून हे स्पष्टच होते की, आपली वाङ्मयीन भूमिका मांडताना ते मर्ढेकरी सौंदर्यशास्त्रातील घाटाचीच परिभाषा वापरत आहेत. प्रा. शंकर सारडा यांना दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात, ''सामाजिक जाणिवेची कविता म्हणजे चांगली कविता असा असमज मी करून घेतला नाही (पृ. १२८)'' याच मुलाखतीनुसार, मनुष्यातील वास्तव व मनुष्याबाहेरील वास्तव हे कोणत्याही एका तत्त्वप्रणालीत गोवता येईल असे त्यांना वाटत नाही. मार्क्सवादी समाजवाद त्यांना परिपूर्ण वाटत नाही. फ्राईडचे मनोविश्लेषण, आइन्स्टाइनचा वैश्विक दृष्टिकोन त्यांना महत्त्वाचा वाटतो. स्वतःला ते बहुतत्त्ववादी म्हणतात कलावंताच्या स्वातंत्र्याचा ते पुरस्कार करतात. कलावंताचे स्वातंत्र्य म्हणजे पूर्व निश्चित विचारांपासून विमुक्त राहण्याचे स्वातंत्र्य त्यांना वाटते. 'कवीशी कानगोष्टी' या लेखात त्यांनी कवीची सामाजिक बांधीलकी नाकारली आहे. कवीचे खरे व्रत त्यांनी 'निरंकुशता' हे सांगितले आहे. मस्तीचे व्रत घेऊन सृजन करणे हा कवीचा जन्मसिद्ध हक्क आहे असे ते या लेखात म्हणतात. यापुढे जाऊन ते स्पष्टच म्हणतात की, ''(कवीने) राज्यकर्त्यांशी, समाजाशी किंवा बुद्धिवंताशी अटीतटीचा संघर्ष करण्यात आपल्या शक्तीचा अपव्ययही करू नये. खरे म्हणजे कवीजवळ कवी म्हणून तशा जातीची शक्ती किंवा साधने नसतात (पृ.२४७)'' गंगाधर गाडगीळांना दिलेल्या मुलाखतीमध्ये सुद्धा ते म्हणतात की, ''सामाजिक जाणीव व उत्कृष्ट काव्य ह्यांचा काही कार्यकारण संबंध आहे, असे मला मुळीच म्हणायचे नाही (पृ. १२३)'' एकंदरीत, त्यांच्या वरील सर्व विधानांवरून हे स्पष्ट होते की 'सामाजिक जाणीव' हा त्यांना श्रेष्ठ वाङ्मय कृतीतील अविभाज्य घटक वाटत नाही. या दृष्टीने ते मार्क्सवादी साहित्य विचारांच्या विरोधी भूमिका घेत आहेत, असे म्हणावे लागेल. 'कविता भोगावी कशी' हा करंदीकरांचा अत्यंत गाजलेला लेख आहे. या लेखात काव्याच्या आस्वादासंबंधी महत्त्वपूर्ण भाष्य करताना ते म्हणतात ''कवितेतील सौंदर्याचा आस्वाद घेणे म्हणजे कवितेतील विविध घटकांच्या परस्पर संबंधातून साकार होणारा एकात्म, स्वायत्त व जीवसदृश्य असा घाट अनुभवणे (पृ. ६०)'' करंदीकर इथे काव्यातील आशयापेक्षा कवितेच्या विविध घटकांतून एकात्मपणे प्रगटणाऱ्या घाटाच्या सौंदर्याचा विचार मांडत आहेत. कवितेतील सौंदर्याचा विचार करताना त्यांना मर्ढेकरी सौंदर्यशास्त्रातील 'घाटा'ची संकल्पना योजावी वाटते, हे लक्षणीय आहे.

'परंपरा आणि नवता' या समीक्षा लेखसंग्रहातील एकूणच तात्त्विक लेख पाहता, ते मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राच्या व कलावादाच्या दाबाखाली लिहित आहेत, हे स्पष्टपणे जाणवते करंदीकर कलावादाचा पुरस्कार करीत नाहीत पण उघडपणे प्रतिवादही करीत नाहीत. आशय आणि अभिव्यक्तीचा एकात्म परिणाम त्यांना महत्त्वाचा वाटतो. आशयाकरीता ते 'जाणीव' हा शब्द योजतात. या लेखसंग्रहातील त्यांचे लेख १९५४ ते १९६६ च्या दरम्यानचे आहेत. हा कालखंड मर्ढेकरी सौंदर्यविचारांच्या व कलावादाच्या दबदब्याचा आहे. त्याचा प्रभाव करंदीकरांच्या टीकालेखनावर पडला असावा. मर्ढेकरी साहित्यविचार त्यांना याकाळातही पूर्णपणे पटत नव्हाताच. त्याच्या काही खुणा या लेखसंग्रहात आढळतात. उदा. 'ललित वाङ्मयाची सांस्कृतिक फलश्रुती' या लेखात त्यांनी मर्ढेकरांपेक्षा वेगळी भूमिका घेतली आहे. मर्ढेकर कलेची फलश्रुती सांगताना, कलेकडून आस्वादाव्यतिरिक्त कसलीही अपेक्षा ठेवणे गैर मानतात. करंदीकर मात्र ललित वाङ्मय मानवी मनावर मूलभूत संस्कार करीत असते असे मानतात. (१) सूक्ष्म संवेदन शक्ती (२) व्यापक कल्पनाशक्ती (३) बरेवाईटपणाच्या म्हणजे औचित्यविचाराच्या सापेक्षतेची समज (४) सर्व साक्षी सहानुभूती (५) अपरिहार्य अस्वस्थता या प्रकारचा हा संस्कार असतो. जीवनदर्शी ललित वाङ्मय अशा प्रकारचा संस्कार मानवी मनावर करीत असते, अर्थात असा

अनुक्रमणिका

संस्कार साहित्य ठरवून करीत नाही, तर तो संस्कार करण्याची क्षमता साहित्यात असते, असे ते म्हणतात. 'परंपरा आणि नवता' या लेखसंग्रहात त्यांचा कलावाद विरोधी सूर फारच क्षीण आहे. उलट मर्ढेकरी सौंदर्यशास्त्र आणि कलावाद यांचा दाब त्यांच्यावर स्पष्टच दिसतो. या लेखसंग्रहातील तात्त्विक लेखाच्या आधारे पुढील निष्कर्ष काढता येतात. (१) परंपरा आणि नवता या ग्रंथात करंदीकरांची समीक्षा पद्धती मार्क्सवादी समीक्षापद्धतीचा स्वीकार करणारी नाही. (२) निव्वळ आकृतीवाद किंवा निव्वळ आशयवाद या दोन्ही भूमिका त्यांना मान्य नसून दोन्हीचा एकात्म परिणाम अपेक्षित आहे. (३) कलावंताच्या स्वातंत्र्याचा त्यांनी पुरस्कार केला आहे. (४) समीक्षक करंदीकरांची वाङ्मयीन भूमिका स्वकाव्याच्या समर्थनार्थ प्रगट झाली नाही.

या ग्रंथातील तात्त्विक लेखांप्रमाणेच मूल्यमापन करणारे लेखही अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. अर्वाचीन मराठी कवितेचे तीन प्रमुख टप्पे म्हणजे केशवसुत, माधवजुलियन आणि मर्ढेकर. या तिन्ही कवींचे सामर्थ्य, त्यांच्या मर्यादा, वाङ्मयीन योगदान यासंबंधी महत्त्वाचे निष्कर्ष व निरीक्षणे त्यांनी मांडली आहेत, त्यांचे बहुतेक निष्कर्ष मान्यही झाले आहेत. या लेखात मुख्यत्त्वे तात्त्विक विचारांचाच परामर्श घ्यावयाचा असल्याने त्याविषयीचे विवेचन टाळून त्यांच्या 'साहित्यमूल्यांची समीक्षा' या ग्रंथातील लेखांचा विचार करताना, त्यांची वाङ्मयीन भूमिका कितपत व कशी बदलली याचा स्थूलमानाने मी निर्देश करणार आहे.

'साहित्यमूल्यांची समीक्षा' या लेखसंग्रहात १९७० ते १९९० च्या दरम्यान लिहिलेले निबंध संग्रहित करण्यात आले आहेत. हे निबंध मुळात इंग्रजीत लिहण्यात आले आहेत. या निबंधातून करंदीकरांनी साहित्य समीक्षा केली नसून ज्या वाङ्मयीन मूल्यांच्या आधारे साहित्य समीक्षा केली जाते वा साहित्य समीक्षेत ज्या वाङ्मयीन मूल्यांना विशेष स्थान आहे अशा काही मूल्यांची कठोर चिकित्सा त्यांनी इथे केली आहे. करंदीकरांचा पिंड गाडगीळांप्रमाणे सर्जनशील टीकाकाराचा नसून, तात्त्विक विवेचन करणाऱ्या निबंधकराचा आहे हे इथे आणखीच स्पष्ट झाले आहे. 'साहित्यमूल्यांची समीक्षा' हा तात्त्विक समीक्षेतील महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राच्या उघड विरोधी भूमिका या समीक्षाग्रंथात करंदीकरांनी घेतलेली आहे. कलावादाचा प्रतिवाद करून जीवनवादाचा पुरस्कार करणे असे या लेखसंग्रहाचे स्थूल स्वरूप आहे. या ग्रंथातील 'साहित्य : एक जीवनवेधी कला' या दीर्घ निबंधात त्यांनी मर्ढेकर विरोधी पर्यायाने कलावादाच्या विरोधी स्पष्ट भूमिका घेतली आहे. मर्ढेकरांनी साहित्य ही एक ललितकला आहे. अशी भूमिका घेतली होती. करंदीकरांच्या मते वाङ्मय ही ललित कला नसून जीवनवेधी कला आहे. ही त्यांची भूमिका आहे. भूमिकेच्या समर्थनार्थ त्यांनी अनेक दाखले व मुद्दे उपस्थित करून मर्ढेकरांचे खंडण केले आहे. करंदीकर म्हणतात, ''श्री बा. सी. मर्ढेकर यांनी साहित्याच्या सौंदर्यशास्त्रावरील दोन भाषणे मध्ये 'साहित्यकृती ही खरोखर भौमितिक आकृती, चौरस किंवा वर्तुळ यासारखी आहे. अशी कल्पना करायला हवी' असे म्हटले तेव्हापासून माझे असमाधान भूमितीच्या श्रेणीने वाढले (साहित्यमूल्यांची समीक्षा पृ.९)'' मर्ढेकरी सौंदर्यशास्त्रातील 'घाटा'चा विचार या लेखात त्यांनी खोडण्याचा प्रयत्न केला आहे. 'परंपरा आणि नवता' या ग्रंथात त्यांनी बऱ्याच ठिकाणी 'घाटा'ची परिभाषा योजली आहे. या लेखात मात्र ते 'घाट' ही संकल्पना साहित्याच्या संदर्भात नाकारीत आहेत. घाट ही संकल्पना फक्त संगीत, नृत्य, शिल्प या ललितकला पुरती मर्यादित असायला हवी असे त्यांना वाटते. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रातील सिद्धांताविषयी ते म्हणतात, ''एका अर्थी त्यांचे सिद्धांत क्रांतिकारक होते परंतु माझ्यासारख्या वृत्तीच्या आणि प्रत्यक्षानुभवाच्या व्यक्तीला ते पूर्णपणे अस्वीकार्य होते. (साहित्यमूल्यांची समीक्षा पृ.१०)'' 'परंपरा व नवता' या ग्रंथात ते मर्ढेकरांना जागतिक दर्जाचे क्रांतीकारक संशोधक मानत होते. साहित्यमूल्यांची समीक्षा या ग्रंथातील 'साहित्यः एक जीवनवेधी कला' या लेखात मात्र ते मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राला कडवा विरोध करीत आहेत. मर्ढेकरी सौंदर्यशास्त्र त्यांना बंदिस्त आणि संकुचित वाटते. साहित्यसृष्टीच्या बदलत्या, बहुरंगी आणि व्यामिश्र स्वरूपाला समावून घेण्याइतपत मर्ढेकरी सौंदर्यशास्त्र त्यांना लवचिक वाटत नाही. ''माझ्या साहित्यविषयक प्रत्यक्षानुभवात कल्पनाजन्य जीवनदर्शनाच्या निर्मितीला घाटापेक्षा प्राधान्य असते. महाकाव्य, शोकांतिका, सुखांतिका, कादंबरी, कविता यांच्या माझ्यावरील प्रभावात ह्या जीवनदर्शनाला केंद्रवर्ती स्थान असते (साहित्यमूल्यांची समीक्षा,पृ.१३)'' घाटापेक्षा जीवनदर्शनाचा पुरस्कार ते करतात. याचा अर्थ कलावादी भूमिकांचा विरोध करून जीवनावादाचा उघड पुरस्कार ते इथे करीत आहेत. 'परंपरा व नवता' या लेखसंग्रहात मर्ढेकरांचे जागतिक कलामीमांसेतील महत्त्वाचे कार्य त्यांनी माध्यमाच्या कल्पनेपासून साधनाच्या कल्पनेची फारकत करणे हे सांगितले होते. मर्ढेकरांच्या संशोधनानुसार ललित साहित्याचे भाषा हे साधन ठरले आणि भावनात्मक आशय हा माध्यम ठरला होता. साहित्यमूल्यांची समीक्षा या ग्रंथातील'साहित्य एक जीवनवेधी कला' या लेखात भाषा ही केवळ साधन म्हणून

त्यांना मान्य नाही. त्यांच्या दृष्टीने भाषा ही आत्मविष्कार आणि सामाजिक संप्रेषण यांच्या गरजेतून निर्माण झालेली मानवी मनाची मूल स्वरूपाची आणि कल्पनाजन्य अशी निर्मिती होय. (पृ.१७) 'वास्तववाद : एक साहित्यमूल्य' या लेखात त्यांनी वास्तववादाचा साहित्यमूल्य म्हणून पुरस्कार केला आहे. वाङ्मयातून केवळ सौंदर्य पाहणे त्यांना योग्य वाटत नाही. या लेखात करंदीकर म्हणतात, ''केवळ ललितकला म्हणून साहित्याचे मूल्यमापन बाह्यरूपाच्या अथवा रूपात्मक सौंदर्याच्या नियमांनुसार करणे म्हणजे साहित्याचे मूल्यमापन बाह्यरूपाच्या अथवा रूपात्मक सौंदर्याच्या नियमांनुसार करणे म्हणजे साहित्याला त्याचे विशिष्ट जाती म्हणून असलेले कार्य नाकारणे होय... वाङ्मयीन कृतीच्या महत्तेचा समग्र अर्थ लावण्यात सौंदर्यात्मक मूल्ये अपुरी आहेत हे पूर्णपणे ओळखून खास वैशिष्ट्यपूर्ण मूल्यांचा शोध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्नांना प्रारंभ झाला पाहिजे (पृ.३४)'' साहित्यसमीक्षेतील विशुद्धतेची संकल्पना त्यांनी फोल ठरविली आहे. विशुद्धतेची संकल्पना त्यांना वाङ्मयीन वास्तवतेला दुर्लक्षणारी, अपुरी आणि अनावश्यक वाटते. कलावादी मंडळी विशुद्ध कवितेचा गौरव करताना दिसतात. त्यासंदर्भात करंदीकर साहित्याच्या क्षेत्रात विशुद्धतेची संकल्पना निरर्थक ठरवितात. 'उत्स्फुर्तता कितपत उत्स्फूत ?' या लेखात वाङ्मयातील उत्स्फूर्ततेची संकल्पना त्यांनी बाद ठरविली आहे. 'वाङ्मयीन महात्मता' या श्रेष्ठ व दीर्घ निबंधात मर्ढेकरांनी लेखकाच्या निर्मिती प्रक्रियेचा विचार करताना आत्मनिष्ठेचा निकष प्रतिपादन केला होता. करंदीकरांनी 'आत्मनिष्ठेचा निकष' या निबंधात 'आत्मनिष्ठे'ला विविध इंग्रजी टीकाकारांची मते उद्धृत करून निरर्थक ठरविले आहे. आत्मनिष्ठेसंबंधी करंदीकर निष्कर्ष मांडताना म्हणतात, ''वाङ्मयीन संदर्भात आत्मनिष्ठा अपायकारक नसते आणि उपयुक्तही नसते. वाङ्मयीन कलाकृतीच्या आकलनात आणि मूल्यमापनात अनुस्यूत असलेल्या समस्यांशी तिचा सुतराम संबंध नसतो. (पृ.६७)''

'सौंदर्याची जुलमशाही' या निबंधात त्यांनी एकूण सौंदर्यशास्त्रालाच निरर्थक ठरविले आहे. मिल्टनने सौंदर्यशास्त्राला तत्त्वज्ञानाची दगलबाज प्रियसी म्हटले होते, हे विधान उद्धृत करून संपूर्ण सौंदर्यशास्त्रच कलेच्या आकलनाच्या संदर्भात फसवे आहे असे त्यांनी म्हटले आहे. सौंदर्यशास्त्रासंबंधी करंदीकर म्हणतात, ''सौंदर्यशास्त्र सनातन आणि वैश्विक आवाहन असलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे आश्वासन देते परंतु एकाचेही उत्तर देण्यात ते यशस्वी होत नाही. सौंदर्यशास्त्र निरस नाही, ते फसवे आहे. (पृ.१६)''

'साहित्य आणि सामान्य माणूस' याल लेखातील त्यांचे विवेचन पाहता, त्यांनी साहित्याच्या संदर्भात जनवादी व जीवनवादी भूमिका घेतलेली आहे. सामान्य माणसाचे साहित्याच्या संदर्भातील योगदान स्पष्ट केले आहे. लोकसाहित्य हे सामान्य माणसांनीच टिकवले आहे, ह्याची ते दखल घेतात. 'परंपरा आणि नवता' या ग्रंथात त्यांनी साहित्यिकांची सामाजिक बांधिलकी नाकारली होती. या लेखात मात्र ते सामाजिक बांधिलकीचा पुरस्कार करीत आहेत. यासंदर्भात त्यांनी मॅक्झिम गोर्कीच्या 'मदर' या कादंबरीने केलेले ऐतिहासिक कार्य सांगितले आहे.

'परंपरा आणि नवता' या समीक्षाग्रंथाच्या पार्श्वभूमीवर 'साहित्यमूल्यांची समीक्षा' या समीक्षाग्रंथातील लेखांतील तात्त्विक विचार पाहता पुढील निष्कर्ष निघतात :

१) या समीक्षाग्रंथात ते कलावादाचा कठोर विरोध करून जीवनवादाचा पुरस्कार करीत आहेत. १९७० नंतर कलावादाचा प्रभाव ओसरल्यानंतरचे हे लेख आहेत. (२)'परंपरा आणि नवता' या समीक्षाग्रंथात त्यांनी मर्ढेकरी सौंदर्यशास्त्र समजून घेण्याचा प्रयत्न केला होता, 'साहित्यमूल्यांची समीक्षा' या समीक्षाग्रंथात ते मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राला कडवा विरोध करीत आहेत. (३)'साहित्यमूल्यांची समीक्षा' या ग्रंथात त्यांनी कलावादी साहित्यसमीक्षेत स्थान असलेल्या विशुद्धता, उत्स्फूर्तता, आत्मनिष्ठा या वाङ्मयीन संकल्पनांना विरोध करून त्यामूल्यांचे खंडण करण्याचा प्रयत्न केला आहे. (४)'साहित्यमूल्यांची समीक्षा' या ग्रंथात त्यांनी जीवनवादी भूमिका घेऊन वास्तववादाचा पुरस्कार केला आहे आणि सौंदर्यशास्त्र फसवे आहे असे प्रक्षोभक विधान केले आहे. (५)'साहित्यमूल्यांची समीक्षा' या ग्रंथात साहित्याच्या संदर्भात सामान्य माणसांचे योगदान स्पष्ट करून त्यांनी सामाजिक बांधिकीचा पुरस्कार केला आहे. विजयाबाई राज्याध्यक्षांना दिलेल्या मुलाखतीत, ते साहित्याच्या संदर्भात आपण मार्क्सवाद मानीत नाही असे म्हणाले होते, पण 'साहित्य आणि सामान्य माणूस' या लेखात त्यांनी मार्क्सवादी भूमिका घेतलेली आहे.

आधारभूत संदर्भग्रंथ :
१) करंदीकर, गो. वि., परंपरा आणि नवता, द्वि. आ., पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८०.
२) करंदीकर, गो. वि., साहित्यमूल्यांची समीक्षा, प्र. आ., पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००४.

डॉ. पुरूषोत्तम माळोदे
'प्रतिभ' राठी ले-आऊट, राष्ट्रभाषा मार्ग, वर्धा - ४४२ ००१
भ्रमणध्वनी : ९७६३३२५३८८

अनुक्रमणिका



ना. धों. महानोरांच्या कवितेचे वेगळेपण

डॉ. गजानन नामदेव जाधव

प्रास्ताविक :

१९६० नंतरच्या कालखंडातील मराठी कवितेला नव्या जाणिवा, नवी शैली, वैशिष्ट्ये आणि जीवनविषयक व्यापक दृष्टिकोन देणाऱ्या महत्त्वाच्या अग्रगण्य कवींमध्ये महानोरांचा समावेश करावा लागतो. १९६० च्या दशकात लिहू लागलेल्या महानोरांचा 'रानातल्या कविता' हा ताजा, टवटवीत वेगळे अनुभवविश्व घेऊन आलेला नव्या दमाचा, उमेदीचा संग्रह होता. त्याचे आणि त्यानंतरच्या वही, पावसाळी कविता, पळसखेडची गाणी या संग्रहांचेही चांगले स्वागत झाले. एक अस्सल ग्रामीण कवी, इतकेच नव्हे तर रानातल्या, शेतातल्या हिरव्या बोलीच्या कविता लिहिणारा कृषककवी म्हणून महाराष्ट्र त्यांना ओळखतो. रानातल्या कविता (१९६७) ते गंगा वाहू दे निर्मळ (२००७) असा चाळीस वर्षांचा महानोरांचा काव्यप्रवास आहे. महानोरांची कविता अनेक दृष्टींनी वेगळी आहे. एकतर रानाशी निगडित निसर्ग संवेदन व्यक्त करणारी अत्यंत महत्त्वाची कविता १९६० नंतरच्या काळात फक्त ना. धों. महानोरांनीच लिहिली. महानोर जणू रानाचे एक अविभाज्य घटक बनलेले आहेत. रानानेच त्यांचे व्यक्तिमत्व घडविलेले आहे. त्यानेच त्यांच्या व्यक्तिमत्वाला एक संवेदनशीलता बहाल केली आहे. 'रानातल्या कविता' या कवितासंग्रहातील पहिलीच कविता या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

"ह्या शेताने लळा लाविला असा की,
सुख दुःखाला परस्परांशी हसलो-रडलो,
आता तर हा जीवच अवघा असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो."
(रानातल्या कविता, पृ.१)

स्थूलमानाने असे म्हणता येईल की, ना. धों. महानोरांचे प्राण रानात गुंतलेले आहेत. त्यांना या रानाचा, शेताचा लळा लागलेला आहे. कारण या रानात निर्मितिशक्ती आहे, कवीतही ती आहे. राननिसर्ग यांच्याप्रमाणे 'स्त्री' सुध्दा कवीचे अनुभूतीकेंद्र आहे. स्त्री, कविता, निसर्ग हे सृजनाच्या-निर्मितीच्या नात्याने परस्परांशी बांधलेले आहेत. त्यामुळेच महानोरांच्या कवितेतील निसर्गघटकांना स्त्री पुरूषांची रूपे लाभलेली आहेत. अर्थातच ही रूपे परस्परसापेक्ष आणि परस्परानुकूल आहेत. कवीचे व्यक्तिमत्व रानाशी, शेताशी एकरूप होऊन गेले, कारण त्यांना जीवनातल्या सुख आणि दुःखांच्या प्रसंगी शेतात, रानात आपले मन रमविता आले. आनंदाच्या प्रसंगी तर बेहोश होऊन कवी 'शब्दगंधे'च्या बाहुत विराजमान होतो, पण दुःखाच्या प्रसंगीही त्याला रान आणि रानातली कविता साथ देते. आपल्या वैयक्तिक, सामाजिक जीवनातील दुःखे शमविण्यासाठी कवीला रानाची साद आणि साथ मिळत गेली, हेच खरे आहे.

ग्रामीण वास्तवाचे भान :

महानोरांची कविता गावापेक्षा शेतात अधिक रमली. तिने शहरी, मध्यमवर्गीय वाचकासाठी भाषा, अभिव्यक्तीच्या बाबतीत आपला रोमँटिक मूड जपला. परंतु अपवादात्मक स्वरूपात का होईना त्यांनी ग्रामीण जीवनाचे भीषण वास्तव साकार केले. 'ग्रीष्माचे ऊन' ही कविता याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

"नांगरून पडलेली जमीन सर्वत्र नुसताच शुकशुकाट
एखादेच चुकार वासरू कुठेतरी उद्‌ध्वस्त घाट."
(रानातल्या कविता, पृ.१४)

अनुक्रमणिका

महाराष्ट्रातील एका दुष्काळातील खेड्याचे चित्रण करणारी ही कविता अत्यंत वास्तव, यथार्थ आहे. दुष्काळासाठी 'ग्रीष्मातले उन्ह' ही अर्थपूर्ण प्रतिमा कवीने या कवितेत चपखलपणे योजलेली आहे.

'ग्रीष्माचं उन्ह.
ग्रीष्माचे उन्ह एकदा खेड्यावर आले.
खेडे उदास झाले. (रानातल्या कविता, पृ. १४)

महानोरांची ही कविता ग्रामीण जीवनातील कठोर वास्तवाची भेदक ओळख करून देते. दुष्काळाची भयावहता आणि भेसूरता मानवी जीवनाला ग्रासून टाकणारी आहे. या खिन्नमनस्क अनुभूतीची प्रचिती येथे पुढील कडव्यात अधिक उत्कटतेने येते -

''मी एकटा स्तब्ध उभा झाडाच्या बुंध्याशी,
उघड्या डोळ्यांनी
उघड्या डोळ्यांनी पाहिलीत दोन भुकेने तडफडून
गेलेली कारटी
पाणवटल्या डोळ्यांनी गोऱ्याराजाचे महिमान
गाणारी जख्ख म्हातारी
मी पाहिल्या पासरीभरी ज्वारीवर भोग देणाऱ्या
रूपवंत पोरी
नांगरून पडलेली जमीन सर्वत्र. नुस्ताच शुकशुकाट
एखादेच चुकार वासरू कुठेतरी.
उद्ध्वस्त घाट.''(रानातल्या कविता, पृ.१४)

अशी ही महानोरांची ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणारी वस्तुनिष्ठ कविता आहे. पण ती अपवादात्मक आहे. दुष्काळामुळे ग्रामीण जीवनाची कशी होरपळ होते, याचे अंतर्मुख करणारे चित्रण हे या कवितेचे बलस्थान आहे.

'वही' आणि 'पावसाळी' कविता :

महानोरांचा 'वही' (१९७१) हा संग्रह 'रानातल्या कविता' नंतर चार वर्षांनी तर 'पावसाळी कविता' (१९८२) हा अकरा वर्षांनी प्रकाशित झाला. ह्या दोन्हीही संग्रहांतील कविता आपल्या पहिल्या संग्रहाशीच नाते सांगणाऱ्या आहेत. स्त्री सौंदर्य, श्रृंगारभावना, प्रेमानुभव इत्यादी विषयांवरील 'रोमँटिक मुड'च्याच कविता त्यात आधिक्याने असल्याचे आढळून येते. 'वही'तील कविता प्रामुख्याने लावणीवजा आणि भावगीतसदृश आहे. पण आशयाच्या दृष्टीने ती 'रानातल्या कविते'पेक्षा फारशी वेगळी नाही. 'पावसाळी कविता' मध्ये महानोर थोडे फार वास्तवसन्मुख होत असल्याचे जाणवू लागते. मात्र 'रानातल्या कवितां'ची बेहोषी येथेही आहे, पण त्याचबरोबर या संग्रहातील काही कवितांतून ग्रामीण समाजवास्तवाचे सजग भान प्रकट होत असल्याचे आढळून येते.

शेतकऱ्याच्या जीवनसंघर्षाचे जे विविध पैलू आहेत, त्यात भीषण दुष्काळी परिस्थितीविरूध्द संघर्ष हा जणू त्याच्या वाट्याला आलेला एक सनातन भोग आहे. या संग्रहातील कविता दुष्काळी परिस्थितीची विदारकता किती नेमक्या शब्दांत साकार करते, याची प्रचिती पुढील काव्यपंक्तीतून आल्याशिवाय राहत नाही.

''संसार पाठीशी बांधून निघाली
गरिबी दुष्काळात
प्रत्येक गावकोसात वाळल्या झाडीचे वैराणपण, एकले
नशिबाहूनही.
कोणीही पदरात देणारे नाही दान
कष्टाचे सुध्दा.
फाटक्या गोधडीचे गाठोडे बांधून लेकरांसाठी
वैशाखी उन्हात रानात रडणारी दुपारी एकटी''
(पावसाळी कविता, पृ.१२)

'पक्ष्यांचे लक्ष थवे' :

'पक्ष्यांचे लक्ष थवे'(१९९०) हा महानोरांच्या निवडक शंभर कवितांचा उत्तम क्षीरसागर यांनी संपादित केलेला संग्रह. आहे. या कवितांमध्येही निसर्ग सौंदर्य आणि स्त्रीचे लावण्य यांना प्राधान्य असणाऱ्या कवितांच अधिक आहे. पण काही कविता ग्रामीण वास्तवाकडे झुकणाऱ्या आहेत. त्यांतून खेड्यातल्या स्त्रीचे दुःख आणि तिची वेदना व्यक्त झाली, पाण्याच्या समस्येमुळे खेड्यातील माणसांचे होणारे हाल व्यक्त केले आहेत. त्यांनी तेथे करूणाघनाला, निसर्गाला केलेली विनवणी आहे. 'पीकपाणी येऊ दे, आबादानी होऊ दे, खेडी खुलू-फुलू दे' हा या विनवणीचा सूर आहे. थोडक्यात, 'पक्ष्यांचे लक्ष थवे' या संग्रहातील कवितांमध्ये शेतकऱ्यांच्या जीवनकलहातील दाहकता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय हा जीवनकलह कमी व्हावा म्हणून निसर्गाची प्रार्थना केली आहे. शेतकऱ्यांचे जीवन हे पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे आणि पाऊस पडावा म्हणून निसर्गाची, दयाघनाची करूणा भाकण्याचा सूर येथे आढळून येतो. तरी पण मुळात महानोरांचा पिंडच सौंदर्यवादी, रसिक, आत्मनिष्ठ आणि प्रेमलुब्ध व्यक्तिमत्वाचा आहे, हेच त्यून स्पष्ट होते.

अनुक्रमणिका

'प्रार्थना दयाघना' :

१९९० साली प्रसिध्द झालेल्या 'प्रार्थना दयाघना' या संग्रहात सहा मोठ्या कवितांचा समावेश आहे. त्यापैकी 'पंचनामा' मध्ये दंगलीनंतरच्या शहरी आणि ग्रामीण जीवनातील विषण्णता शब्दबध्द झाली आहे. हिंसा, क्रौर्य, सरकारची निष्क्रियता, सामान्य माणसाची असुरक्षितता, माणुसकीचा बळी, मूल्यबधिर, नीतीभ्रष्ट समाजमन इत्यादी गोष्टींचा हा जाहीर पंचनामा आहे. 'दीपस्तंभ' ही समाजाला ढासळत्या परिस्थितीतही जगण्याची प्रेरणा देणारी कविता आहे. 'समुद्रापलिकडचा समुद्र' ही शीर्षकाप्रमाणे परदेशातील प्रवासाचे आणि तेथील संस्कृतीचे चित्रण करणारी कविता आहे. 'नक्षत्रामागून नक्षत्रे सरत जातात' या कवितेत कवीच्या आयुष्यात घडणाऱ्या आठवणी काव्यरूप धारण करतात.

''सुना सोन्याचा पिंपळ'' या कवितेत खेडयाच्या उद्ध्वस्त झालेल्या जीवनाचे चित्रण येते. दुष्काळ पडला आहे, पीकं करपली आहे, पशु-पाखरे निघून गेली आहेत. चूल पेटत नाही, संसाराची रया गेली, माणसं माणुसकीला पारखी झाली आहे, संपूर्ण खेडे आणि तेथील परिसर उदास-भकास झाला आहे.

''उभ्या श्रावणाचा झाला
शुभ्र वैशाखी पारवा
हिर्वं जाळून आभाळ
निघालेलं गावोगावा
भुई भेगाळली सारी
कुठे थोडा ना ओलावा
गुराढोरांचा हंबर
तहानेनं व्याकुळावा'' (प्रार्थना दयाघना, पृ. ३०)

अशा मार्मिक शब्दांत कवीने उद्ध्वस्त खेड्याची विनाशकारी लय अचूकपणे टिपली आहे.

दुष्काळांच्या अस्मानी आपत्तीमुळे खेडी होरपळत आहेत. त्याची झळ पशुपाखरे, शेतीमाती, गुरेढोरे आणि एकुणच काळी-पांढरी या साऱ्यांना सोसावी लागत आहे. अशा या दुष्काळी वणव्याचे चित्रण करताना कवी म्हणतात -

''खेडे उद्ध्वस्त, उदासवाणे
छिन्नभिन्न झालेले
भयाण दुष्काळात
होरपळ झाडांना
माणसांना वेटाळून संसारभर
आपापले सुखदु:ख'' (प्रार्थना दयाघना, पृ. ६)

त्याचा भीषण परिणाम म्हणून खेड्यातले चैतन्य संपून चालले. माणसामाणसातले हळुवार ऋणानुबंध कमी होत चालले. आपले इवले संसार मोडक्या बैलगाडीत टाकून माणसे शहरांकडे चालली. खेड्याचे उद्ध्वस्तपण आर्थिक आणि भौतिक स्वरूपाचेच आहेच, पण त्याचबरोबर ते भावनिक आणि सांस्कृतिकही आहे. खेड्यातल्या या दु:स्थितीला दुष्काळ तर कारणीभूत आहेच. परंतु बेजबाबदार शासनानेही त्याची तीव्रता वाढविली आहे. शासनाच्या धोरणांची आणि त्यांच्या परिणामांची वस्तुस्थिती सांगताना कवी म्हणतात-

''स्वातंत्र्य आलं
सुखाचं हिरवेपण
शहराला गेलं.
शेतीच्या आयुष्याला
गाडगं मडकं आलं.'' (प्रार्थना दयाघना, पृ. ११)

शेतकऱ्यांचे काबाडकष्ट, त्यांच्या हालअपेष्टा, दुष्काळ आणि निसर्ग यांच्याशी त्यांचा सुरू असलेला संघर्ष, तर कवी रेखाटतातच पण त्याचबरोबर राज्यकर्तेसत्तेचे राजकारण करतात. मतांची भीक मागतात, गेंड्याची कातडी पांघरूण दांभिकपणे मिरवतात. शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दूरगामी धोरणांची अंमलबजावणी करीत नाही.

'प्रार्थना दयाघना' या दीर्घकाव्यात कवीने निसर्गाच्या प्रकोपाचे चित्रण केले, ढासाळलेल्या समाजव्यवस्थेचे दर्शन घडविले. ह्या साऱ्यांमुळे सर्वस्वी निराशा झालेली खेडुतांची मन:स्थिती या कवितेतून व्यक्त झाली आहे. पण तरीही कवी आशावादी आहे. या आशावादाला प्रयत्नाची जोड दिली पाहिजे, असे त्यांचे मत आहे. विज्ञानाच्या वाटा रानावर रूजतील, ऋतुचक्र बदलेल. धरण, शेती, नदी, माणसे, झाडे, पशुपक्षी सारे काही धन्य, तृप्त, संतुष्ट होतील. त्यासाठी कवी दयाघनाला प्रार्थना करतो आहे.

अशाप्रकारे महानोरांची कविता ही प्रामुख्याने रोमँटिक वळणाची, सौंदर्यवादी कविता आहे, असे मानले जात असले तरी यांच्या कवितेतून ग्रामीण वास्तव आणि त्यातही शेतकऱ्याचा जीवनसंघर्ष भरघोसपणे, अत्यंत परिणामकारकरित्या व्यक्त होतो, ही वस्तुस्थिती आहे. 'प्रार्थना दयाघना'मध्ये मात्र त्यांची कविता प्राधान्याने वास्तवाभिमुख बनली आहे. दुष्काळ, दंगल, खेड्यातील दारिद्रय, शारीरिक

अनुक्रमणिका

आणि मानसिक उपासमार आणि एकूणच खेड्यातील उद्ध्वस्त होत जाणारे जनजीवन हा तिचा आस्थाविषय आहे. आधुनिकीकरण, झपाट्याने वाढणारे शहरीकरण, भ्रष्ट राजकारण, पाऊस पाण्याची अनिश्चितता, यंत्रयुगाचे आक्रमण, दारिद्रय आणि माणसांची संवेदनशून्यता ह्या साऱ्या बाबी 'प्रार्थना दयाघना' मध्ये जाणवतात.

सौंदर्यशोध ते प्रार्थनाबोध :

महानोर हे एक सतत प्रयोग करणारे, चिंतनशील शेतकरी व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपले सारे व्याप-ताप आणि मनस्ताप सांभाळून आपल्या जगण्याची कविता केली आहे. महानोरांच्या काव्यप्रवासातील टप्प्यांसंबंधी भाष्य करताना रा. ग. जाधव म्हणतात, ''...ते आपल्या पिढिजात शेती व्यवसायातच रमले... स्वत:चे भावजीवन आणि आपल्या रानाचे भूमिजीवन यांच्यात अखंडपणे चालणारा संवाद आणि वाद हेच महानोरांच्या सर्जनशील संवेदनशीलतेचे खरेखुरे चैतन्यतत्व आहे. ऐन विशीतील उत्फुल्ल यौवनाच्या सौंदर्यपर्वात त्यांच्या रानातल्या कविता निर्माण झाल्या. हे सौंदर्यपर्व वही (१९७१), अजिंठा (१९८४) या कवितांपर्यंतच म्हणजे कवीच्या चाळीशीपर्यंत टिकून राहिले. वयाच्या पन्नाशीत ते सौंदर्यपर्वातून बाहेर पडले आणि प्रार्थनापर्वात प्रविष्ट झाले. 'प्रार्थना' ही देखील एक शेत-शेतकऱ्यांची हिरवी बोली आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यांची सौंदर्यपर्वातील कविता ही जशी रानाची, रानासाठी आणि रानातून अवतरली, तशीच दयाघनासाठी केलेल्या सहा दीर्घ प्रार्थना यादेखील शेताच्या, शेतीसाठी आणि शेतातून निर्माण झाल्या. रान हे महानोरांचे किंवा महानोरांमधील सर्जकाचे एक नंदनवन आहे. हे नंदनवन लाभले, तेव्हा त्याच्या कवितेचे सौंदर्यपर्व उदयास आले आणि ते नंदनवन गमावले, तेव्हा त्यांच्या कवितेचे प्रार्थनापर्व अवतीर्ण झाले, असे म्हणता येईल.''

'पानझड' :

'पानझड' या काव्यसंग्रहात ८१ गेय कविता आहेत. महानोरांची गाणी, त्यांच्या लावण्या, महानोरी शैलीतल्या निसर्ग आणि प्रीतीच्या भावना व्यक्त करणाऱ्या खास गीतरचना येथे आढळतात. येथे ग्रामीण परिसरातला वेड लाणारा निसर्ग आहे. मोकळा शृंगार, मुक्त प्रणय, मादक वातावरण, नादमधुर शब्दबंध, गेय रचना याबाबतीत रानातल्या कवितांचा महानोरी बाज आहे. पण त्याचबरोबर 'पानझड'च्या प्रारंभी कवीने दु:खद, आर्त, व्याकूळ जीवनासंबंधीच्या भ्रमनिरासाची जाणीव व्यक्त करणारा सूरही आळविला आहे. त्यातून असे दिसून येते की, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या या युगात माणसाची माती बेईमान झाली आहे. जाईच्या मांडवाला कारल्याच्या वेलाने वेढले आहे. दुरावलेले गणगोत, कूपमंडूक वृत्ती, माणसामाणसांतील संबंधांत येत चाललेला गढूळपणा, माणूसपण हरवलेला माणूस इत्यादी अनेक बाबींमुळे खेडी आतून पोखरत चालली. तेथील वातावरणात आंतरिक दुभंगलेपण, मानसिक दुरावा, नैतिक मूल्यांची पडझड आणि कोरडी उदासीनता यामुळे खेड्यातील माणसांचा जीवनसंघर्ष तीव्र व्यामिश्र, दुखरा होत चालला आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, पाण्यासाठी अनवाणी हिंडणारी माणसे, कुणी कुणाची वेदना समजून घेत नसल्याची सल, मुखवट्यांचे जग, सत्ताधाऱ्यांचे नाकर्तेपण आणि स्वातंत्र्यानंतरचा भ्रमनिरास, माणसांच्या भेटीतला उडून गेलेला ओलावा तसेच जगण्याला आलेलं एक रूखे सुकेपण असे टळटळीत वास्तव व्यक्त करणारी ही कविता आहे. त्यामुळे कृषिनिष्ठ जीवन जगणारा ग्रामीण माणूस आज घायाळ आणि व्याकूळ झाला आहे. त्याचे नितळ प्रतिबिंब म्हणजे 'पानझड' मधील दुसरा भाग होय. 'पानझड' मधील कवीचा सूर आर्ततेचा असला तरी तो आशावादी आहे.

''मोडलेल्या माणसांचे दु:ख ओले झेलताना
त्या अनाथाच्या उशाला दीप लावू झोपताना''
(पानझड, क्र.४४)

शेत, रान, मृगनक्षत्र, पिकांचा दरवळ, पाखरांच्या चोची, कुणब्याचा मळा इत्यादी अनेक कृषिनिष्ठ संदर्भ येथे आहेत. दुष्काळाने संसाराची थट्टा केली, शेतीची रया गेली, सोयऱ्याची माया ओसरली अन् कुणबी मोडून पडला. या दु:खाची अत्यंत व्याकूळ करणारी, काळजाला पीळ पाडणारी मांडणी कवीने केली आहे. अशी ही खेड्याची संघर्षपूर्ण, दु:खमय कहाणी संपुष्टात येवो. त्याची सल, कळ, ठणक शांत होवो, असेही पसायदान कवीने मागितले आहे.

''ओंजळीने भरू दे गा
पाखरांच्या चोची
दु:खी पंखांना असो
सावली मायेची
...आबादानी होवो
शेत भरू दे दाण्याचे
तुझ्या पालखीला
शब्द बांधू तुकोबाचे (पानझड, पृ. १३)

महानोरांनी शेतकरी दिंडीचे, किसानयात्रेचे भावपूर्ण अन् प्रेरणादायी वर्णन केले आहे. भुई, पीक, पाणी, शेत, शेतकरी, स्त्री यांच्या सुखाची त्यांनी कामना केली आहे. त्यासाठी त्यांनी विठोबा, पंढरपूर, वारकरी, देहू, आळंदी या भागवत संप्रदायाला मानणाऱ्या मानसिकतेचा त्यांच्या अध्यात्माचा आधार घेतला. कवीचा हा आशावाद स्वप्नाळू, रंजक, भावनिर्भर बनविणारा आहे. एक प्रकारे शेतकऱ्यांचे हे दुःख व्याकूळ हळव्या मनाने ते समजून घेत आहे. त्यात दुःखाची सल आहे. पण शेतकऱ्यांच्या या दुःखाला, शोषणाला त्यांनी संघर्षाची धार दिली नाही.

''येऊ देगा पीकपाणी
जन्म दुःखाच्या कारणी
सोनसळी मातीतला
गंध भरू दे अस्मानी
काळं बर्बट जळो
गंगा वाहू दे निर्मळ
लाख चांदण्या गोंदून
कधी भरू दे आभाळ'' (पानझड, पृ. ४७)

कवीचा हा आशावाद कितीही मूल्ययुक्त, उदार असला तरी तो हळवा आणि भाबडा आहे, यात शंका नाही. अशा प्रकारे 'पानझड' मध्ये शेतकऱ्याचे दुःख, त्याचे शोषण, त्याच्या हाल अपेष्टा कवीने काव्यात्म पातळीवर समूर्त-साक्षात केल्या आहे. 'पानझड' मधील शेतकऱ्यांची जीवनकथा ही अशी आहे. त्यात वेदना अधिक संघर्ष कमी, करूणा अधिक धार कमी आणि 'सोसणे' अधिक उद्रेक कमी, अशी परिस्थिती आहे.

ग्रामीण भागातील समाज प्रामुख्याने शेती करतो. शेतीत राबण्यासाठी 'टीमवर्क'ची गरज असते, त्यासाठी संपूर्ण कुटुंबाला सामंजस्याने खपावे लागते. आपल्या पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत, पितृप्रधान कुटुंबपध्दतीत स्त्रीचे स्थान दुय्यम, गौण मानले जाते. वास्तविक पुरूषांच्या तुलनेत स्त्रीला निश्चितच जास्त कष्ट करावे लागतात. घर आणि शेत ही तिची राबण्याची दोन रणक्षेत्रे असतात. शिवाय पुरूषापाशी सरंजामी मनोवृत्ती आणि स्त्रीकडून अपेक्षिलेला समर्पणशील सेवाभाव त्यामुळे तिची कायमची कुचंबणा होत असते. त्यातही पुरूषाचा तिच्याकडे पाहण्याचा भोगवादी दृष्टिकोन, त्यामुळे तिच्यावर लादलेली बाळंतपणे, वंशाच्या दिव्याची हाव आणि तो मिळाला नाही तर तिची होणारी हेळसांड, अपत्यसंगोपनाची जबाबदारी अशा अनेक आघाड्यांवर तिला भोगावे लागते, सोसावे लागते आणि झगडावे लागते. तिच्या ह्या व्यथा-कथांची काव्यात्म मांडणी महानोरांनी 'तिची कहाणी' मध्ये सूत्रबध्द स्वरूपात आवश्यक त्या तपशिलांनिशी केली आहे. त्यातून आपल्याला शेतकरी स्त्रीचा जीवनसंघर्ष किती तापदायक आणि क्लेशकारक आहे, हे कळते.

'तिची कहाणी' :

'तिची कहाणी'मधील स्त्री अहोरात्र काबाडकष्ट करते. तिचे जगणे हे मुळी स्वतःसाठी नसतेच; ती सदैव घरासाठीच जगत असते. तिची मानसिकता कवीने अत्यंत सहजपणे सूचित केली आहे.

''ती दररोज ओवी गाते सूर्यासाठी
संसारातल्या सुखदुःखासाठी
प्रकाश मागते
अंधाराच्या कडा पुसून टाकण्यासाठी''
(तिची कहाणी, पृ.१)

'तिची कहाणी' ही काही एका स्त्रीची कहाणी नाही. अनेक स्त्रियांच्या जीवनात घडलेल्या, घडू शकणाऱ्या दुर्घटनांची ती कथामालिका आहे. त्यामुळे तिच्यातून स्त्रियांच्या हालअपेष्टांची शोषणाची सामूहिक अभिव्यक्ती होते.

एका कहाणीतील नवरा दारूड्या आहे, तो तिला सतत छळतो, तिच्या रोजंदारीचे पैसे दारूसाठी मागतो. गावात कोणीही तिची बाजू घेत नाही, तिला मदत करीत नाही. त्याचा आडमुठेपणा, पदरात लहानगी चिमणी पाखरं; घरीदारी प्रेम नाही, सतत उपासमार आणि कोंडमारा, अशी ही विपरीत स्थिती आहे. शेवटी नवऱ्याने जखमी केले, हाणून-मारून घायाळ केले; म्हणून ती स्त्री असह्य ताणांमुळे मरण पावते.

दुसऱ्याला एका कहाणीतून पंधरा-सोळा वर्षाचे अल्लड स्त्रीमन उद्ध्वस्त करणारी पुरूषी बलात्कारी वृत्ती संवेदनशील माणसाचे अंतःकरण हेलावून सोडणारी आहे. बलात्कारित तरूणीचे दुःख कोणीही आस्थेने समजून घेत नाही. तिची प्रचंड वेदना, तिच्या मायबापांचा आक्रोश, हा विषय आवडीने चघळणारा संवेदनशून्य समाज; गावातील मुखंड-पोलीस आणि आर्थिक सत्तेचा प्रभाव यामुळे तिची दमकोंडी होते. या बिकट स्थितीतून सुटण्यासाठी तिच्यासमोर मरणाला सामोरे जाण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही, अशा अनेक स्त्रिया समाजातील परंपरागत पुरूषी वर्चस्वाला सामोऱ्या जातात.

ह्या कहाण्या वास्तवसन्मुख होऊन स्त्रियांच्या यातनांचा वेध घेतात. त्या स्त्रीच्या जगण्यातली मरणाची धून ऐकवतात.

अनुक्रमणिका

उदाहरणार्थ, घराण्याचा नावलौकिक आणि डामडौल राहावा म्हणून तिचा पौरूषहीन 'पुरूष' कुणाचं तरी कलभूत आणून तिच्यासमोर उभा करतो आणि गढीसाठी 'मालक' निर्माण करण्याची बळजबरी तिच्यावर केली जाते. अशीच बळजबरी तिचा नवरा मरण पावला तर तिला ऐन पंचविशीत अठरा वर्षांच्या 'दिरा'सोबत पुन्हा लग्न करण्यासाठी भाग पाडले जाते. स्त्री सून म्हणून आली की जणू त्या घराच्या मालकीची वस्तू होते आणि वस्तूचा मूळ मालक गेला तरी तिला त्या घराशी नाते तोडता येत नाही.

'तिची कहाणी' या संग्रहातील शेवटच्या अकरा कविता आईसंबंधीच्या आहेत. आईचे कष्ट, तिचे दुःख, तिचे वात्सल्य, तिची उपासमार, तिची दुःख सोसण्याची शक्ती, तिचा जिव्हाळा आणि एकूणच स्त्रीत्वाची उदात्तता कवीने अत्यंत भावपूर्ण शब्दांतून व्यक्त केली आहे. त्यातून आईची संघर्षशील प्रतिमा साकार होते.

> ''दोन जात्याच्या पाळूत लाख भरडले दाणे
> साधे जगणेही व्हावे किती किती जीवघेणे
> जीवघेण्या संसाराचा कधी केला ना कंटाळा
> तुझ्या मायेच्या हातांनी लाविलास भाळी टिळा
> (तिची कहाणी, पृ.५३)

अशी ही माय कष्टाळू, प्रेमळ, जगण्याची लढाई जिवापाड, निकराने लढणारी. पण प्रेम, सेवा, वात्सल्य ह्या तिच्या जीवनमूल्यांमुळे तिला जगण्याचे आणि लढण्याचे बळ मिळते. 'तिची कहाणी'मध्ये महानोरांनी तिचे दुःख-दारिद्र्य, कष्ट, त्याग, अभावग्रस्तता तर सांगितले आहेच, पण त्याचबरोबर तिच्याविषयी त्यांनी कृतज्ञताही व्यक्त केली आहे. म्हणून ते म्हणतात -

> ''तुझे दुःख भोगण्याचे, माझ्या अंगी यावे बळ
> तुझ्या अथांग गंगेचं पाणी वाहू दे निर्मळ''
> (तिची कहाणी, पृ.५९)

अशी 'तिची कहाणी' ही काही कोण्या एकीची कहाणी नाही. ही समस्त मराठी स्त्रीची प्रातिनिधिक संघर्षपूर्ण, नाट्यमय, करूणगंभीर, कर्मकहाणी आहे.

'गंगा वाहू दे निर्मळ' :

'गंगा वाहू दे निर्मळ' हा महानोरांचा काव्यसंग्रह म्हणजे शेतकऱ्यांच्या व्यथांची गाथा होय. ह्या कविता उद्‌बोधक, वर्णनात्मक, विधानसदृशः आहेत. पण त्यात कृषिजीवनाच्या वाताहतीची खंत आहे, बळीवंशाच्या दुःखाची सल आहे, त्यांच्या शोषण-दारिद्र्याची कैफियत आहे. यातील काही कविता कृषिजीवनाची, त्यासोबत घालविलेल्या वैयक्तिक हकीकतींची स्मरणरंजनी अभिव्यक्ती आहे. खेड्यातील ती निसर्गरम्यता, तो जिव्हाळा, बालपणीचे ते हळवे क्षण, आईविषयी कृतज्ञता, अजिंठ्याचा सुंदर आसमंत, हंगामाची धुंदी, तारूण्याची मस्ती, हिरव्या रानाची विलोभनीयता, पाखरांची किलबील, गावातील अद्‌भुतता इ. बाबी 'गंगा वाहू दे निर्मळ' या संग्रहातून प्रत्ययास येतात.

पण या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे शेतकऱ्याची आबाळ आणि हेळसांड, विज्ञान-तंत्रज्ञानाचा, शेतीवर होणारा आघात आणि त्यातून तिला येणारी अवकळा यांचेही दर्शन घडते. या संग्रहातील सर्व कविता रानमाळाशी, पाऊसपाण्याशी निगडित आहेत. त्यात बळिवंताच्या पुण्यमय कष्टांचं गुणगान आहे. बळिवंतांना आनंददायी प्रेरणा देणारे समूहगान आहे. 'गंगा वाहू दे निर्मळ' मध्येही आईशी होणारा संवाद आहे. त्यात तिच्याविषयी कृतज्ञतेची भावना आणि गौरववृत्ती आहे. तिचे शेतीमातीशी असलेले अनन्यसाधारण नातेही कवीने अधिसूचित केले आहे. त्यात आईची माया, तिचा त्याग, तिची सोशिकता, तिचा करारी बाणा, तिचा निर्धार आणि संकल्प, तिने भोगलेले दुर्दैव आणि केलेले कष्ट, तिची सोशिकता आणि तिचे वात्सल्य या साऱ्या बाबी कवीने निवदेनाच्या पातळीवर आणि उपकृततेच्या भावनेने ओथंबलेल्या आहेत. तसेच सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे आईचे शेतीशी, बाईचे भुईशी, स्त्रीचे जमिनीशी असलेले नाते कवी सहजपणे व्यक्त करतो आहे. त्याप्रमाणे आईचे जिवजित्राबांशी, वृक्षवेलीशी, सृजननिर्मितीशी असलेले भावबंधही व्यक्त झाले आहे.

ही कविता दीर्घ, कथनपर, विधानात्मक, गद्यप्राय आणि वक्तृत्वपूर्ण आहे. तिच्यात स्वातंत्र्यानंतरच्या सर्व योजनांच्या यशापयशाचा पाढा वाचला आहे. शेती, शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भगात राहणारी जनता यांच्या कृषिनिष्ठ जीवनशैलीवर, उपजीविकेच्या साधनावर झालेला आघात यांचा हा एक प्रकारचा आलेख आहे. राज्यकर्त्यांची कृषिविषयक कार्यक्रमाबद्दलची अनास्था, सरकारी कर्मचाऱ्यांची संवेदनशून्यता, दुष्काळावरील उपाययोजना मधील गैरप्रकार, सरकारी योजनांमधील भ्रष्टाचार याविषयी कवीने आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. ही सारी चक्रावून टाकणारी राजकीय-आर्थिक व्यवस्था शेतकऱ्यांच्या दुःख, दैन्यात भर टाकणारी आहे. हे सर्व पाहून कवीच्या अंतःकरणात अस्वस्थतेचे मळभ दाटून येतात. अशाप्रकारे महानोरांना

अनुक्रमणिका

लाभलेल्या आत्मिक बळाच्या आधारावर ते शेतकऱ्यांना वस्तुस्थितीची जाणीव करून देतात आणि राज्यकर्त्यांना शेतकऱ्यांविषयी वास्तव भूमिका घ्यायला, सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारायला प्रवृत्त करतात.

अशा प्रकारे 'गंगा वाहू दे निर्मळ'मध्ये इतर कविता बरोबरच महानोरांनी समकालीन कृषिविषयक जाणिवा व्यक्त करणारी कविता लिहिली आहे. त्यात शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारे भीषण वास्तव आहे. सरकारी योजनांचा आणि धोरणांचा जाहीर पंचनामा आहे. यातील ह्या बहुतांश कविता 'आईला' उद्देशून लिहिल्या आहेत. तिला जणू त्यांनी ही शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाची, त्याच्या परवडीची कहाणी सांगितलेली आहे. येथे ही 'आई' त्यांची आई तर आहेच, हा वैयक्तिक संदर्भ महत्त्वाचा आहे. परंतु 'आई' ची ही प्रतिमा कवीने अनेकवेळा, सातत्याने वापरली असल्याने त्या 'आई'चे भूमी, शेती, काळी 'आई' या व्यापक प्रतिमात रूपांतर होते. याचा अर्थ येथे कवी 'आई' म्हणजे काळ्या आईला, शेतकऱ्यांची म्हणजे तिच्या लेकरांची हकीकत सांगतो आहे. यामुळे वैयक्तिक आशयाची ही कविता व्यापक, वैश्विक आणि सार्वकालिक अशा प्रकारच्या चिंतनामध्ये प्रवर्तित होते, यात शंका नाही. 'गंगा वाहू दे निर्मळ' या शीर्षकातून कवीने कृषिजीवनाची प्रदूषित झालेली गंगा प्रवाही आणि शुध्द व्हावी, अशी आळवणी केली आहे. शेतकऱ्यांचा जीवनप्रवाह हा अप्रतिहतपणे गतिमान असला पाहिजे, त्याला त्याच्या जीवनातील संघर्षावर मात करण्याचे बळ मिळाले पाहिजे, अशी आस येथे कवीने व्यक्त केली आहे.

समारोप :

ना. धों. महानोर हे मराठीतील एक लोकप्रिय गीतकार आणि सुप्रसिध्द कवी आहेत.शेती आणि शेतकरी हाच त्यांच्या सुख-दुःखांचा विषय असल्याने शेतकरी व्यक्तिमत्वाचे साहित्यिक म्हणून त्यांची ख्याती आहे. १९७८ साली कापूस भाववाढीच्या आंदोलनात, शेतकरी दिंडीत ते प्रत्यक्ष सहभागी झाले होते. १९६७ ते १९९० या काळात त्यांचे सहा काव्यसंग्रह प्रसिध्द झाले आहेत. शेतकऱ्यांच्या समस्या आणि कृषिजीवनाची वाताहत प्राधान्याने शब्दांकित करणारा 'प्रार्थना दयाघना' हा त्यांचा एकमेव काव्यसंग्रह आहे. पण त्यात त्यांनी शेतकऱ्यांचे अवघे भावविश्व दुर्दैव आणि शोषणकांड कवेत घेतले आहे.

ना. धों. महानोरांनी पानझड (१९९७), तिची कहाणी (२०००) आणि गंगा वाहू दे निर्मळ (२००७) ह्या काव्यसंग्रहांतून शेतकऱ्यांचे दुःख, त्यांची होणारी आबाळ आणि हेळसांड, स्त्रीजीवनाची फरपट आणि होरपळ अत्यंत नेमक्या, समर्पक शब्दांत व्यक्त केली आहे. त्यातून त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनातील कारूण्य प्रभावीपणे मांडून त्यांच्या सुखसमृध्दीसाठी निसर्ग, समाज आणि शासन यांना आवाहन केले आहे. अशाप्रकारे १९९० नंतरच्या काव्यनिर्मितीतून महानोरांनी इतर विषयांबरोबरच शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदनांची आस्थापूर्वक उदंड, जिव्हाळ्याने कैफियत मांडली आहे. याचा अर्थ महानोर हे काही केवळ रोमँटिक व्यक्तिमत्वाचे, सौंदर्यवाही नाहीत; तर त्यांना ग्रामीण वास्तवाची, सामाजिक जीवनाची प्रगल्भ जाण आहे. तसेच मुळात ते शेतकरी व्यक्तिमत्वाचे; सौंदर्यनिष्ठा व मूल्यभान असलेले, सामाजिक बांधिलकी मानणारे सृजनशील कवी आहेत.

डॉ. गजानन नामदेव जाधव
मराठी विभाग,
सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, जाफ्राबाद जि. जालना
भ्रमणध्वनी : ९४२३१५६१८१

अनुक्रमणिका

के. सच्चिदानंदन यांच्या काही कविता

अनुवाद : प्रकाश भातम्ब्रेकर

के. सच्चिदानंदन सुविख्यात मल्याळी कवी. उत्तर आधुनिक कवींपैकी एक अग्रेसर नाव. अठराहून अधिक कविता संग्रह प्रकाशित. शिवाय वीस अनुवादित संग्रह, दोन नाटक आणि समीक्षा, मुलाखती इ. चे पंधरा ग्रंथ. इंग्रजी, फ्रेंच, इटालियन, जर्मन, अरेबिक, तामिळ, हिंदी, पंजाबी, उडिया, बांगला, आसामी, गुजराती आणि कन्नड भाषांमध्ये त्यांच्या कवितांचे अठरा-वीस कविता संग्रह प्रकाशित. इतरही दोन इंग्रजी पुस्तके. इंग्रजी, मल्याळी आणि हिंदीतील अनेक ग्रंथांचे संपादन. अमेरिका, रशिया, लॅटीव्हिया, स्विडन, इटली, युगोस्लाव्हिया, जर्मनी, नेदरलँड, चीन आणि अरब देशांव्यतिरिक्त भारतातील बहुतेच भागांत काव्यवाचन व व्याख्याने.

सन्मान : केरल साहित्य अकादमी पुरस्कार (चारवेळा), उळ्ळूर पुरस्कार, पी. कुंजूरामन नायर पुरस्कार, भारतीय भाषा परिषद पुरस्कार, एन. टी. रामाराव राष्ट्रीय पुरस्कार, गंगाधर मेहेर राष्ट्रीय कविता पुरस्कार, संस्कृतिक मंत्रालय व के. के. बिर्ला फौंडेशन तर्फे विद्वतवृत्ती सहित इतरही अनेक मान-सन्मान.

दोन दशकांहूनही अधिक काळ केरळात इंग्रजीचे अध्यापक. साहित्य अकादमीच्या इंडियन लिटरेचर या इंग्रजी द्वैमासिकाचे संपादन. साहित्य अकादमीच्या सचिव पदावरून निवृत्त. तुलनात्मक साहित्य अध्यासनाचे विद्यापीठातील प्राध्यापक.

संपर्क : ७ सी, नीति अपार्टमेंटस्, प्लॉट नं.८४, आय.पी.एक्स्टेंशन पटपडगंज, दिल्ली- ११० ०९२, दूरभाष : ०११-२२२४६२४०, भ्रमणध्वनी : ०९८६८२३२७९४

आंधळ्या माणसाला सापडलेला सूर्य

(सू तुंग वर आधारित)

'सूर्य कसा असतो ?'
मोठ्या मेळाव्यात नगारा वाजवणाऱ्या माणसाला
एका आंधळ्याने विचारले
'चेंगिला' सारखा
असं म्हणून त्यानं चेंगिला वाजवला
जेव्हा रात्री मृत्यूचा फतवा देणारी
काशाची घंटी वाजली
तेव्हा त्याला वाटलं हाच सूर्य आहे.

'सूर्य कसा असतो ?'
मेळाव्यात हाती मशाल घेतलेल्या माणसाला
आंधळ्यानं विचारलं
'मशालीसारखा' त्यानं उत्तर दिलं
आंधळ्यानं मशालीला स्पर्श केला
सायंकाळी कुणीतरी त्याच्या तोंडावर
गरम पाणी उडवलं
तेव्हा त्याला वाटलं सूर्य असाच असतो.

'सूर्य कसा असतो ?'
आंधळा समुद्राच्या पाण्यात शिरला
प्रवाळांच्या अणकुचीदार खडकांनी
त्याच्या तळहातावर जखमा केल्या
पाणघोडे त्याला घेऊन उडू लागले.
पऱ्यांच्या समुद्री किल्यात तो राहला
शेवटी, शेवाळं आणि शिंपल्यांनी
अंथरलेल्या निस्तब्धतेच्या पादुद्रयावर
तो विसावला आणि म्हणाला,
आता मला समजलं
सूर्य कसा असतो ते

पण मी त्यांना नाही पाहू शकत
ज्यांचे फक्त आपलेच डोळे असतात.
न समजलेलं समजावता येतं
पण अनुभवानं मिळवलेलं कसं दाखवता येईल ?
अद्यापी प्रत्येक आंधळा माणूस
समुद्राच्या पृष्ठभागावर विसावलेला आहे
जहाजी प्रवाशांच्या स्वागतासाठी...

कवीचा पुतळा
(युगोस्लाव कवी हुसेन ताहमिशिच साठी)

असा कोणता कणखर धातू आहे
ज्यापासून कवीचा पुतळा बनवला जाऊ शकेल ?

स्वतःचं मांस.
मांसाला क्षरण-मरण नाही ?
जरा-मराच्या शेवटच्या टोकावर
नवनवीन माणसं तिष्ठत बसलीयत
ती त्याला आपल्या तऱ्हेनं रूपाकार देतील.
असा कोण कुशल शिल्पकार आहे
जो कवीचा पुतळा घडविल ?

स्वतः काळ
काळ नाही का बदलत ?
प्रत्येक युगात आपल्या पद्धतीनं तो बदलतो
नवजागृतीच्या अंगाने.

कवीच्या पुतळ्याचा आकार कोणता असतो ?
पाण्याचा.
म्हणजे पाणी निराकार नाही ?
पाऊस, नदी, सरोवर, घागर
ढग आणि समुद्र
ही सगळी पाण्याची रूपं नाहीत !

कवीच्या पुतळ्याचा रंग कोणता असतो ?
शून्याचा.
शून्य असत नाही का रंगहीन ?
शुभ्र धवल, दिवसा उजेडी
अंधारात काळं
तर अधांतरी निळं

आणि लिंगहीन सुद्धा
त्याला ठाऊकंय रती-मूर्च्छा नर नारीची
त्याची चवही बदलती असते
उदा. गोडीच्या जोडीला खारट
मदिरेतली तिक्तता, फळांमधला गोडपणा,
डोळ्यातलं तेज...
कारण त्याला स्वतःच्या अशा भावना नसतातच मुळी
म्हणूनच सर्व प्रकारचे आनंद आणि दुःखं
त्याचीच असतात.
ते अज्ञानी आहे -
म्हणूनच सर्व प्रकारचं ज्ञान
त्याच्यात येऊन समावतं
कारण त्याला
स्वतःचा असा अंगभूत अर्थ नसतो
म्हणूनच त्याचे अनंत अर्थ असतात
देश-काल चिन्हं आहेत त्याची
त्याला हवं ते नाव देऊ शकतो आपण
'अलेक्सा सांतिच' ?
अलबत !

(मोस्तारचा राष्ट्रीय कवी अलेक्सा संतिचच्या पुतळ्यासमोर
मोस्तार ११ मे)

मंदिर

कुत्र्याची मादी आवारात
तीन लुसलुशीत पिलांना जन्म देते तेव्हा
मंदिर पवित्र होऊन जातं

साप कात टाकतो
गाभाऱ्या बाहेर पाचटावर तेव्हा
मंदिर पवित्र होऊन जातं

तापलेल्या उन्हात पावसाचा एक थेंब
टापूतील वाळूच्या एखाद्या कणाला पुलकित करतो तेव्हा
मंदिर पवित्र होऊन जातं

आम्हाला नको वेद आणि मूर्ती
नकोत प्रार्थना किंवा अनुष्ठानं
कारण ते तेवढे पवित्र नाहीत.

अनुक्रमणिका

ज्याला सगळं आठवत होतं

(ली त्सेच्या कथेचं पुनर्कथन)

एकदा सुंग देशाच्या हवात्से नामक तरूणाची
स्मृती हरवली
तो आपल्या घरात बसायचं विसरला
रस्त्यावर चालायचं विसला
वाचणं, विचार करणं, आप्तेष्टांच्या भेटीगाठी
दिवस-रात्र,
खाणं, पिणं, झोपणं, लेणं...
सगळं काही विसरला

अशा प्रकारे
हवात्से जसा होता तो
एके दिवशी होत्याचा नव्हता झाला.
तांत्रिक-मांत्रिक, हकीम-वैद्य
सर्वांनी हात टेकले
पण तो होता तसा झाला नाही.

शेवटी पं. मेन्सियसच्या सल्यावरून
त्याला कडकडीत उपवास घडवला गेला
तीन दिवस-रात्रींचा
तेव्हा कुठे त्याला अन्नाची आठवण झाली.

बर्फाच्या लादीवर झोपवलं
तेव्हा आठवले कपडेलत्ते, अंथरूण-पांघरूण.
मग त्याला बसवलं वर्तमानात
तेव्हा आठवला त्याला आपला भूतकाळ.

जोरात किंकाळी फोडून तो पं. मेन्सियसला म्हणाला :
जेव्हा मी काहीच नव्हतो
तेव्हा भारहीन होतो
विस्मरण म्हणजे स्वातंत्र्य होतं
माझ्यासाठी -
न बंधन होतं, न प्रारब्ध
पण आता तुम्ही परत मिळवून दिलीयत मला
माझी सगळी दुःखं--गत आणि अनागत
पण हे देवाधिदेवा,
परत घेऊन जा माझी स्मृती
आणि देऊन टाक विस्मरण.

मेन्सियस पुनः नाही देऊ शकले त्याला विस्मरण
म्हणूनच हवात्सेचे वंशज असलेले आपण
अजूनही शापितच आहोत
आठवत राहावं लागतं आपल्याला
सगळं काही
काही नं काही होण्यासाठी

नद्यांचा उगम

(डेव्हिड हार्नेस्टसाठी)

अशा जन्मतात नद्या :
एके दिवशी डोंगराची पाठ
असह्य वेदनेनं करवादते
आणि जातो एक तडा
त्यातून बाहेर येतो एक झरा
धूमकेतूसारखा
आणि त्याबरोबरच वाहात येतात
गाडली गेलेली शहरं, महाकाय डायनोसॉर,
भूमिगत झालेले महावृक्ष,
गोत्रदेव, ॲडम् ईव्ह, स्वर्गीय वैभव,
निषिद्ध प्रकाश अन्
कधीकाळी अस्तित्वात असलेलं विश्व
तत्कालीन ईश्वर स्मृती.

झऱ्याभोवती उड्या मारणारी पोरं
दारू आणि टणक खडकाच्या साक्षीने
उद्भव-रहस्याचं गणित सोडवतात,
ज्ञानी-विद्वान महाभाग गाळून काढून
पुढ्यात आणून ठेवतात आमच्या
झऱ्यातलं सोनं :
आखीव-रेखीव नवीन ग्रहमाला,
एक नूतन वसंत,
आणि एक नवा येशू ख्रिस्त
पुनः सुळावर चढवण्यासाठी !

सर्व कवितांचे मराठी भाषांतर

प्रकाश भातम्ब्रेकर
१२ न्यू रोझ व्हिला, गोरेवाडी, पं.सातवळेकर मार्ग,
माहिम, मुंबई-४०० ०१६
भ्रमणध्वनी : ०९३२४४०९४९०

काही हिन्दी कविता

अनुवाद : डॉ. बलवंत जेऊरकर

एक विचित्र अशी अडचण

एका विचित्र अडचणीत सापडलोय मी
अलीकडं
माझी भरपूर घृणा करण्याची शक्ती
दिवसेंदिवस क्षीण पडत चाललीय
इंग्रजांची घृणा करायची म्हणायचो
(ज्यांनी आपल्यावर दीडशे वर्ष राज्य केलं)
तर शेक्सपिअर आड यायचे
की ज्यांचे माझ्यावर कितीतरी उपकार आहेत
मुसलमानांनी घृणा करायची म्हणायचो
तर पुढ्यात गालिब येऊन उभे राहयचे.
आता तुम्हीच सांगा कुणाचं काही चालतं का
त्यांच्यासमोर?
शिखांची घृणा करायची म्हणायचो
तर गुरूनानक डोळ्यांसमोर यायचे
आणि मस्तक आपोआप झुकलं जायचं
आणि हे कंबन, त्यागराज, मत्तुस्वामी...
लाख समजवायाचो मी स्वतःला
की ते आपले नाहीत
दूर दक्षिणेतले आहेत
पण मन मानायचं नाही
त्यांना आपलं म्हणल्याशिवाय
आणि ती प्रेयसी
जिनं मला पहिला धोका दिला होता
कुठं भेटली तर खूनच करेन तिचा
तशी भेटतेसुद्धा ती, पण
कधी मित्रासारखी,
कधी बहिणीसारखी
कधी आईसारखी
मग प्रेमाचे दोन घोट पिऊन शांत होतो
प्रत्येक वेळी
वेड्यासारखा भटकत राहायचो
की कुणीतरी असं भेटावं
ज्याची भरपूर घृणा करून
हलकं करून घेईन मी माझं मन
पण घडतं ते नेमकं याच्या उलट
कुणी ना कुणी, कुठं ना कुठं, कधी ना कधी
असं भेटतं
ज्याच्यावर प्रेम केल्यावाचून राहवतच नाही
दिवसेंदिवस माझा हा प्रेमरोग वाढतच चाललाय
आणि या संशयानं चांगलीच मुळं धरली आहेत
की एक ना एा दिवस हे प्रेम मला
स्वर्ग दाखवल्यावाचून गप्प बसणार नाही.

कुँवर नारायण

दोष...

मी जन्मले तेव्हा माझ्यात दोष होता
कारण मी मुलगी होते
थोडी मोठी झाले तेव्हाही मी दोषी होते
कारण मी मुलांपेक्षा बुद्धिमान होते
अजून थोडी मोठी झाले तेव्हा दोष सुद्धा मोठा झाला
कारण मी सुंदर होते आणि लोक माझी स्तुती करत होते
अजून मोठी झाले तेव्हा माझे दोष निराळे होते
कारण मी वाईटाचा विरोध केला
म्हातारी झाल्यानंतरही मी दोषी होते
कारण माझ्या इच्छा संपल्या नव्हत्या
मेल्यानंतरसुद्धा मी दोषी होते
कारण या सर्व कारणांमुळं अशक्य होती माझी मुक्ती.

अनीता वर्मा

अनुक्रमणिका

शांता

दशरथाला एक मुलगी होती
लोक सांगतात
की ती जन्मली तेव्हा
अयोध्येत दुष्काळ पडला होता
बारा वर्ष...
धरती धूळ झाली होती

चिंतित राजाला सल्ला दिला की
त्याची मुलगी शांताच आहे या
दुष्काळाला कारणीभूत

दुष्काळ दूर करण्यासाठी दशरथ राजानं
श्रृंग राजाला मुलगी दान दिली...

त्यानंतर शांता
अयोध्येत कधीच आली नाही...
लोक सांगतात
की दशरथ तिला बोलवायला घाबरायचे...

अयोध्येचं आंगण कितीतरी दिवस सुनं-सुनं होतं
मग त्याच शांताच्या नवऱ्यानं
श्रृंग ऋषीनं
दशरथाचा पुत्रेष्टि यज्ञ केला होता...

दशरथ चार मुलांचे वडील झाले
संततीचा दुष्काळ संपला...

शांता वाट बघत राहिली...
तिच्या भावांची...
पण कुणीही गेलं नाही तिला आणायला
ती कशी आहे हे बघायला

मर्यादा पुरूषोत्तम पण नाही गेले
बहुतेक रामराज्यात दुष्काळ पडेल
म्हणून घाबरले असतील
वनात जाताना राम
शांताच्या आश्रमावरून गेले होते... पण
भेटायला गेले नाहीत तिला

जोवर शांता होती
तोवर वाट बघत राहिली भावांची
की येतील राम-लक्ष्मण
येतील भरत-शत्रुघ्न

न बोलावता जायला
तयार नव्हती शांता...
लहानपणी ऐकली होती तिनं दशरथाकडून
सतीची गोष्ट...

। बोधिसत्व

ते आता तिथं राहात नाहीत

पत्रं ज्यांचा पत्ता शोधत आहेत
ते आता तिथं राहात नाहीत
काही आकडे सोडले तर
वर्तमानपत्रांमध्ये सुद्धा लागत नाही त्यांचा सुगावा
तरीही आता सुद्धा ते सकाळी लवकर उठतात
म्युनसिपालटीच्या नळावरून भरतात दिवसभर लागणारं पाणी
उभे राहतात गडबड-गोंधळाच्या मोठ्या रांगेत
मुलांचा डबा तयार करणाऱ्या बायकोला
मदत करतात वर्तमानपत्र वाचण्याच्या
संधीच्या दरम्यान चार तुकडे मोडून धावत-पळत
पाहतात उंबऱ्यात उभारलेल्या बायकोचा चेहरा
मुलांना शाळेत सोडतात
आणि नोकरी करतात दररोज
ऑफिसातून ढेपाळून घरचा रस्ता धरतात
इतक्यात एक धमाका होतो रस्त्यात... मग... काही नाही...
ते स्वतःच्या अनुपस्थितीत परततात.

। कुमार अनुपम

अनुक्रमणिका

कविता

चिमण्यांच्या उड्डाणात
जशी सामील असतात झाडं
कविता असतील काय संकटात आपल्याबरोबर ?

युद्धात कामी आलेल्या
सैनिकाच्या पोषाखासोबत आणि शस्त्रांसोबत
रक्तानं माखलेला मुलाचा फोटो हाती लागतो
एखादी ओळ रक्तातं माखली जाईल का ?

चिमण्यांच्या उड्डाणात सामील असतात जशी झाडं
संकटाच्या काळात कोणत्या कविता असतील आपल्यासोबत
लढाईसाठी उंचावलेल्या हातात
कुठले शब्द असतील ?

▌ नरेश सक्सेना

कवितेचं जीवन

माझ्यापेक्षाही बिकट आयुष्य जगतील माझ्या कविता
झोपून राहतील शेकडो वर्षांपर्यंत
काहीजणी त्याहूनही जास्त
जेव्हा त्या जाग्या होतील डोळे उघडतील
कित्येक वसंत येऊन गेलेले असतील
कितीतरी वेळा उमललेली असेल रातराणी आणि गुलाब
कितीतरी वेळा धन्य झालेली असेल पृथ्वी
त्यांच्या अलौकिक सुगंधाने
कितीतरी संबंध जुळलेले असतील तुटलेले असतील
येऊन गेलेले असतील कितीतरी राजा-राणी
उध्वस्त झालेल्या असतील त्यांच्या राजवटी
इतक्या वर्षांनी देखील माझी कविता अचंबित होणार नाही
हे जग तेव्हाही अनुपम वाटेल त्याच्या क्रौर्यासह
तेव्हा सुद्धा त्या शोधतील इथं प्रेम आणि सहिष्णुताच.

▌ सविता सिंह

अमेरिकचं प्रेम

अमेरिकेला वाटतं की या धरतीवरच्या समस्त लोकांनी तिच्यावर
प्रेम करावं
कारण त्यांना माहीत झालं असेल की ती जगात कुठेही
कधीही, काहीही करू शकते
आफ्रिकेतल्या घाणीवर घोंगावणाऱ्या एका माशीला
खतरनाक म्हणून घोषित करून ती तिला मारण्यासाठी सैन्य
पाठवू शकते
आणि त्या माशीशिवाय बाकी सगळं काही उद्ध्वस्त करू शकते
तिच्यामध्ये कुणालाही, कुठेही, सर्वांसमक्ष लुटण्याची, नागवं
करण्याची,
कुणाच्याही, कुठल्याही नितांत खासगी बाबीत नाक खुपसण्याची
आणि कुणाचीही भाजी-भाकरी आणि स्वातंत्र्य हिरावून घेण्याची
अद्भूत क्षमता आहे.
म्हणून अमेरिकेला वाटतं की या धरतीवरच्या समस्त लोकांनी
तिच्यावर फक्त
प्रेमच करू नये तर प्रेम करण्याचं काररपत्रही करावं ज्याचा
वेळेनुसार
आणि गरजेनुसार त्यांच्याविरूद्ध वापर केला जाऊ शकेल.
त्यांनी
तिच्यावर
प्रेम करावं पण चुकूनही तिला हे विचारू नये की ती सुद्धा
त्यांच्यावर प्रेम करते
की नाही कारण हे प्रेम करण्याच्या करारपत्राच्या विरोधी आहे
आणि म्हणून
ही अमेरिकेची अब्रुनुकसानी आहे आणि अमेरिका तिच्यावर
प्रेम
करणाऱ्यांकडून
झालेला उपमर्द कदापिही सहन करू शकणार नाही कारण ही
सवलत तिनं त्यांनाही दिली नाही जे तिच्यावर प्रेम करत
नाहीत.

तिच्यावर प्रेम न करण्याची शिक्षा आहे मृत्यूदंड, योगायोगानं
तिच्यावर प्रेम करण्याचा पुरस्कारसुद्धा हाच आहे.

▌ विष्णू नागर

अनुक्रमणिका

इत्यादी

ज्यांचे हुद्दे होते अशा काही लोकांचा नामोल्लेख होता
बाकीचे सगळे इत्यादी होते

इत्यादी संख्येनं नेहमीच जास्त असायचे
इत्यादी घासाघीस करून भाजी विकत घ्यायचे आणि जेवण-
बिवण करून
खास लोकांच्या भाषणांना जायचे
इत्यादी प्रत्येक सभेत हजेरी लावायचे
इत्यादी मिरवणुकीत सामील व्हायचे आणि फलक उंचावून
घोषणा द्यायचे
इत्यादी लांब रांगांमध्ये उभे राहून मतदान करायचे
त्यांना सतत या भ्रमात ठेवलं गेलं होतं की तेच
या लोकशाहीत शासन बनवतात
इत्यादी नेहमी आंदोलनांमध्ये सामील व्हायचे
म्हणून कधी कधी ते पोलिसांच्या गोळीनं मारले जायचे
जेव्हा ते पोलिसांच्या गोळीनं मारले जायचे
तेव्हा त्यांची ती नावंसुद्धा आम्हाला सांगितली जायची
जी त्यांना शाळेत घालताना ठेवली होती
किंवा ज्या नावांनी त्यातल्या काहीजणांना पगार मिळाला होता
काहीजण तर अशा दुर्घटनेतसुद्धा इत्यादीच राहायचे

खरं तर इत्यादी प्रत्येक जोखीम पत्कारायला घाबरायचे
पण जेव्हा जेव्हा ते घाबरणं सोडायचे
तेव्हा बाकीचे सारे त्यांना घाबरायचे
इत्यादीच ती सगळी कामं करायचे
ज्यामुळं देशाचा आणि जगाचा कारभार चालायचा
पण त्यांना असं वाटायचं की ही सारी कामं ते
फक्त त्यांच्या प्रपंचासाठी करत आहेत.

इत्यादी प्रत्येक ठिकाणी सहभागी असायचे पण त्यांची नावं
कुठंच सहभागी व्हायची नाहीत
फक्त काही माथेफिरू कवींच्या कवितेत
बऱ्याचदा दिसायचे इत्यादी.

। राजेश जोशी

वेश्या

आईही नाही
बहीणही नाही
बायकोही नाही
सगळं काही जवळ-जवळ
पूर्णत्वापर्यंत पोहचण्याआधी
आवाज फाटलेल्या आलापासारखं

आकाशापर्यंत पोहचवून
हाताच्या जवळ
तोडलेल्या पतंगासारखं

वेश्या
ही संज्ञा आहे
जी संबंधवाचक होऊ शकत नाही
जिच्यात विशेषणं लागत नाहीत

। अंशु मालवीय

अशी वेळ

ज्यांना दिसत नाही
त्यांना कोणताही रस्ता सुचत नाही
जे लंगडे आहेत ते कुठंच पोहचू शकत नाहीत
जे बहिरे आहेत ते जीवनाची चाहूल ऐकू शकत नाहीत
बेघर लोक कुठलंच घर बनवत नाहीत
जे वेडे आहेत त्यांना कळत नाही
की त्यांना काय हवंय

ही अशी वेळ आहे
की जेव्हा कोणीही होऊ शकतो आंधळा लंगडा
बहिरा बेघर वेडा.

। मंगलेश डबराल

अनुक्रमणिका

आणीबाणी

बारा वर्षांचा होतो की
जेव्हा आणीबाणी लागू झाली
एकाच्या पाठीवर गोळी झाडली होती
एक जण घरातून गायब झाला होता
एकाला चौकात मारहाण झाली होती
तिघंही कविता लिहीत होते

किती बदललं आहे सगळं
मी कविता लिहितोय
माझ्या पाठीवर झाडली नाही गोळी
मी घरातून गायब झालो नाही
चौकात झाली नाही मला मारहाण

रिकामं आहे सभागृह
रिकामे आहेत साहित्य आणि तत्त्वज्ञानाचे वर्ग
रंगमंच आणि नाट्यगृह
गाडले जातायत मजुरांचे झेंडे

झाडली जातेय एका विचाराच्या पाठीवर गोळी
गायब होतोय एक शब्द त्याच्या घरातून
मारहाण होतेय चौकात एका चळवळीला.

। सुंदरचंद ठाकूर

आगपेटीबाबत

बाजारातून
आगपेट्या गायब आहेत
दहा दुकानं शोधूनही मिळत नाहीए एक आगपेटी
अगदी सहज मिळायची ती प्रत्येक ठिकाणी
पसरलेल्या किराणा मालाच्या दुकानांमध्येच नव्हे तर रवंथ करतं
उभ्या पानांच्या गाड्यांवरसुद्धा
जाता-जाता
तल्लफ होता
तोंडात धरलेली बिडी पेटवण्यासाठी
अगदी आरामात !
तत्परतेनं मिळणारी आगपेटी...

आपण सगळ्या आगपेट्या संपवल्या की काय ?
जाळून टाकल्या की काय, विझवून फेकल्या की काय
गुजरातमध्ये, मागच्या काही दिवसात
माणसांना उभ्यानं जिवंत जाळण्यासाठी
माणुसकीचा मुडदा जाळण्यासाठी ?

आगपेट्या मिळूही लागतील लवकरच, अगदी मुबलक
तेव्हा अगरबत्त्या लावताना
आगपेटीतल्या आपल्या काड्यांची ज्योत थरथरणार नाही का
उष्ण तापापेक्षा जास्त पश्चातापामुळे ?

। ज्ञानेंद्रपती

प्रार्थनेच्या स्वरात नाहीए

इंद्र, तुम्ही इथून निघून जा
म्हणजे पाऊस पडेल

मरूत, तुम्ही इथून कूच करा
म्हणजे वारा वाहील

बृहस्पती, तुम्ही इथून कटा
म्हणजे बुद्धी थोडं काम करायला सुरवात करेल

अदिती, तुम्ही इथून टळा
म्हणजे थोडी धडधाकट मुलं-बाळं जन्माला येतील

रूद्र, तुम्ही इथून चालते व्हा
म्हणजे थोडा राग यायला सुरूवात होईल

देवी-देवतांनो, आम्ही तुम्हाला
जे काही सांगतोय ते
प्रार्थनेच्या स्वरात नाहीए !

। देवीप्रसाद मिश्र

सर्व कवितांचा अनुवाद
। डॉ. बलवंत जेऊरकर
३०३, शांतादुर्गा अपार्टमेंट, चंपरपुटी रोड,
सरोवर हॉटेल मार्ग, विश्रामबाग,
सांगली ४१६ ४१५
भ्रमणध्वनी : ९८५०६२२८८६



।। ललित ।।

मनातल्या ओळी...

अशोक कोतवाल

खूप वर्षांपूर्वी कानातून मनात शिरलेलं एखादं गाणं ओठांवर येतं आणि नकळतचे आपण गुणगुणू लागतो. मग ते एखादं लोकगीत असेल किंवा जुन्या सिनेमातलं मनाला टवटवी बहाल करणारं अवीट चालीचं मधुर गीत असेल.

माझ्या बाबतीत असं अनेकदा घडतं आणि अशा अचानक ओठांवर आलेल्या गाण्यानं मी चक्रावून जातो. या गाण्यातून विणल्या गेलेल्या भावजाळ्यात मी एखाद्या किटकासारखा अडकून पडतो. मला फुटलेल्या सहस्त्र इवल्या पायांनी मी त्यातून बाहेर पडण्याची असफल धडपड करीत राहतो.

फार कोवळ्या वयात कुणीतरी माझ्यात एक जीवघेणं 'हळवेपण' ढकलून गेलंय जे मला सतत छळत आलंय. त्यानं मला पार दुबळं करून टाकलंय. इतकी वर्षे झाली माझ्यातून वावरणाऱ्या या हळवेपणाला मी कणखरपणात बदलवू पाहात आहे. पण मला हे अद्याप शक्य झालेलं नाही. उलट अशा प्रयत्नात मी अधिकाधिक भावूक होत जातो आणि माझं स्वास्थ्य गमावून बसतो.

आता परवाचीच गोष्ट, माझ्या समोरच्या रांगेत उभ्या असलेल्या एका आईच्या कडेवर असलेलं एक निरागस, गोंडस लहान मूल सतत कडेवरून खाली निसटण्याचा प्रयत्न करीत होतं. त्याला पकडून ठेवण्याची केविलवाणी कसरत त्या बिचारीला करावी लागत होती. तशातच त्यानं भोकांड पसरवून आकांत करायला सुरूवात केली. शेवटी त्याच्यापुढे हार मानून तिला रांगेतून बाहेर पडावं लागलं आणि नेमकं तेव्हाच माझ्यात दबा धरून बसलेलं हळवेपण मी कधीतरी ऐकलेलं गाणं घेऊन मुसंडी मारून वर आलं. -

घे राधे तू घे कृष्णाला
कडेवर घेता राहिना !
राधे तुझे नाव घेता
टवकारूनी पाहे कान्हा SSS !

आता मी हे गीत कुठे आणि केव्हा ऐकलं होतं ? तेव्हा माझं वय काय होतं ? हे तर मला विचारांच्या अनेक फायरी झाडूनही आठवत नाही. परंतु त्या गीताची चाल आणि त्यातील शब्दांतून उमटलेला भाव यामुळे मी ज्या वयात स्वतःचं भान हरपून बसलो होतो तो क्षण फक्त मला आठवतोय.

खानदेशातील ज्या परिसरात राहून मी हे गीत ऐकलं आहे त्या परिसराला कलेचा, संस्कृतीचा, शिक्षणाचा अथवा गायकीचा कुठलाही वारसा नव्हता. अती सामान्य स्तरावर परिस्थितीशी झुंजत चिवटपणे जगणाऱ्या स्त्रिया तिथं राहात होत्या. परंतु घरातलं कुठलंही काम करीत असताना, विरंगुळा म्हणून मध्येच त्यांच्या पहाडी आवाजात त्या गाणं म्हणायच्या. दुपारच्या त्या निरव शांततेत बऱ्याचदा त्यांच्या त्या मनमोहक सूरांचं अधिराज्य असायचं. मला ती दुपार बेचैन करायची. माझ्या सबंध शरीरभर कुणीतरी चालत जात असल्याचा भास मला व्हायचा. तिथेच कुणीतरी हे गाणं गायलं असावं. हे मात्र निश्चित !

आता मी ऐकलेलं हे गाणं पारंपरिक आहे की कुणा कवीनं रचलेलं आहे याच्या खोलात मी शिरणार नाही ! गाणं पोचण्याचं कुठलंही माध्यम नसलेल्या ज्या काळात आणि ज्या परिसरात जेव्हा एखादी प्रौढ स्त्री असं गाणं गाते तेव्हा ते गीत नक्कीच पारंपारिक असावं असा माझा एक ढोबळ अंदाज आहे.

जीवनातील कडू-गोड आठवणींची सोबत करतांना दळता-कांडता, उठता-बसता, सडा-सारवण करताना आणि लेकरू निजवताना गाणं म्हणणाऱ्या स्त्रियांचा तो काळ होता. कलासक्त जगण्यातील अनुभव संपन्न उत्कटता, भावरम्यता आणि कुटुंबवत्सल सहजीवनातील निरागसता त्या काळात ओतप्रोत भरलेली होती. कल्पनेत रममाण होऊन मनातलं ओठांवर आणण्याची सहजकला त्या स्त्रियांना अवगत होती. आजच्या भौतिक साधनसामग्रीच्या सुखसोयींच्या संपन्न काळात आत्ममग्न होऊन जगणाऱ्या, फुरसतीच्या वेळेच्या नावानं बोटं मोडणाऱ्या स्त्रियांपेक्षा त्याकाळातील स्त्रियांचं जगणं फार सुंदर होतं, असंच म्हणता येईल.

आता या गाण्यातल्या पुढच्या ओळी काही मला आठवत नाहीत ! त्या नाही आठवल्या तरी मला त्याची खंत नाही. कारण अशा न आठवणाऱ्या ओळींपेक्षा आठवणाऱ्या ओळीच माझंही जगणं सुंदर करीत आलेल्या आहेत. माझं बोट धरून मला एका अनोख्या प्रदेशात घेऊन जाणाऱ्या अशा कितीतरी ओळींनी मला अनेकदा मध्येच कुठेतरी सोडून देवून पोबारा केलेला आहे. तेव्हा मी, माझी वाट शोधत माझ्या वास्तव प्रदेशात परत येतानाचा तो अलौकिक आणि विलक्षण प्रवास कित्येकदा अनुभवलेला आहे.

हा अलौकिक प्रवास कित्येकदा प्रवास माझ्यातील जाणिवांना प्रगल्भ करून माझे तर्क-वितर्क विकसीत करीत जातो. त्या प्रवासातील अद्‌भूत अनुभवांनी माझं ऐहिक जीवन समृद्ध केलंलं आहे. कुठल्याही गोष्टीकडे पाहताना तिच्या अंतरंगात शिरण्याची एक अनोखी दृष्टी मला आहे. त्यामुळेच माझे कान, डोळे आणि अबोध मनाला सतत सजग ठेवून या मोहमयी, क्षणभंगूर जगापासून मी स्वतःला सहज वेगळं करू शकतो.

अध्यात्म आणि त्यातील पौराणिक भावविश्व भारतीय समाजातील जनसामान्यांच्या जगण्यातला एक आवश्यक घटक आहे. प्रांताप्रांतातील लोकसमूहाने आपापल्या लोकजीवनाशी सुसंगत पौराणिक कथांमधील ही पात्रं आपापल्या बोलीत आपल्या कुवतीनुसार जशी दिसली तशी, गाण्यांमधून उभी केली आहेत. अशी गाणी लोक शतकानुशतके गात आले आहेत, ऐकत आले आहेत. काळानुरूप हे पौराणिक आणि अध्यात्मिक भांडार सतत समृद्धच होत आलेलं आहे. कथात्मक गाभा तोच ठेवून त्यात घटना, प्रसंगांची भर पडत गेलेली आहे.

राधा आणि कृष्ण यांच्या लीला हा येथील लोकजीवनाचा असाच एक भाग राहिलेला आहे. राधा-कृष्ण यांच्या प्रेमाच्या, विरहाच्या आणि मीलनाच्या कथाही अशाच परिचित आहेत. मला आठवलेल्या गाण्यातील ओळीतला हा कृष्ण 'बाळ' असला तरी राधेचं नाव घेताच कान टवकारतो. तिच्यासाठी तो सैरभैर झालेला आहे. अधीर झालेला आहे. त्याच्या इवल्या निरागस मनातील घालमेल तो डोळ्यांतून व्यक्त करतो. इथे स्थळ, काळ आणि वयाची बंधनं गळून पडतात. शिल्लक राहतो तो फक्त त्यातील प्रांजळ भाव. म्हणून वरील चार ओळी वाचल्यावर पुढे काय ? हे सांगण्याची अजिबात गरज नाही. कारण राधा-कृष्ण यांच्यातील नातेसंबंध भारतीय माणसाच्या मनात इतका खोल रूजलेला आहे की, त्याला पुन्हा शब्दरूप देवून इथे सांगण्याची अजिबात आवश्यकता नाही.


मला प्रसंगानुरूप आठवणाऱ्या गाण्यातील अशा कितीतरी ओळींशी लपंडाव खेळता खेळताच मी माझं भान विसरतो. कधी या ओळी माझ्यातील हळवेपणाला डिवचून मला संवेदनशीलतेच्या अती उच्च टोकावर नेवून, अधांतरी सोडून देतात. मला छळत राहतात. आता याचीही मला खंत नाही ! कारण तिथून शक्य तितक्या लवकर माझ्या वास्तव विश्वात सहीसलामत परतून येण्याचा एक गुप्त मार्ग मी शोधून ठेवलेला आहे.

▌ अशोक कोतवाल
'संदर्भ',४८/१/५४, ब्लॉक क्र.६,
शिव कॉलनी, जळगाव - ४२५ ००२
भ्रमणध्वनी : ९८५०११७५३९

परीक्षणार्थ पुस्तके पाठविण्याचा पत्ता :

- प्रा. अजय देशपांडे, वामनघाट मार्ग, हनुमान नगर, वणी ४४५ ३०४, जि. यवतमाळ.
- परीक्षणासाठी पुस्तकाच्या दोन प्रती पाठवाव्या.
- पुस्तक परीक्षणाबाबतचा निर्णय तीन महिन्यात कळविण्यात येतो.
- परीक्षणाकरिता आलेली पुस्तके परत पाठविली जात नाही.

अनुक्रमणिका



चळवळीतील कार्यकर्त्याचे प्रमाणिक कथन

डॉ. शिवाजी नागरे

जागतिकीकरणात व्यक्तीकेंद्रितता, भोगवाद, चंगळवादीवृत्ती वाढत असतांना आत्मकथन हा साहित्य प्रकार सुद्धा आत्मप्रदर्शनाच्या, आत्मस्तुतीच्या व आत्मश्लाघ्यतेच्या आवर्तात सापडू पाहात आहे अशावेळी चंद्रकांत वानखेडे यांचे हे आत्मकथन एक नवा आशावाद प्रकट करते. या आत्मकथनाचे वाङ्मयीन कसोट्यावर मूल्यमापन करण्याचा केलेला हा अल्पसा प्रयत्न आहे.

"आत्मकथन म्हणे जीवनावर परिणाम करणाऱ्या, जीवनाला विशिष्ट वळण लावणाऱ्या घटना, प्रसंग व कालखंडाचे चित्रण". हा आत्मनिष्ठ वाङ्मय प्रकार आहे. या वाङ्मय प्रकारातून लेखक स्वतःला आपल्या गुणदोषासहीत वाचकासमोर ठेवीत असतो. नव्हे त्यात तो कितपत यशस्वी होतो यावरच त्याच्या लेखनाचे यशापयश अवलंबून राहाते.

"आपुला चि वाद आपणांसी या आत्मकथनाचे प्रयोजन"

आपल्या जीवनात आपण परिस्थितीशी, व्यवस्थेशी व विशिष्ट प्रवृत्तीशी जी झुंज दिली. ती इतरांना प्रेरणादायी ठरावी. या प्रामाणिक उद्दिष्ट्यासाठी चंद्रकांत वानखडे यांनी हे आत्मचरित्र लिहिले असल्याचे प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे. या आत्मकथनात त्याच्या कालखंडासंबंधी प्रस्तावनेत लेखकाने म्हटले आहे की,

"१९७० ते २००० या तीन दशकामध्ये जे काही जगलो, ते जगत असताना ज्या व्यक्तींशी संबंध आला, त्या काळातील घटना, दुर्घटना मनावर नोंदविल्या गेलेल्या क्रिया-प्रतिक्रिया याची दखल या पुस्तकात घेतली आहे." यावरून एका कार्यकर्त्याच्या चळवळीतील हा तीन दशकांचा इतिहास म्हणजे हे आत्मकथन होय.

दाहक वास्तवाचे परखड चित्रण :

लेखक हा एक विचारवंत असतो. आपले जीवनविषयक आकलन तो कलात्मक रूपाने साहित्यकृतीतून आपल्यासमोर मांडतो. ते मांडतानाही तो स्वसुरक्षेच्या पलीकडे जाऊन वास्तवाला स्पर्श करण्याचे टाळतो असेच दिसते. याबाबत आत्मकथन या वाङ्मय प्रकारातून लेखक आपल्या जीवनातील अनुभवांशी अधिक आत्मनिष्ठेने सामोरे जाताना दिसतात.

'आपुला चि वाद आपणांसी' या आत्मकथनात अनेक ठिकाणी हाच अनुभव येतो. एक मध्यमवर्गीय मराठा कुटुंबात जन्माला आल्यावर तेथील लोकांची, नोकरदारांची, शेतकरी व शेतमजुरांच्या कुटुंबाशी असलेली परकेपणाची जाणीव, कुटुंबातील सदस्य म्हणून जी होत होती त्याचे चित्रण करताना कोणत्याही प्रकारच्या बदनामीचा विचार लेखक करीत नाही. हा दोष कुटुंबाचा नसून आपल्या व्यवस्थेतच असल्याचे तो परखडपणे सांगतो.

या व्यवस्थेने दोन भावंडापैकी नोकरी करणाऱ्या भावाला 'यशस्वी' ठरविले, नोकरी करणारा तो 'साव' ठरला, तर शेतीवाला 'नालायक', 'चोर' (पृ.क्र.१३)

नरहर कुरूंदकरांसारखा समाजवादी लेखक आणीबाणीला, त्यातील कार्यवाहीला भिवून समाजवादाचे दैवत असलेल्या एस.एम.जोशीचे घरी येणे याला नसती कटकट मानतो व त्यांना खोटी नाटी कारणे सांगून घरातून बाहेर काढतो हा अनुभव किंवा राजकारणी लोक मग ते कोणत्याही

पक्षाचे का असेनात कसे दुसऱ्याला वापरून घेतात व काम झाले की अंगावरचे झुरळ झटकावे तसे झटकून टाकतात याचा एक अनुभव लेखक सांगतो.

आणीबाणीनंतर जनता पक्षाची सत्ता स्थापन झाली. पण ही सत्ता ज्या जयप्रकाश नारायण यांच्यामुळे स्थापन झाली ते मुंबईच्या जसलोक हॉस्पीटलमध्ये भरती असताना रेडिओ, दूरदर्शनवर त्यांच्या मृत्यूची बातमी दिल्या जाते. एवढेच काय तर लोकसभेत त्यांना श्रद्धांजली सुद्धा वाहण्यात येते. लेखक म्हणतो "जिवंतपणी जनता पक्षाच्या सरकारने त्यांना मारून टाकले होते". मोरारजी देसाई पंतप्रधान असलेल्या जनता पक्षाचे हे अमानवीय कृत्य उघड करताना लेखक त्याच्या परिणामाची मुळीच चिंता करीत नाहीत हे विशेष.

सुहाससारख्या गांधी-विनोबाचे नाव घेऊन स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्या माणसांचे ढोंग, दांभिकपण चव्हाट्यावर येते तेव्हाच आपल्या वरवर स्वच्छ चरित्र्याची माणसं आतून किती बगळ्यासारखी धूर्त, लुच्ची, लफंगी असतात त्याचे निर्भिड उदाहरण लेखक देतो. याबाबतचे आपले सूक्ष्म निरीक्षण लेखक आपल्यापुढे मांडतो. "मार्क्सवादी भ्रष्ट झाला तर तो क्रूर बनतो. याउलट गांधीवादी भ्रष्ट झाला तर तो ढोंगी बनतो सुहास गांधीवादीच होता"

या व्यतिरिक्त शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेचा आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी कसा शिडीसारखा वापर केला, ते सांगताना लेखकाच्या मनात कोणताही संदेह नाही.

जीवनात पडलेल्या प्रश्नांची मांडणी :

लहान वयात अनपेक्षितपणे सर्वोदय मंडळाशी आलेल्या संबंधात जेव्हा जीवनाचे व जगण्याचे संदर्भ कळायला लागले तेव्हा लेखकासमोर जे अनेक प्रश्न उभे राहिले. त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचाच प्रयत्न तो पुढील आयुष्यात करीत राहिला. हे प्रश्न चळवळीतील कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण होणारे प्रश्न आहेत.

१) आपण कोणाच्या पोटी जन्म घ्यावा?
२) घर कोणते असावे?
३) जात, धर्म, देश, काळ, वेळ कोणती असावी?
४) वारसा कोण सावा?
५) ज्या घरात जन्म घेतो आहे त्या घराची पार्श्वभूमी काय असावी?

लेखकाच्या बाल वयातील संस्कारक्षम काळात, ज्याला या समाजाच्या व्यवस्थेचे अजून आकलनच झाले नाही त्यावेळचे हे प्रश्न आहेत.

जिल्हा परिषदेच्या शाळेतील मास्तर गांधी बद्दल चांगले सांगायचे तर दुसऱ्या शाळेतील मास्तर वाईट सांगायचे.

१) "आधीच्या शाळेत गांधीजी वंदनीय अथवा नायक येथे नींदनीय किंवा खलनायक असे का?"

समाजातला एक घटक सतत महात्मा गांधींना शिव्याच देत आला आहे. शाळेतला एक शिक्षक जो सतत गांधींची निंदा करायचा. तो आयुष्यभर त्याच विचारांच्या गटारात लोळत पडला असेल का? असा ही तो पुढे विचार करतो. प्रस्थापित व्यवस्थेबद्दल वेळोवेळी अनेक प्रश्न निर्माण झाले त्याची प्रसंगोपात्त मांडणी करण्यात आली आहे. वडिलांचा नोकरीतील पगार वाढला तेव्हा त्यांनी वडिलांना विचारलेला प्रश्न हा जणू व्यवस्थेला विचारलेलाच प्रश्न आहे, वडिलांना तो म्हणतो.

"नानासाहेब (वडील) तुमचा पगार इतका वाढला. आता गंगुबाईचा (मोलकरणीचा) पगार किती वाढणार?"

या प्रश्नातून अख्खीच्या अख्खी सामाजिक विषमता डोळ्यासमोर येते. यानंतरचा प्रश्न न्यायव्यवस्थेच्या कार्यप्रणालीबाबत प्रश्नचिन्ह उभे करणारा आहे. एखाद्या व्यक्तीला अटक होते त्याच्यावर कोर्टात केस चालते. केसचा निकाल लागतो व तो माणूस वर्षभरानंतर निर्दोष सुटतो याबद्दल लेखकाच्या मनात प्रश्न उद्‌भवतो.

"आम्ही निर्दोष मुक्त झालो. पण निर्दोष असताना वर्षभर तुरूगवास भोगावा लागला त्याचे काय?" पण अशा प्रश्नाची व्यवस्था उत्तरे देऊ शकत नाही.

लेखकाने आयुष्यभर समाजासाठी काम केल्यानंतर जेव्हा तो मुलाखतीला शाळेत जातो. तेव्हा त्याला समाजसेवेची प्रमाणपत्रे मागितली जातात तेव्हा त्याला प्रश्न पडतो.

"प्रमाणपत्रे मिळावित म्हणून समाजसेवा केली जाते?"

काही प्रश्न लेखकाला त्याच्या आयुष्याबद्दल पडलेले आहेत. जसे -

लग्नानंतर स्त्रियांनी मंगळसूत्र घालावे तर मग पुरूषांनाही लग्नानंतर मंगळसूत्र का घालू नये? किंवा "व्यवस्था

परिवर्तनाच्या लढाईत उतरलेल्या सैनिकाने नोंदणी पद्धतीने व्यवस्थेला शरण जाऊन लग्न करावे का?''

पुरोगामी विचारांचा पुरस्कार करून जीवन जगताना प्रत्येकाला पडणारे हे प्रश्न आहेत. सगळे आघात सहन करताना एका पराकोटीच्या तळमळीतून समाजासाठी झटणारा नेता म्हणजे एस.एम.जोशी, त्यांना एकदा रात्रीला रेल्वे स्थानकावर थांबण्यासाठी वेळ आली. दिवस थंडीचे एस.एम.जोशी यांच्या वयाला ही थंडी सोसत नव्हती. लेखकाच्या अत्यंत आग्रहामुळे ते रेल्वे स्थानकावरील क्लास वनच्या प्रतिक्षागृहात झोपले. थंडीपासून बचाव करणे हा त्यांचा उद्देश होता. पण टी.सी. ने त्यांना तेथून हाकलून दिले. त्यांचे सामान बाहेर फेकून दिले. त्याचा लेखकालाही राग आला. मात्र एस.एम. मुळीच रागावले नाही. तेव्हा त्या महान त्यागी, तपस्वी माणसाला पाहून लेखकाला मोठा प्रश्न पडला.

''याला आपल्या सारखाच हाडामासाचा माणूस कसा म्हणावा? कशाची बनली होती ही माणसे?'' लेखकाचे स्वतःचे अनुभव व त्याला जीवनात पडलेले वेगवेगळे प्रश्न यातून त्याच्या जीवनजाणिवा अत्यंत प्रगल्भ होत आहेत. याविषयी लेखक म्हणतो,

''माझ्या आयुष्याचा पोतच पूर्णतः बदलत चालला होत.''

आयुष्याचे प्रमाणिक कथन :

'आपुला चि वाद आपणांसी' हे एका चळवळीच्या कार्यकर्त्यांचे आत्मकथन आहे. या आत्मकथनात त्याने खिडकीतून जग पाहून केलेले काल्पनिक वर्णन नाही. तसेच तो चळवळीतला दांभिक, ढोंगी व मढ्यावरचे लोणी खाणारा झेंडेधरू नेता नाही. एकदा पुरोगामी विचाराने जीवनाची लढाई लढायचे ठरविल्यावर जीवनात वाट्याला येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाशी त्याने आरपारची झुंज दिली आहे. तो जे जगला तेच तो लिहतो आहे. सत्य कथन करताना आपली, आपल्या कुटुंबाची अथवा कुठल्या व्यक्तीची बदनामी होईल का? त्याचे कोणते परिणाम आपल्याला भोगावे लागतील याची तो तीळमात्र फिकीर करीत नाही. जीवनाला आपल्या पद्धतीने सामोरे जाताना भावनेच्याही नात्यात कुठेही अडकत नाही. लग्न साध्या रजिस्टर पद्धतीने करावे, त्यात नवऱ्या मुलाने अथवा मुलीने कपडे घ्यावे, मुलीने लग्नानंतर मंगळसूत्र घालावे, कुंकू लावावे असा आईचा कितीही हट्ट असला तरी तो त्या भावनेला बळी पडत नाही.

शेतमजुराचे आंदोलन उभारून त्यांना न्याय मिळवून देता देता जेव्हा त्याच्या लक्षात येते की आपण जो शहरातील भांडवलदार आणि कामगार, शोषक आणि शोषित हा दृष्टिकोन घेऊन कामगारांचे प्रश्न सोडवायला निघालो आहे. हा दृष्टीकोन घेऊन आपल्याला हा प्रश्न सोडवता येणार नाही तेव्हा पुढे होणाऱ्या बदनामीची कसलीही पर्वा न करता त्या आंदोलनाला विराम देऊन शेतकरी संघटनेकडे वळतो. चळवळीत काम करणारी माणसे चळवळी बाहेरच्यांना फार महान व त्यागी वाटतात. पण त्यांच्यात लपलेला एक बगळा कसा असतो हे आपण सुहास व शरद जोशींच्या उदाहरणातून मांडताना त्यावर काय प्रतिक्रिया उमटतील याची कधीही पर्वा केली नाही. विशेष म्हणजे या सगळ्याची नावे जशीच्या तशी ठेवली ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.

व्यक्तीकडून समष्टीकडे नेणारे चित्रण :

या आत्मकथनाची सुरूवात एका नोकरी करणाऱ्या माणसाच्या चंद्रकांत या तरूण मुलापासून होते. जसा जसा आत्मकथनाचा प्रवास पुढे जातो तसा तसा चंद्रकांत वानखडे मागे पडतो व तो एक सामाजिक चळवळीत आपले वय, आपली तारूण्यांतील स्वप्ने, आपली कर्तव्ये, आपली कौटुंबिक जबाबदारी, करिअर, आपले जीवन या कसल्याही गोष्टीची पर्वा न करता ध्येयवेडेपणातून उडी घेणाऱ्या कार्यकर्त्यांचे ते कथन होते. या कार्यकर्त्याला भोगाव्या लागणाऱ्या यातना, सहन करावे लागलेले अपमान, जागोजागी होत असलेली अवहेलना, करावा लागलेला संघर्ष हे अनुभव त्याचे एकट्याचे राहात नाही. तर ते समष्टीचे होऊन जातात. ही या आत्मकथनाची हीच खरी ताकद आहे.

जगण्यातून जगण्याच्या तत्त्वाची ओळख :

तत्वज्ञानाचा अभ्यास करून त्यानुरूप जगण्याचा प्रयत्न करणे वेगळे पण जगता जगता जगण्याच्या तत्त्वाची ओळख होणे व त्या तत्त्वांना जीवनात अंगीकारणे ही वेगळी गोष्ट असते. त्यातही तत्त्वावर बोलण्यापेक्षा तत्त्वानुरूप जगण्यातला आनंद वेगळा असतो. जी माणसे ऐहिक सुखात रमतात ती या आनंदाच्या कोसोदूर असतात. त्यांची जगण्याची समिकरणेही वेगळी असतात. वानखडे यांच्या जगण्याची समीकरणे ही वेगळी आहेत हा प्रत्यय आत्मकथनातून येतो. आत्मकथनाच्या सुरूवातीलाच लेखकाच्या घरी दुपारच्या वेळी संत गाडगेबाबा येतात व त्यांच्या आईला दवाई घेण्यासाठी वाटीभर दूध मागतात. आई पहिल्यांदा तर भिकारी म्हणून हाकलून

अनुक्रमणिका

लावायला पाहाते पण जेव्हा तिला लक्षात येते की हे तर गाडगेबाबा आहेत तेव्हा ती चरवी भरून दूध आणते. गाडगे बाबा त्यातले फक्त वाटीभर दूध काढून घेतात व चरवी आईकडे परत करतात. येथे लेखकाला जीवनाचे पहिले तत्त्व शिकायला मिळते की, तत्त्वज्ञान ही खरे तर सांगण्याची बाबच नसावी. ते प्रत्यक्ष आचरणातूनच प्रकट व्हावे. पुढील जीवनात लेखकाने याच तत्त्वाचा अवलंब आपल्या जीवनात केलेला दिसतो. त्याने थोरा मोठ्याची तत्त्वज्ञानावरील पुस्तके वाचून आपले जीवन जगले नाही. तर आपले जीवन जगता जगता त्याने आपले स्वतःचे जीवनाबद्दलचे तत्त्वज्ञान स्वतःच जन्माला घातले व ते आयुष्यात अंगीकारले. त्याला आपले जीवन जगताना स्वातंत्र्य मिळाले पण त्यासाठी असुरक्षितपणाचे आयुष्य जगावे लागले यातूनच एक तत्त्व त्यांच्या हाती लागले की,

''स्वातंत्र्य आणि सुरक्षितता कदाचित सोबत नांदत नाही'' समाजात काम करताना त्यांनी माणसाची अनेक रूपे पाहिली. नेहमी चांगली वागणारी, समाजाची कळवळ असलेली माणसे एखाद्यावेळी समाजाला बाजूला ठेवून वैयक्तिक स्वार्थाचा विचार करतात. तर काही लोकांना समाजसेवेचे कार्य करताना ते 'लक्झरीयस' असावे असे वाटते. या सगळ्या अनुभवातून लेखकाला आणखी एक रहस्य उलगडते ते म्हणजे ''खरे तर माणूस महात्माही असत नाही अन् सैतानही नाही, तर तो ह्या दोन्हींच्या मध्ये लोंबळत असतो. बाहेरचे पर्यावरण त्याच्यातील महात्म्यासाठी पोषक असेल तर त्याच्यातील महात्मा मोठा होतो. आणि तेच वातावरण सैतानासाठी पोषक असेल तर सैतान बनतो.'' (पृ.क्र.६६) तसेच आपल्या विवाहप्रसंगी आईच्या अपेक्षा व आपला दृष्टीकोन यातून बाहेर पडण्यासाठी तो जे वेगवेगळे तर्क आपल्या वागण्याबद्दल सांगतो त्याने तिचे समाधान होत नाही तेव्हा लेखकाला कळते की, ''तर्क (माणसाला) निरूत्तर करू शकतो, पण भावनेची समजूत घालू शकत नाही हेच खरे'' (पृ.क्र.८६) सामाजिक चळवळीत काम करताना सुरूवातीला फार मोठी आव्हाने पेलावी लागतात. समाज पिढ्यान्‌पिढ्या स्थितिशील जीवन जगत असतो. त्याला तुमच्यावर, तुम्ही करीत असलेल्या कार्यावर विश्वास नसतो. त्यात त्याचाही काही दोष असतो असे नाही. आपल्या सभोवताल त्याला नेहमीच स्वार्थाने प्रेरित होऊन समाजासाठी धडपणारी मुखवटाधारी माणसेच याआधी भेटलेली असतात. या विपरीत अनुभवामुळे या समाजाचे मन जिंकण्याच्या अग्नीदिव्यातून जावे लागते. पण एकदा का त्यातून गेले की मग तोच समाज डोक्यावर घेऊनही नाचतो हा अनुभव लेखकाच्याही वाट्याला आला आहे. त्या अनुभवातून त्याला खालील मूल्याची प्रचिती येते की, ''जेव्हा समाजाची दुःखे, तुमची होतात, तेव्हा समाज तुमच्या सुखदुःखापासून अलिप्त राहू शकत नाही, तुमचे दुःख, तुमच्या अडचणी, तुमच्या चिंता या केवळ तुमच्या राहात नाहीत. या सामूहीक होतात.'', ''सामाजिक चळवळी वा आंदोलनातील मागण्या अथवा तिचे यशापयश यांना तात्कालीक महत्त्व असते, पण त्योपक्षा महत्त्वाचे असते ते संघटन'' अशा तत्त्वाचा शोध आंदोलनातून कार्यकर्त्याची भूमिका वठवतात वानखडे यांना येतो. ते म्हणतात, ''कोणत्याही आंदोलनातील आर्थिक मागण्या महत्त्वाच्या नसतात असे नाही, पण त्याहीपेक्षा त्या आंदोलनाच्या माध्यमातून पिचलेला, दबलेला समाज ताठ मान करून उभा राहतो. कायम मूक असलेला माणूस बोलका होतो. त्याला स्वतःचे म्हणून आत्मभान येते हेच सर्वात महत्त्वाचे योगदान आंदोलनाचे असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीराव फुले, जयप्रकाश नारायण, एस. एम. जोशी यांनी ज्या चळवळी केल्या त्यामागे हेच सूत्र असावे.'' ते सूत्र चंद्रकांत वानखडे यांनी यशस्वीपणे हाताळले. त्यामुळे अनेकांशी, विशेषतः हितसंबंध दुखावलेल्यांशी विरोध पत्करून ते आपले आंदोलन चालवित होते. शहरी व शिकलेले लोकांचा खेड्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन अत्यंत तुच्छतावादी आहे. तिरस्कार या व्यवस्थेनेच माणसाच्या मनात रूजवला. त्यामुळे खेड्यातील लोक म्हणजे अडाणी, गावंढळ बावळट असतात हा समज रूढ केला. आपल्या जीवनातील २० वर्षे खेड्यात घालविल्यानंतर लेखकाला जे समजले ते हे की,

''गावच्या माणसांना अक्षरांची ओळख नसते. ह्या अर्थाने त्यांना निरक्षर म्हटले तर समजण्यासारखे आहे. पण तो निरक्षर आहे म्हणून त्याला अज्ञानी, अडाणी समजणे हा आपला शुद्ध बुद्धिवादी अडाणचोटपणाच असतो.''

खरे तर चंद्रकांत वानखेडे या माणसाने कधी देव मानला नाही. त्याने प्रत्येक गोष्ट तर्काच्या फूटपट्टीने मोजून सत्यासत्यता पडताळून पाहिली व नंतरच ती मान्य केली. पण ईश्वराविषयी ते नकारात्मक अथवा निरीश्वरवादी नाही. तर ईश्वर ही सर्व माणसाची गरज आहे मग तो कोणत्याही जाती धर्मातला असो. जीवनातल्या सर्वच गोष्टी तर्काधिष्ठीत नाहीत तेव्हा इथेच देव या कल्पनेचा उगम आहे असे ते मानतात. त्यामुळे ते लिहितात,

''तर्काच्या पलीकडे श्रद्धेच्या पोलादी संरक्षणात ईश्वर बिनधास्तपणे सुरक्षित आहे.''

अनुक्रमणिका

ध्येयवादाने पछाडलेल्या अवस्थेत एखादे सामाजिक, आर्थिक, राजकीय वा धार्मिक क्षेत्रात उडी घेतलेल्या माणसांचा ध्येयवाद शेवटपर्यंत टिकतोच असे नाही. ध्येयाने प्रेरित होऊन समाजसेवा करू लागलेल्याचे कधी त्या कार्यात हितसंबंध तयार होतील व तो त्या उद्दिष्टापासून दूर जाईल याचा नेमच नसतो अशी अनेक उदाहरणे दुर्दैवाने वानखेडे यांच्या वाट्याला आली त्यातून जीवनाचे जे तत्त्व लेखकाच्या हाती लागले. ते म्हणजे - ''पारतंत्र्याशी लढता लढता पारतंत्र्यातच हितसंबंध तयार होणे किंवा जगात सुख शांती नांदावी म्हणून सैतानाशी लढता लढता सैतानातच हितसंबंध गुरफटणे, अथवा कुष्ठरोग्यांसाठी काम करता करता कुष्ठरोगात स्वार्थ दिसणे हा हृदयाला जडलेला महारोगच नव्हे काय?''

लेखकाचे हे तत्त्व त्यांच्या भाषणातून अथवा पाठांतरातून मांडलेले नसून त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास 'पोतं भरल्याशिवाय ते उभं राहात नाही' त्याचाच प्रत्यय या आत्मकथनभर येत राहतो. शेवटी तत्त्वज्ञान सिद्धांत हे प्रत्यक्ष आचरणातूनच प्रकट व्हावे लागतात आणि त्यानुसार आचरण अत्यंत कठीण गोष्ट आहे. त्यासाठी संपूर्ण जीवन खर्ची घालावं लागतं, मोठमोठी प्रलोभनं झुरळासारखी झटकून टाकावी लागतात, उरावर दगड ठेवून मायेचे पाझर खंडीत करावे लागतात. जळत राहावे लागते, लोहार तापवत असलेल्या लोखंडागत आयुष्य तापवावे तेव्हा कुठं तत्त्वज्ञान जन्माला येते. जीवनात स्वार्थासाठी सत्त्व विकणारांना तत्त्व जगताच येत नसते त्यामुळेच ते आपआपल्या 'मठा'त सुरक्षित राहातात पण त्याचवेळी त्यांचे सृजनाचे सामर्थ्यही हरवून जाते.

आत्मकथनाची भाषा :

आत्मकथनाच्या निवेदनाची भाषा ही नागर असली तरी ती चळवळीत काम करणाऱ्या लेखकाच्याच शब्दात 'टोले' घेणाऱ्या व ज्याला समाजासाठी काही तरी करण्याची 'खाज' आहे अशा कार्यकर्त्याची भाषा आहे. समाजासाठी आयुष्य झोकून देणे म्हणजे स्वतःलाच भट्टीत भाजून घेण्यासारखे असते. ते चटके सहन करीत स्वतःला समृद्ध करत नेणे हे भल्याभल्यांना न पेलणारे धनुष्य आहे. यातूनच आत्मकथनातील अनुभवातून लेखकराव, संन्याशाचे बीळ, मासळी बाजार, ज्ञानमाज, ज्ञानगंज, ज्ञान बुरशी, सडांग, बुर्झ्वा, फंडोबा, क्रांतीचा लेप असे अनेक उपरोधिक शब्द येतात. लेखकाला अनेक वेळा कारावास भोगावा लागला तेथील कैद्याबरोबर राहिल्यामुळे तूरवार, मसूरवार, बेसनवार, उडीदवार सारखे खास कारागृहातील शब्द ओघानेच आत्मकथनात येतात.

वाक्प्रचार :

छाताडावर बसणे, संबंधात तुकडा पडणे, काजोळून टाकणे, गांधी चिवडणे, प्रातःस्मरणात गांधी उरकणे, डिक्लास होणे, कन्नी मारणे यासारखे वाक्प्रचार आशयाला अनुभवाचे परिमाण देतात.

बोलीचा समयोचित वापर :

काही ठिकाणी समयोचित प्रसंगी बोलीचा वापरही लेखक करतो जसे -''कावून व गाडगे बाबा होय म्हून चरवीभर दूध काय?'' त्यामुळे पात्रांची निर्मिती होणे सहज शक्य होते. काही ठिकाणी निवेदनात येणारी चळवळीची भाषा आशयाचे सौंदर्य वाढविते जसे - ''स्वतःला छिलून घ्यायची सवय आजही अंगवळणी पडून आहे.''

काव्याच्या पातळीवर जाणारी भाषा :

या आत्मकथनातील भाषा अनेकदा काव्यात्म पातळीवर जाते. उदाहरणार्थ -

१) आभाळाला हात पोचताच वडिलांचे पाय शेतीतून सुटले व हात नोकरीला जाऊन टेकले.
२) बाबासाहेब देशाला भारावून सोडतच राहिले आणि देशही बाबासाहेबाकडून भारावून घेतच राहिला. परंतु देश जो जोडण्याच्या नादात मात्र मडावी तुटलेलाच राहिला. बाबासाहेबाच्या त्यागाची देशानेच काय परदेशातही दखल घेतली पण मडावीचा 'पदत्याग' मात्र बेदखल राहिला.(पृ.क्र.१३८)
३) थोर माणसं सर्व सामान्यांच्या वाट्याला येत नाहीत. त्यांच्या वाट्याला येते ती त्यांची प्रतिमा. या प्रतिमेचीच तो पूजा करतो. गावच्या मारूतीला शेंदूर फासला जातो. शेंदुराचे लेप चढता चढता ती मूळची मूर्तीच ह्या लेपामध्ये हरवून जाते. पण एखाद्या वेळेस ती खोळ पडते व मूळ मूर्तीचे दर्शन घडते. (पृ.क्र. १६८)
यासारखी अनेक वाक्ये सर्वत्र विखुरली आहेत. या व्यतिरिक्त काही ठिकाणी म्हणीसदृश्य वाक्याचाही वापर केला आहे.

१) राहिले ते मावळे, गेले ते कावळे
२) वापरा आणि फेकून द्या
३) आपलाच गेरू आपलाच चुना चंदुभाऊंना निवडून आणा.

अनुक्रमणिका

जीवनातील तत्त्वाला जन्म देणारी भाषा :

आत्मकथनातील अनेक प्रसंगात जीवनाचा तळ गाठल्यावर हाती मूल्यवान रत्न लागावे तशी जीवनातील एक एक तत्त्वं लेखकाला सापडत जाते व लेखक ते आत्मसात करीत जातो.

उदा. १) प्रेषिताचे पायही अखेर मातीचेच असतात हेही एक सनातन सत्यच नव्हे का?

२) माझा अपमान माझ्याशिवाय कोणीच करू शकत नाही.

प्रतिमा :

आशयाची अभिव्यक्ती रससंवेद्य होण्यासाठी वापरलेल्या दृष्यात्मक प्रतिमा भाषेची रंगत वाढवितात. जसे - राजा (नोकरशहा) - चोर (शेतकरी), क्रांतीची खरूज, क्रांतीचे भूत, वाघाच्या पोटातील बकरी, कोरडवाहू शेती, चोरांचा साथीदार, विजयी घोडा, मीसाभाई या आणि अशा कितीतरी प्रतिमांची भाषा अंगाने आत्मकथनातील अनुभवाला समृद्ध करीत नेते. पण जेव्हा लेखक पत्नीच्या कोकणातील खेड्याचा उल्लेख करतो. तिचे वास्तव्य नोकरीच्या निमित्ताने तिकडे राहिलेले म्हणून आत्मकथनात कोकणातील कोकणी भाषेचा येणे अपरिहार्य होते. पण तसे होताना दिसत नाही.

सारांश :

एकंदरीत 'आपुला चि वाद आपणांसी' हे एका चळवळीतील कार्यकर्त्याचे आत्मकथन म्हणून वाङ्मयीन कसोट्यावर उतरत असेल तरी या आत्मकथनाकडे एका व्यक्तीचे आत्मकथन म्हणून पाहता येत नाही. कारण चंद्रकांत वानखडे याएका व्यक्तीचे आत्मकथन म्हणून त्याकडे पाहिल्यास काही उणिवा स्पष्टपणे दिसतात. जसे यात वैयक्तिक कौटुंबिक जीवनाचे, त्यातील राग, लोभ, प्रेम एवढेच नव्हे तर वैवाहिक जीवनातील जाणिवांना आत्मकथनात कुठेही जागा दिलेली नाही. एवढेच नव्हे तर आत्मकथन लिहितांना स्वतःच्या पलीकडे जाऊन लेखक पत्नीबद्दल व इतर व्यक्तीबद्दल फारसे वर्णन करीत नाहीत. तसे केले असते तर लेखकाच्या आत्मकथनातील प्रतिमेला बाधा आली असती असे ही नाही. ही या आत्मकथनाची मर्यादा मानावी लागते. लेखकांने मुखपृष्ठावर आत्मकथनाच्या नावाच्या वर दिलेले 'एका चळवळीतील कार्यकर्त्याचे आत्मकथन' हे उपशीर्षक आहे. सर्व आत्मकथनभर आपली दृष्टी एका कार्यकर्त्यांवरच केंद्रित ठेवावी लागते.

निष्कर्ष :

१) 'आपुला चि वाद आपणांसी' हे आत्मकथन सर्व वाङ्मयीन कसोट्यावर खरे उतरते.

२) हे आत्मकथन एका चळवळीतील कार्यकर्त्याचे आत्मकथन म्हणून मनावर ठसत असले तरी चंद्रकांत वानखडे या व्यक्तीचे कथन म्हणून ते सदोष ठरते.

३) स्वतःच्या पलीकडे जाऊन इतरांचे वर्णन करण्यात केलेला काहीसा संकोच वाचकाला लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाभोवतीच रेंगाळत ठेवतो. परिणामी आत्मकथन काहीसे एकांशी झाले आहे.

४) जागतिकीकरणात व्यक्तीकेंद्रितता, चंगळवाद, ऐहिक सुखोपभोगवाद वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर चंद्रकांत वानखडे यांच्या सारख्या कृतिशील कार्यकर्त्याचे आत्मचरित्र नवीन कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे.

आपुलाचि वाद आपणांसी
चंद्रकांत वानखडे
मनोविकास प्रकाशन,पुणे
मूल्य : २०० रूपये

डॉ. शिवाजी नागरे
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला
भ्रमणध्वनी : ९७३००३६१७२

लेखकांसाठी सूचना

- लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.
- लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.
- लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.
- लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतः जवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.
- लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.
- नव्या लेखनाचे 'युगवाणी'त स्वागत आहे.

अनुक्रमणिका



राजकारणाचे वास्तवदर्शी चित्रण

डॉ. शुभा साठे

मार्क्सवाद आणि हिंदुत्ववाद या दोन विचारसरणींचा मनाला पटेल असा आणि राष्ट्र, समाजाच्या प्रगतीस योग्य असा सुवर्णमध्य काढून सातत्याने आपली मते प्रगट करणारे विचारवंत म्हणजेच (स्वतः लेखकानी मनोगतात म्हटल्याप्रमाणे) 'कीलक विचारवंत' म्हणून महाराष्ट्रातील मराठी वाचकांना सुपरिचित असलेल्या आचार्य वि. स. जोगांची 'मकरंद-मुमताज' ही नवीन राजकीय कादंबरी. 'राजकीय' हे विशेषण या कादंबरीला लावायलाच हवे. कारण या कादंबरीत अयोध्येतील वादग्रस्त वास्तूच्या विल्हेवाटीपासून अटलबिहारी वाजपेयी शासनाच्या पराभवापर्यंत म्हणजे १९९२ ते२००५ या काळातील राजकारणावर प्रकाश टाकला आहे. थोडे (म्हणजे ६०%) वास्तव आणि थोडे (म्हणजे ४०%) कल्पित घटना अशा दोन धाग्यांनी कादंबरीच्या कथानकाची वीण साधली आहे. राजकीय घटनांमुळे पात्रांच्या जीवनात घडून येणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांचे यथार्थ चित्रण या कादंबरीत आहे, म्हणून ही 'राजकीय-कादंबरी' अगदी म.त्र्यं.माडखोलकरांच्या राजकीय कादंबऱ्यांच्या शेजारी मोठ्या मनाने, सन्मानाने 'मकरंद-मुमताज'लाही नेऊन बसवावे इतकी ती सरस, उत्तम आणि आजच्या राजकारणावर सत्य भाष्य करणारी कादंबरी आहे.

कादंबरीचे लेखन दैनंदिनी स्वरूपातील असून आत्मनिवेदनात्मक शैली आहे. मात्र ती आत्मचरित्रात्मक नाही असे लेखकांनी स्वतः मनोगतात म्हटले आहे. पण कादंबरी वाचताना त्यातील बरेच पात्र, घटना, प्रसंग वास्तवातून जसेच्या तसे उचललेले आढळतात. वास्तव आणि काल्पनिक यांची सरमिसळ बेमालूम वठली आहे आणि त्यामुळे कादंबरीतील वातावरणात वाचक गुंतून पडतो. हा लेखकाच्या लेखनशैलीचा विशेष आहे.

'मकरंद' हे पात्र म्हणजे कादंबरीचा कणा ! आयुष्यात अनेक मोहाचे क्षण येऊनही कधीही कोलमडून न पडलेला ! प्रथितयश प्राध्यापक ! आपल्या अध्यापनातून विद्यार्थांवर आंबेडकर, सावरकर, मार्क्सवाद, सद्य परिस्थितीतील राजकारण यांचे संस्कार करणारे प्राध्यापक मकरंद !

'निमा' ही त्यांची सुशील, सात्विक, साधी-भोळी पत्नी. 'प्रयाग' हा मुलगा - आजच्या तरूण पिढीचे प्रतिनिधित्व करणारा. सविता, मुमताज, हृषिकेष, वंदना ही मकरंदची विद्यार्थी मंडळी, गुरूच्या ज्ञानाने, व्यक्तिमत्त्वाने, विचाराने भारावलेली !

नरेंद्र, प्रमोद ही मकरंदची मित्रमंडळी, कॉम्रेड धरणीधर, अश्विनीकुमार, प्रवीणचंद्र भंजदेव, केयुरदत्त ही राजकारणातील राजकीय चळवळीतील मंडळी. याशिवाय कथानकाची गरज आणि वातावरण निर्मितीसाठी आवश्यक अशी अनेक लहानसहान पात्रांची रचना कादंबरीत आहे.

जातीयवाद, आरक्षण, राजकारण, महिला आरक्षण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वेगळा विदर्भ, महाराष्ट्रात परप्रांतियांची घुसखोरी, नक्षलवाद, दलित-दलितेतर शीतयुद्ध स्त्रियांचा राजकारणातील गौरवापर आणि या साऱ्यांच्या पार्श्वभूमीवर बुद्धिजिवींचे औदासिन्य - या सगळ्या ज्वलंत प्रश्नांना लेखकाने बिदिक्कतपणे कादंबरीत मांडले आहे.

कादंबरीचा नायक 'मकरंद' ह्याच्या व्यक्तिमत्त्वाला प्राध्यापक, पती, वडील, मित्र, विचारवंत असे अनेक कंगोरे

अनुक्रमणिका

आहेत. या प्रत्येक भूमिकेत वावरताना मकरंदला स्वतःच्या मर्यादांची पूर्ण जाणीव आहे. दैनंदिनीत नमूद करताना तो स्वतःचे परखड मूल्यांकन करतो. उदा. विधानसभेचे अधिवेशन चालू असताना आरक्षणासाठी गोवारींचा एक भव्य मोर्चा निघाला. नागपूरवासियांना तो दिवस चांगलाच आठवत असेल. त्या प्रसंगाचं वर्णन करताना लेखक लिहितात (पृ.२४) "मोर्चाच्या मंडळींनी मंत्र्यांची भेट मागितली. मंत्र्यांनी ती नाकारली. मोर्चेवाल्यांचा धीर सुटला. त्यांच्या घोषणा वाढल्या. बोलीला उत्तर लाठीनं मिळालं. लाठी हल्ल्यात आणि त्यामुळे भेदरून गेलेल्या बायका-मुलांच्या चेंगराचेंगरीमुळे माणसं तिथल्या तिथे मृत्युमुखी पडली. एकशे आठ माणसं ! संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात एकशे पाच हुतात्मे झाले. त्यापेक्षा तीन जास्त. परिणाम काय झाला ? काहीही नाही. मुख्यमंत्र्यांनी प्रेते ठेवलेल्या शवागाराला भेट दिली नाही. जखमींची चौकशी केली नाही. ही घटना मुंबईत, कलकत्यात किंवा चेन्नईत झाली असती तर तिथल्या लोकांनी देश पेटवला असतात. पण आमचे गाव हे विझलेले शहर आहे." या सगळ्या कळवळ्यातून 'आमचे गाव हे विझलेले शहर आहे' हे सत्य नमूद करतानाच 'मी गोवारींसाठी धावून का गेलो नाही ?' - असे स्वकृतीचेही परखड मूल्यांकन प्रा. मकरंद करतात. मुमताज सविता यांच्या सहवासात घडलेल्या काही नाजूक घटनांचेही असेच परखड मूल्यांकन प्रा. मकरंद करतात.

या कादंबरीत सगळ्यात महत्त्वपूर्ण आणि उल्लेखनीय काय असेल तर प्रा. मकरंद यांच्या निमित्ताने लेखक आचार्य वि. स. जोगांनी केलेले राजकीय चिंतन एकंदरीतच हिंदुस्थानातील राजकारण आणि राजकीय व्यक्तिमत्त्व यावरील परखड भाष्य वाचकांना विचारप्रवृत्त करणारे आहे. उदाहरणादाखल अनेक वाक्ये नमूद करता येतील. जसे १) "ज्याचे जितके अवैध धंदे जास्त त्याला निवडणुकीचं तिकीट मिळण्याची शक्यता जास्त." २) "राजकारण म्हणजे अपराध्यांचं जग आहे. या जगात जगावं लागतं एकतर अपराधी होऊन नाहीतर अपराध्यांना आश्रय देऊन नाहीतर अपराध्यांकडे दुर्लक्ष करून." ३) "लोकशाहीत डोक्यांची बाह्य संख्या महत्त्वाची. डोक्याच्या आत किती प्रतिभा आहे हे महत्त्वाचं नाही."

सद्य राजकारणाविषयी सामान्यांच्या मनातही काहीशा अशाच प्रतिक्रिया असतात. त्याच प्रा. मकरंदसरांच्याही आहेत हे वाचल्यावर वाचकांना हे पात्र आणि ही कादंबरीही अधिक वास्तव आणि आपलीच वाटू लागते.

कादंबरीतला, वाचक म्हणून मला भावलेला आणखी एक कंगोरा आहे. वडील प्रा. मकरंद ! प्रयागशी आपल्या पोटच्या पोराशी वागताना सुद्धा ते आपली तत्त्वनिष्ठता सोडत नाहीत. त्यानी विनवणी करून सुद्धा त्याच्या प्रवेशासाठी प्रा. मकरंद कुणालाही दूरध्वनी करत नाहीत. अथवा देणगी देत नाहीत. प्राध्यापक, प्राचार्य, लेखक, गुरू, विचारवंत म्हणून प्रा. मकरंद यांची आदर्श प्रतिमा वाचकांच्या मनाचा ठाव घेत असतानाच मध्ये-मध्ये प्रयाग अन प्रा. मकरंद यांच्या संवादाने ही आदर्श प्रतिमा कुठेतरी तुटते. सहजच मनात प्रश्न येतो की प्रत्येक आघाडीवर आदर्श ठरलेले प्रा. मकरंद वडील म्हणून अपयशी तर नाही ठरले ? वडील म्हणून त्यांनी प्रयागच्या अपेक्षा पूर्ण का नाही केल्या? वडील म्हणून तरूण मुलगा या नात्याने नाजूक बंध उलगडताना लेखक म्हणून आचार्य वि. स. जोगांचे मला खूप मनापासून अभिनंदन करावेसे वाटते. कारण मुलाचं मन त्यांनी अगदी स्वच्छ आणि सत्य उलगडून दाखवलंय. कादंबरीतील पृष्ठ क्र. १२४ ते १३१ आणि पृ. २८८ ते २९९ ही प्रयागच्या डायरीतील पाने वाचताना लेखकाच्या लेखन कौशल्याचा प्रत्यय येतो. मुलगा म्हणून प्रयागला वडील प्रा. मकरंद अनेकदा टाकून बोलतात. प्रयागही वडिलांना बरेचदा बेपर्वाईने उलट उत्तरे देतो. पण खरं तर दोघांच्याही मनातला एक कोपरा एकमेकांच्या प्रेमाने, आपुलकीने ओथंबलेला आहे. प्रयागला वडिलांचा, त्यांच्या तत्त्वनिष्ठेचा अभिमान आहे. अखेर नक्षलवादासमोर प्रयागचा बळी जातो. आणि याचा परिणाम प्रा. मकरंदवर काय होतो? प्रत्यक्ष कादंबरीतच वाचावा असा हा प्रसंग वाचकांच्या मनाला फार चटका लावून जातो.

सविता, मुमताज या पात्रांच्या माध्यमातून स्त्रियांचा राजकारणातील गैरवापर हा मुद्दा लेखकानी फारच स्पष्टपणे मांडला आहे. आणि राजकारणातील एक काळे सत्य जणू वेशीवर टांगले आहे. महापौर झाल्यावर मुमताज म्हणते, "माझी महापौरांची गाडी लाल दिव्यांची आहे. पण मला ती धोक्याची वाटते. असं वाटतं की, राजकारणात स्त्रिया सुरक्षित नाहीत. सोन्याचे दागिने बनवायचे असतील तर त्यात तांबं घालावं लागतं. स्त्रियांनी दीर्घकाळ राजकारणात राह्यचं म्हंटलं तर..." पुढचं वाक्य मुमताजनी अर्धवट सोडलंय पण सूज्ञ वाचक ते नक्कीच पूर्ण करू शकतो.

सविता आणि मुमताज या दोघींमध्येच किती फरक आहे. सविता आक्रमक आहे. कोणत्याही मार्गाने समोर जाण्याचा हट्ट धरणारी आहे. सविता वाटेल ते करेल. मुमताज आक्रमकही आहे. संयमीही आहे, विवेकी, आवेगीही आहे.

वाटेल ते करून राजकारणात स्थान निर्माण करण्यापेक्षा राजकारणाला कायमचा रामराम ठोकणे तिला अधिक योग्य आणि सोपे वाटते. राजकारणातले डावपेच अन् 'जंगलाचा कायदा' (हा लेखकाचाच शब्द) वापरणाऱ्यांची तिला अत्यंत किळस येते. 'कशाला स्त्रिया राजकारणात आरक्षण मागतात?' असा वैतागपूर्ण प्रश्न तिच्या मनात निर्माण होतो. आणि प्रा. मकरंद, सोनिया गांधी, सुप्रिया सुळे, सुषमा स्वराज, वृंदा करात, प्रतिभा पाटील या राजकारणातील यशस्वी स्त्रियांची उदाहरणे तिच्यासमोर ठेवतात. राजकारणातील स्त्रियांची प्रतिमा बदलण्यासाठी तरी मुमताज सारख्या स्त्रियांनी राजकारणात सक्रीय उतरायला हवे, असे वाचकांनाही वाटू लागते.

मुमताजच्या मावशीच्या निमित्ताने कादंबरीत मुस्लीम धर्म, कुराणाची शिकवण आणि जिहाद याविषयीही चर्चा आलेली आहे. मुमताज, तिचे वडील यांच्या अनुशंगाने बदलत्या. मुस्लीम समूहाच्या मानसिकतेचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. मुमताज सुलतानपुरातून निवडणुकीला उभी राहते तेव्हा आपल्या प्रचारसभेत भाषण करताना ती म्हणते, ''कितने दिन आप बाबरी मशीद के लिए रोअेंगे? मै भी मुसलमान हू। बाबरी गिराए जाने का अफसोस तो मुझे भी है। लेकिन बाबर ने मंदिर गिराया उसका भी अफसोस मुझे है। लेकिन मै पुछती हू की गुजरे जमाने के और आज के जमाने के अफसोसों के चक्रव्यूहो मे आप कबतक फसे रहोगे?''

लेखकाच्या मते आज मुस्लिम मानसिकता बदलते आहे. कदाचित लेखकाचा स्वतःचा तसा अनुभव असेलही. पण माझा मात्र या बदलत्या मुस्लिम मानसिकतेवर विश्वास नाही. मुमताज सारखे एक टक्का मुस्लिम असतीलही नाही असे नाही. पण उर्वरीत ९९ टक्के मुस्लिमांची मानसिकता काय आहे हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. उर्वरित ९९ टक्के सुद्धा या १ टक्क्या प्रमाणे विचार करायला लागतील तो खरा सुदिन! पण प्रश्न हा आहे की ही ९९ टक्के मानसिकता बदलण्याची आम्ही हातावर हात ठेवून वाट पाहत बसणार का? १टक्क्या वर विश्वास ठेवणार की ९९ टक्क्यांपासून देश वाचवण्यासाठी सामर्थ्यशील बनणार?


या कादंबरीचे वेगळेपण हेच आहे की, कादंबरीची नायिका मुस्लिम आहे आणि मुख्य म्हणजे ती पिढीजात मुस्लिम मानसिकता धुडकावणारी आहे. मुमताजच्या रूपाने हिंदूच्या मनातील मुस्लिमांचे पारंपारिक चित्र बदलण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. आणि तो नक्कीच स्तुत्य आहे.

अशारीतीने अनेक ज्वलंत प्रश्नांना अन् समस्यांना समाजासमोर मांडणारी अन् वाचकांना अस्वस्थ करणारी 'मकरंद-मुमताज' ही उल्लेखनीय राजकीय कांदबरी. या प्रश्नांना लेखक, आचार्य वि. स. जोगांनी वाचा तर फोडली आहे, पण प्रश्नांना उत्तर मिळणार ? समस्येवर उपाय सापडणार ? .... ते येणारा भविष्यकाळच ठरवेल.

'मकरंद-मुमताज' - डॉ. वि. स. जोग
विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सीताबर्डी, नागपूर
पृष्ठे - ३५५, मूल्य - ३५०/-

डॉ. शुभा साठे
४०, नाट्यसंगीत, मंगलधाम हौसिंग सोसायटी,
नांदा, कोराडी, जि. नागपूर
भ्रमणध्वनी : ९४२२१४६८६४

अनुक्रमणिका



लोकसाहित्याचं अस्सल 'अक्षरलेणं'

नरेंद्र लांजेवार

डॉ. इंदुमती लहाने आणि स्त्री मुक्ती संघटना यांचे नाते इतके दृढ आहे की, इंदुमती लहाने यांचे नाव उच्चारताच स्त्रीमुक्ती संघटनेवाल्या लहाने ताई का? असा प्रश्न समोरच्यांकडून विचारल्या जातो. गेल्या तीस ते पस्तीस वर्षांपासून इंदुताई लहाने स्त्रियांच्या प्रश्नांवर संघटितपणे संघर्ष करीत आहेत. स्त्रियांचे उद्‌ध्वस्त होणारे संसार सावरण्यासाठी त्या नेहमीच प्रयत्नशील असतात.

इंतुताई लहाने यांची ग्रामीण जीवनाची नाळ जुळलेली आहे. ग्रामीण भागात भरलेल्या कुटुंबात आप्तनातेवाईकांसोबत त्यांचे बालपण गेले. बालपणातील ग्रामीण जीवनाचा जो अक्षय ठेवा त्यांना लाभला तो त्यांनी प्राणपणाने जपला. लग्न-संसार या रितीभाती पूर्ण झाल्यावर पुढच्या शिक्षणाची मनीषा पूर्ण करून त्यांनी लोकसाहित्यात आपले संशोधन पूर्ण केले.

लोकसाहित्याचा अभ्यास हा खऱ्या अर्थाने लोकसंस्कृतीचा अभ्यास असतो. पारंपरिक लोकजीवनातील लोकाचार, विधी, रूढी, पंरपरा, संस्कार, सण-उत्सव, लोककथा आणि मौखिक वाङ्मय यातून मानवी संस्कृतीला पोषक वातावरण मिळत असते. व्यक्तीच्या मनात जाण्याचा मार्ग त्याच्या पोटातून असतो असे म्हणतात - त्याचप्रमाणे समाजाचा अभ्यास करावयाचा झाल्यास त्याच्या संस्कृतीतूनच पुढे जावे लागते. कोणतीही संस्कृती ही भौतिक प्रगतीने प्रभावीत होत असली तरी लोकसंस्कृती, लोकसाहित्यातून ती प्रवाही होत असते.

डॉ. इंतुताई लहानेंनी मेहकर - बुलडाणा परिसरातील हजारो लोकगीते गोळा केलीत. ती लिहून घेतली, त्यांची अभ्यासपूर्ण वर्गवारी तयार केली. त्यातून कृषीजीवन, समाजजीवनाचे प्रतिबिंब शोधण्याचा प्रयत्न केला. संकलीत लोकगीतांचे ओवीगीते, कथाकाव्य गीते, खेळगीते असे वर्गीकरण करून लोकगीतांचे स्वरूप भेदानुसार अभ्यासकांना सोईचे व्हावे म्हणून वर्गीकरण केले. यामध्ये गेय आणि गद्य स्वरूपाचे लोकगीतांचे अभ्यापूर्ण त्यांनी वर्णन केले. प्रत्येक सण-समारंभ, स्त्री जीवनातील विविध टप्पे, विवाहविधी, कौटुंबिक जीवनातील नातेसंबंध, अहेव मरणाची गाणी अशा सर्वांमधून मानवी समाजजीवन त्यांनी विविध गीतांच्या माध्यमातून उलगडून दाखविले. या लोकगीतांना काही साजेशी चित्रे सुचित्रा जाटोळ यांनी रेखाटून दिले आहेत.

डॉ. इंदूताई लहानेंच्या या संपूर्ण लोकगीतांच्या अभ्यासामध्ये त्यांनी लोकगीतांचा विविध रसांच्या दृष्टीने जो अभ्यास केलेला आहे, जे चिंतन केलेलं आहे ते खरोखरच महत्त्वपूर्ण आहे. लोकगीतांचे अलंकार आणि विविध रस यातून व्यक्त झालेल्या कल्पनाबंधांचा त्यांनी केलेला अभ्यास हा खरोखरच महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी लोकगीतांमधील गेयता, लोकगीतांमधील अलंकार योजना, लोकगीतांमधील विविध रसांचा आविष्कार आणि वऱ्हाडी लोकगीतांची वैशिष्ट्ये जी सांगितली आहेत ती खरोखरच या क्षेत्रातील पुढील अभ्यासकांसाठी महत्त्वपूर्ण अशी आहे. यापूर्वी असा प्रयत्न झालेला दिसत नाही. 'अक्षरलेणं' या पुस्तकाला लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोडे यांची प्रस्तावना लाभली आहे. औरंगाबादचे डॉ. शरद व्यवहारे यांनी या पुस्तकाची पाठराखण केलेली आहे.

लोकसाहित्यातील हे अस्सल 'अक्षरलेणं' खरोखरच नश्वर न होणारे असे आहे. जे काम खरं तर महाराष्ट्र राज्य

अनुक्रमणिका

लोकसाहित्य समितीने करावयास पाहिजे होते, ते काम पीएच. डी. च्या निमित्ताने का होईना इंदुताई लहाने यांनी वयाच्या अमृत महोत्सवी वर्षात पुस्तक रूपाने प्रकाशित केले आणि भावी लोकसाहित्याच्या अभ्यासकांसाठी एक मोठी ठेव दिली, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदनच केले पाहिजे. हिंगोलीच्या ऊरूवेला प्रकाशनाने देखण्या स्वरूपामध्ये जास्तीत जास्त निर्दोष पुस्तक देण्याचा केलेला प्रयत्न सुद्धा अभिनंदनीय आहे.

'अक्षरलेणं' - प्रा. डॉ. इंदुमती लहाने
उरूवेला प्रकाशन, हिंगोली, पृष्ठ २३२, किंमत : २०० रुपये

▌नरेंद्र लांजेवार
ग्रंथपाल, भारत विद्यालय, बुलढाणा, भ्रमणध्वनी : ९४२२१८०४५१
email : l_narendra2001@yahoo.com

।। विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक 'युगवाणी'बद्दल वार्षिक निवेदन ।।

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाची मालकी व इतर बाबी यांच्या संबंधी वृत्तपत्रे आणि पुस्तक नोंदणी अधिनियम, कलम डी १९ (बी) आणि वृत्तपत्रे नोंदणी (केंद्रीय) नियमावली १९५६, नियम ८, नमुना ४, यांना अनुसरून केलेले निवेदन.

०१. प्रकाशन स्थळ :
नागपूर, महाराष्ट्र

०२. प्रकाशनाची कालनियतता :
त्रैमासिक (जानेवारी, एप्रिल, जुलै, आक्टोबर)

०३. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :
शोभा अरूण उबगडे, भारतीय
सरचिटणीस विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२.


०४. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :
वासुदेव लक्ष्मणराव विधाते, भारतीय
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, नांदेपेरा रोड, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४.

०५. मुद्रणस्थळ :
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, नांदेपेरा रोड, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४.

०६. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :
अजय जनार्दन देशपांडे, भारतीय
वामनघाट मार्ग, हनुमान नगर, वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४

मी शोभा अरूण उबगडे असे प्रतिज्ञापूर्वक सांगते की वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

▌शोभा अरूण उबगडे
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, नागपूर
(प्रकाशक)



प्रेम अणि शृंगाराचा धीट आविष्कार

नामदेव चं. कांबळे

बाबाराव मुसळे ग्रामीण कथाकार, कादंबरीकार म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांच्या नुकताच 'इथे पेटली माणूस-गात्रे' नावाचा कविता संग्रह वाशीमच्या काव्याग्रह प्रकाशनने प्रकाशित केला. वयाच्या साठीनंतर मुसळेंचा कविता संग्रह वाचकसंमुख झाला. साहजिकच त्यात त्यांच्या आयुष्यभराचे मनन-चिंतन, कवीदृष्टी व दृष्टीकोण असे संचित सामावलेले असणार असे वाचकाला वाटणार व उत्सुकतेपोटी तो अगर ती 'इथे पेटली माणूस-गात्रे' वाचणार हे साहजिक आहे.

त्याच उत्सुकतेपोटी मी ४३ कवितांचा समावेश असलेला त्यांचा 'इथे पेटली माणूस-गात्रे' कविता संग्रह वाचला आणि मुसळेंच्या कविता संग्रहामधील प्रेम आणि श्रृंगाराच्या प्रामाणिक, सच्च्या आविष्काराने मी प्रभावित झालो. त्यांच्या कवितासंग्रहामध्ये अनेक विषयांवरच्या कविता आहेत. निसर्ग, भूक, शिल्प, कला, कुटुंब, गाव, समाजकारण, राजकारण, धर्मकारण अशा विषयांमध्ये त्या विखुरलेल्या आहेत. प्रेम आणि श्रृंगार 'इथे पेटली माणूस-गात्रे' चा केंद्र बिंदू आहे व त्या विषयावरच्या त्यांच्या कविता लक्षणीय आहेत.

दुर्वा गणपतीला वहायच्या असतात. आपल्या आराध्य दैवताला वाहण्यापूर्वी त्या निवडून घ्याव्या लागतात आणि मोजूनच वहाव्या लागतात. तशाच 'इथे पेटली माणूस-गात्रे' मध्ये मोजक्याच प्रेम कविता आहेत.

प्रेमाची पहिली पायरी म्हणजे स्वगत. स्वगतात प्रेमाची रूजवात होत असते. एखादा युवक एखाद्या युवतीला पाहतो. ती त्याला भावते- आवडते आणि त्याच्या नकळत त्याच्या तोंडून तिच्यासाठी एखादी उपमा निसटून जाते. एखादे वेळी तिला पाहून मनात शब्दांचे कारंजे उडतात. त्याच भावावस्थेतील आणि त्याच वयोगटातील मुसळेंची 'तुझ्या अंगणी' कविता. कवितेत ते म्हणतात-

तुझ्या अंगणी मोगरा
बहरावा चांदराती
व्हावी ओंजळ शिंपले
याव्या बरसत स्वाती (६३)

स्वाती नक्षत्र शिंपल्याला मोत्याचे दान देत असते. तसे प्रेमाचे दान आपल्या ओंजळीत पडावे असे कवीला वाटते.

स्वगतामध्ये रूजलेले प्रेम हळूहळू दृष्टीतून, स्मितामधून अंकुरते. तो तर तिला पाहात असतोच. तिही त्याला कधी वळून पाहून तर कधी चेहऱ्यावर स्मित उमलवून त्याला दाद देते. तोच अनुभव कवीचाही. त्यांचे प्रेम हळुहळू फुलत गेले. मने धीट झाली. त्यानेच प्रेयसीची मजल त्याला खडा मारण्यापर्यंत गेली. तेव्हा कवी म्हणतो -

अशी अडखळतांना खडा मारण्यापूर्वी
थोडा विचार करायचा होतास (आभाळ-३२)

युवावस्थेमध्ये प्रेम आणि प्रणय चोरून करायचे असतात. बाहेरच्यांची भिती तर असतेच, घरच्यांची सुद्धा भिती असते. तिला त्याला खडा फेकून मारायचा असतो आणि कोणी पाहणार तर नाही अशी भितीही तिला वाटत असते. त्यामुळे 'मारू की नको' अशी तिची अवस्था होते आणि एकदाचा ती खडा फेकून मारतेच. परंतु तेवढ्यानेच तिचा चुडा निखळतो, हात रक्ताळतो. तेव्हा कवी ओंजळभर तिची आसवे प्यायला तयार होतो. तिची धिटाई दुरून त्याला खडा मारण्या इतपतच.

अनुक्रमणिका

परंतु कवी एक पाऊल पुढेच. थेट तिच्या समीप नंतर तिच्या बाहुपाशात आणि त्याला येणारा अनुभव असा-

तुझ्या डोळ्याभर । थेंब आभाळाचा ।
मुका कपाळाचा । विद्युन्मय ।। (तुझ्या डोळाभर-५७)

येथे कवीला 'तुझ्या डोळाभर । थेंब आभाळाचा ।' मधून नेमके काय म्हणायचे आहे ते वाचकाच्या (माझ्यासारख्या तरी) लक्षात येत नाही. तिच्या दृष्टीतून आभाळाचा थेंब डोकावतो एवढेच कळते. परंतु 'थेंब आभाळाचा' म्हणजे नेमके काय ते नाहीच कळत.

कधी कधी ती नको नको म्हणतानाही तो तिचे चुंबन घेतो. चुंबन तारूण्य सुलभ साद-प्रतिसादाची गोंदणखूण. ती खूण तो प्रेयसीच्या नाजूक देहावर उमटवतो. तेव्हा तिला त्याचे वागणे आवडत नाही. कारण कवितेत तोच म्हणतो -

काय चुकले माझे असे की
मी तुझ्या अल्वार देहाचा मुका घेतलाच (क्रौंचवध-४३)

यातून आपले काही तरी चुकले हे त्याला मान्य होत नाही. तिच्या मनाविरूद्ध त्याचे वागणे असूनही त्याला ते पटत नाही. ती त्याला काही तरी समजुतीचे सांगते, परंतु

स्पर्शोत्सुक क्षणांचा उपदेश करण्याचा वेडाचार करायला
नको असतो. (क्रौंचवध-४३)

म्हणत तो तिचे म्हणणे उडवून लावतो.

नंतर कधी तरी कवीचे लग्न होते. जीवाची जोडीदार त्याला मिळते. ती त्याच्या जोडीने सात पावले चालताना मागे पडते. तो मागे वळून पाहतो तर ती तिला आलेल्या ऋतूत मग्न असलेली. नव्याने आलेला ऋतू तिच्यासाठी नवलाईचा असतो. त्या नव्हाळीला ती विचारात जोजवीत असावी. आनंद विभोर होवून भावी संसाराची सुखस्वप्ने रंगवीत असावी. तेव्हा कवी आयुष्यात काट्यांचे सलही सोसावे लागेल हे तिने विसरायला नको असे तिला सांगतो. रूतणारे ते काटे परिस्थितीचे असतील, अप्रिय घटना अगर शब्दांचे असतील. असा काहीसा विचार करूनच कवी नंतर म्हणतो-

माझा एक प्रस्ताव असा आहे की
तू छातीवरची गाठ सैल कर
तो पर्यंत मी उन्हाळा पिण्याचा सराव करतो.
(तात्पर्य-४७)

भविष्यातील उन्हाळ्याचा सराव करू जाणारा कवी आपल्या तिला मीलनोत्सुक हो परंतु स्वतःला संयमाचा बांध घाल असे सांगतांना म्हणतो-

तात्पर्य काय की
ऋतूंनाही सूज येईल
इतके डसू नये माणसाने माणसाला (तात्पर्य-४८)

सूचना कवितेतही सार्वजनिक ठिकाणी प्रेमाराधन करायला नको असा उपदेश तिला करतो.

वय वाढत जाते. एकेक ऊन्हाळा पावसाळा येतो जातो. ऊन पावसाचा अनुभव घेत असताना कवीला जीवनाच्या दाहकतेची जाणीव होते. इच्छा नसतांना कराव्या लागणाऱ्या तडजोडींचे अनुभव येतात. अंथरून पाहून पाय पसरण्याचा प्रयत्न करू जाता ते तोकडे पडत असल्याचे अनुभवास येवू लागते. त्यामुळे तो अगतिकतेने म्हणतो -

प्रिये,
तू कळ्या मागतेस
फुले मागतेस
तर कधी गजरा मागतेस
पण तुला देता येण्याजोगी यापैकी एकही वस्तू
माझ्याजवळ नाही (प्रश्न-२३)

आणि तिला विश्वासात घेत
तुला शक्य असेल तर एक कर
मला तुझ्या पदराखाली आसरा दे
म्हणजे माझ्या निवाऱ्याचा प्रश्न सुटेल
मग उरलेल्या प्रश्नांसाठी
मी आयुष्यभर
झगडत राहीन,
झगडत राहीन.(प्रश्न-२३)

हरळी जमिनीला धरून सारखी पसरत असते. तशीच वासनाही मानवी मनात हरळीसारखी सैरभैर होत असते. अगदी कुमार अवस्थेपासून प्रौढावस्थेपर्यंत आणि नंतर म्हातारपणात सुद्धा म्हणूनच 'पिकल्या पानाचा देठ बाई हिरवा' अशी लावणी झाली आणि म्हाताऱ्या माणसांनी तिला दाद सुद्धा दिली. बाबाराव मुसळे त्याला अपवाद नाहीत हे त्यांचा कविता संग्रह वाचतांना लक्षात येते. त्यांच्या 'इथे पेटली माणूस-गात्रे' मध्ये प्रणय धीट आणि प्रमाणिकपणे अभिव्यक्त झाला आहे. अगदी स्वतःच्या मर्यादांसह !

अनुक्रमणिका

माणसे मागासवर्गीय असतात. त्यांना सुसंस्कृतपणे राहाता-वागता येत नसते. याला काही अपवादही असतील. परंतु अपवादानेच नियम सिद्ध होत असतो. मुसळे प्रणयामध्ये आपण मागासवर्गीय असल्याचे म्हणतात. त्यांची वासेनच्छा वावटळत्या पानागत इतस्ततः भिरभिरते. आणि ती धसमुसळीही असते. श्रृंगार फुलवायचा - रंगवायचा असतो. तसे त्यांना जमत नसावे. म्हणूनच ते तिला विचारतात-

एकदा झडलेली पिसं पाखरं
पुनः अंगावर चिकटवून घेतील काय गं? (श्रण-२९)

कवी तिला प्रश्न विचारूनच थांबत नाही, तर स्वतःशी तऱ्हेवाईकपणे न वागण्याची तिला विनंती करतो आणि

अशा वेळी कृपा करून तू एक कर
माझे नाकर्तेपण जाणवणार नाही इतपत
हलकेच तू माझ्यावरून पांघरत ने स्वतःला (श्रण-२९)

असे तिला आर्जव करतो.'वावटळत्या पानागत इतस्ततः' भिरभिरणाऱ्या कवीला त्याच्यासारखीच भिरभिरणारी एक ती दिसते. म्हणूनच तिला म्हणतो-

नकोस उसवू स्फटिकी-रस्ते
उरात ओली कास
फुलोरणारा देह गाठीला
नकोस आळवू फास (तळ्यात मिटली पाने-३३)

कवी नंतर लग्न गाठीने कोणा एकीशी बांधला जातो खरा परंतु ती व तो एकत्र राहत नसल्याने तिच्या विरहात होरपळणारा व तिच्या भेटीसाठी आतूर झालेला कवी म्हणतो -

तू तिकडे प्रदेशमग्न असता
मी इथे भिंतीवर खुणा करून
दररोज मोजतोय
एकेक खूण केल्यावर रांजणात खडे टाकणाऱ्या
वाल्यासारखा. (...कृपा करून -३१)

येथे कवीचा विवाह झाल्याचे मानायचे ते एवढ्याचसाठी की तो तिच्या आठवणीत एकेक दिवस मोजतो. शिवाय पुढे -

काय गं, ही वठलेली संध्याकाळ कोकिळण्यासाठी
वसंत कुठवर आलाय ते सांगशिल का कृपा करून.
(...कृपा करून-३१)

असेही म्हणतो, संध्याकाळ, रात्र याची वाट पतीच पाहत असतो. कवीची आतुरता कळते. ती असते त्या गावाला त्याचे आकस्मिक जाणे होते. आणि रात्री त्याच्या धसमुसळेपणाचा फुगा ती कुठल्याशा नवपरिणत दाम्पत्याच्या विवाहसोहळ्यातील अत्यंत पॉवरफुल इलेक्ट्रिक बल्ब दाखवून टच्चकन फोडून मोकळी होते. तेवढ्याने कवीचे हातपाय लुळे पडतात. गलितगात्र झालेल्या कवीला आपण तिच्या अरण्यप्रेदशातील संदर्भशून्य साप्ताहिक मरण स्वीकारीत असल्याचे वाटू लागते. तिचा अरण्यप्रदेश आणि संदर्भशून्य साप्ताहिक मरण या शब्दांमधून कवीची ती तो गेला तेव्हा माहेरी गेलेली असावी आणि तिच्या तेथे जाण्याचे प्रयोजन नैमित्तिक असावे म्हणूनच कवीचे तेथे जाणे संदर्भशून्य. तो प्रदेश खासच तिचा. फक्त साप्ताहिक मरण त्याचे. अगतिकतेमुळे तो उघड्यावाघड्या तिला न्याहळीत सुटतो आणि

तुझे सार्वभौमत्त्व नाकारणे मला सोईचे नाही म्हणून
तो (बलात्कार) सुद्धा या घडीला निमुटपणे मान्य करतो.
(अन् तू-३५)

अशी अगतिकता व्यक्त करतो. त्याच्या संभोग उत्सुकतेचा असा उपमर्द केला गेल्याने त्याला पराकोटीच्या वेदना होतात. तेव्हा ती

कॅलेंडरची पानं उलटण्यात गढून गेलेली. (अन् तू-३५)

कॅलेंडरची पाने उलटण्याची तिची कृती, कशी जिरवली! अशा लाडीक अविर्भावाची असू शकते किंवा माझ्या आक्रमकतेचा प्रतिकार तू करूच शकत नाही अशा तुच्छतेचीही असू शकते.

कवीचा प्रणय मुळातच धसमुसळा असल्याने त्याचा घोडा नको तेव्हा पायमोडून बसतो आणि त्याला

थांब, चिल्होरू देऊ नकोस एवढ्यात
तुझ्या गर्भागार भरतीचे समुद्री-आयाम.
रात्रीच शुक्राच्या साक्षीनं
माझी बेदम पानगळ झालीय गं!
तरीपण
फिरून पाखरं येणारच नाहीत
असं थोडंच आहे. (पानगळ-२४)

असे तिचे आर्जव करणे क्रमप्राप्त ठरते. त्याचा बहर झडून जातो. परंतु ते तेवढ्यापुरतेच असते. बहराने पुनः यायचे असते, पाखरांच्या पुनः येण्यासारखे ! नंतर कवी ''हा पाऊस सुरू व्हायच्या आता आपण काहीतरी करायला हवे'' (पाऊस-३०) म्हणतो व नंतर ''तुझ्याजवळची चार बोळकी तू अंगणात भर दुपारी मांडून ठेव'' (पाऊस-३०)

अनुक्रमणिका

असे तिला सांगतो, हे 'काहीतरी करणे' म्हणजे काय असते, तर समागमापूर्वी एकमेकांना फुलविणे, चेतविणे असते. कवी घरातली 'चार बोळकी' अंगणात नेवून ठेवायला सांगत नाही. तिच्या जवळची चार बोळकी अंगणात नेवून ठेवायला सांगतो. ती चार बोळकी म्हणजे चार पुरूषार्थ आणि ते तिने अंगणात नेऊन ठेवायचे म्हणजे तिने संयम मिळवायचा. आपला बहर अवेळी झडला तर काय घ्या असे वाटून तो हा सल्ला देत असतो. आणि श्रृंगाराचे प्रतिक असलेला प्रत्येक अवयव तिच्या पुरूषार्थाचे संरक्षणासाठी तैनात करण्याची ग्वाही देतो. त्याचे कारण सांगतांना कवी म्हणतो-

> झडीवर घ्यायच्या तयारीत असलेल्या पावसात
> तुझे चिंब होणे मला जड जाईल. (पाऊस-३०)

युवावस्था ते तारूण्य या वयात कवीची वासनातृप्ती होत नाही. त्यासाठी त्याचा धसमुसळा शृंगार आणि शिघ्रपतन कारणीभूत ठरते. तर कधी तिची आक्रमकता त्यासाठी निमित्त होते. कवीचे वय उतरणीला लागते. मनातला हिर्वाकोंब आधी सारखाच असतो. परंतु निसर्ग नियमाने शरीर साथ देत नाही. त्याची पडझड सुरू झालेली असते. त्यामुळे

> आता कोणाचेही मोहरून टाकतील असे
> गर्दगव्हाळ स्वप्नरंग
> साद घालीतनासे झालेयत
> माझ्यातील भुकेकंगाल आर्त सुक्तास
> (माझी पिढीभारली पावलं-३८)

असे त्याला वाटू लागते. फूल पाकळीतल्या अखेरच्या पेशीचे मरण होवू नये म्हणून कवी युगाची म्हणजे त्याच्या काळाची भाषा बोलून स्वतःच्या उदात बेगुमान वासनारूपी घोड्याच्या टापा सुद्धा उमटवू न देण्याचा निर्धार करतो. कारण त्याच्यातील रावणाची वासना कितीही टोकदार असली तरी पूर्वीची आसक्ती नि उर्मी उरलेली नसते. म्हणून कवी

> म्हणून माझी पिढीभारली पावलं
> गांधारीचा आंधळा उन्माद रिता करण्यासाठी
> दमदारपणे उचलली जात आहेत.
> (माझी पिढीभारली पावलं-३८)

असे म्हणतो. उन्माद गांधारीचा असो की दुसऱ्या कोणाचा असो, तो आंधळाच असतो. तो रिता करणे आपल्याच्याने शक्य होत नाही. आपल्यातील तो उन्माद संपल्याचे कवी मान्य करतो आणि तिच्यात अद्याप शाबूत असल्याचा त्याला भ्रम की विश्वास काय असेल तो असतो. त्यामुळेच कवी दमदार पावले उचलायला लागतो. ती पावले देव दर्शनाची असतील, पोथी पारायणाची असतील. तीर्थयात्रेच्या वाटेवरची असतील.

आता कवीला तिच्या फक्त आधाराची गरज असते. ती ओढ त्याला आवरता आवरत नाही. आणि पोखडा मोठा झाल्याने तिला तो अष्टौप्रहर देता येत नाही. रात्री अंधार होतो. त्याला पेंग आल्याचे लक्षात येताच ती त्याचे जवळून निघून जाते. कधी तरी त्याला जाग येते. पाहतो तर ती जवळ नाही. तेव्हा

> तू केव्हा निघून गेलीयस निष्पर्ण उरातील अंधारातून
> ते कळाले नाही (नाकेबंदी-४२)

असे त्याला वाटू लागते. तो उगीच्या उगीच तिच्या पाऊल खुणा चाचपून पाहतो. आणि ती आपल्या वाटेवर काटे तर पेरीत गेली नसेल ना अशी शंका त्याला येवू लागते. ते काटे तिने तिच्या पोरवड्याच्या मनात त्याच्याविषयी काही किल्मिश पेरले असेल की काय या भितीचे असतात. तो क्षण त्याच्यासाठी 'प्रेमकंगाल'. त्याचीच शपथ घेवून तो रस्तोरस्ती तिची नाकेबंदी करण्याची शपथ घेतो. ती नाकेबंदी करणे निरर्थक असल्याचे त्याला ठाऊक असून आणि

> कफन होऊन पडलेले माझे स्वप्नाळू कलेवर (नाकेबंदी-४२)

असे मान्य करूनही कवी तसे का म्हणतात त्यांचे त्यांना ठाऊक.

इथे पेटली माणूस-गात्रे - बाबाराव मुसळे
काव्याग्रह प्रकाशन, वाशिम
पृष्ठे ६४, किंमत ७०/-

। नामदेव चं. कांबळे
चपराशीपुरा, लक्झरी स्टँड जवळ,
अकोला रोड, वाशिम.
भ्रमणध्वनी : ९५५२४२३५७६

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त : फेब्रुवारी २०१२ ते एप्रिल २०१२

दि. १२ फेब्रुवारी, २०१२

भारतीय नाट्यशास्त्राचे आद्यप्रणेते भरतमुनी यांच्या जयंती प्रीत्यर्थ संस्कारभारती व विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पराग घोंगे लिखित 'मानसीचा शिल्पकार तो' या दीर्घांकांचे 'घर अंगण' या उपक्रमांतर्गत सादरीकरण करण्यात आले. युटिलिटी सर्व्हिसेस निर्मित या दीर्घांकाचे दिग्दर्शन डॉ. विनोद इंदूरकर यांनी केले. पराग घोंगे, डॉ. विनोद इंदूरकर, सीमा केतकर व दीपलक्ष्मी भट यांच्या यात भूमिका होत्या. नेपथ्य अमित शेंडे यांचे व प्रकाशयोजना व संगीत किशोर बत्तासे व सोनु जेस्वानी यांचे होते.

दि. १७ फेब्रुवारी, २०१२

अमेरिका स्थित सुप्रसिद्ध साहित्यिक-उद्योजक डॉ. अनंत लाभसेटवार यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्ताने 'जागतिकीकरण, समाज आणि मराठी साहित्य' या डॉ. रवींद्र शोभणे संपादित गौरव ग्रंथाचा प्रकाशन समारंभ दि. १७ फेब्रुवारी, २०१२ रोजी विदर्भ साहित्य संघ आणि विजय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने झाला. अध्यक्षस्थानी मनोहर म्हैसाळकर होते. सुप्रसिद्ध कथाकार श्री. भारत सासणे यांच्या हस्ते गौरवग्रंथाचे प्रकाशन झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास सपकाळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी लाभसेटवार पती-पत्नीचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

दि. २० फेब्रुवारी, २०१२

कविवर्य कुसुमाग्रज जन्मशताब्दी सांगते निमित्त विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात 'सर्वात्मका सर्वेश्वरा' हा विदर्भ साहित्य संघ, शाखा-अमरावती निर्मित सांगीतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. कुसुमाग्रजांच्या समग्र साहित्य प्रकारांवर प्रकाश टाकणाऱ्या ह्या कार्यक्रमाचे संयोजन व संहिता लेखन श्री. शिवराय कुलकर्णी व डॉ. मोना चिमोटे यांचे होते. शास्त्रीय संगीत गायिका प्रा. डॉ. जयश्री वैष्णव, डॉ. गौरी बोधनकर, रंगकर्मी अनंत अभ्यंकर व रसिक वडेवकर यांनी नाट्यगीते आणि नाट्यप्रवेश सादर केले.

दि. १७ मार्च, २०१२

विदर्भ साहित्य संघाच्या 'चित्रलिपी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध गायक, भारतरत्न कै. पं. भीमसेन जोशी यांची दृक्‌श्राव्य चित्रफीत ॲड. अनिरुद्ध यांच्या सहकार्याने प्रदर्शित करण्यात आली.

दि. ३१ मार्च, २०१२

विदर्भ साहित्य संघाचे अध्वर्यु व पत्रमहर्षी कै. ग. त्र्यं माडखोलकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रतिवर्षी होणाऱ्या व्याख्यानमालेत शनिवार, दि. ३१ मार्च, २०१२ रोजी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी 'मराठी भाषेचा संकोच : कारणमीमांसा' या विषयावर व्याख्यानपुष्प गुंफले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत मा. गो. वैद्य होते.

दि. १ एप्रिल, २०१२

कविवर्य 'ग्रेस' यांना श्रद्धांजली

विदर्भ साहित्य संघ व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने रविवार, दि. १ एप्रिल, २०१२ रोजी सकाळी १० वाजता साई सभागृह; राष्ट्रभाषा संकुल नागपूर येथे कविवर्य 'ग्रेस' यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. श्री. अनिल देशमुख अध्यक्षस्थानी होते. ना. डॉ. नितीन राऊत, नागपूरचे महापौर प्रा. अनिल सोले, माजी महापौर अटलबहादूर सिंग, डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. वि. स. जोग व प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्या.

सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

अनुक्रमणिका

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघ

विद्वत्‌रत्न डॉ. के. ल. (भाऊजी) दप्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय

व

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती सार्वजनिक वाचनालय

ग्रंथसहवास : काही अभिप्राय

श्री. नितीन गडकरी

विदर्भ साहित्य संघाच्या भूतकाळातील आठवणी पुन्हा आठवायला लागल्यात. भविष्यकालीन वाटचालीकरिता हार्दिक शुभेच्छा !

सौ. उषा तांबे

ग्रंथालय पाहून आनंद झाला, अभिनंदन व शुभेच्छा.

श्री. दत्ता मेघे

ग्रंथालय पाहिले. खूप आवडले.

श्री. सुधीर नांदगावकर

नागपूर भेटी दरम्यान 'ग्रंथसहवास' या वास्तूस भेट देण्याचा योग आला. चित्रपट विषयावर मराठी/इंग्रजी पुस्तके व मला हवा असलेल्या माझ्याच पुस्तकाचा संदर्भ उपलब्ध करुन दिल्याबद्दल खूप आनंद झाला. तिथली सेवा आणि अगत्य सुखावून गेले.

श्रीमती शोभा पणशीकर

It is so good to see books manitains in an examplary manner. The collection is vast and varied and offers an exallent apportunity for those interested in reading

डॉ. मदन कुळकर्णी

आज ग्रंथालयात आलो. खूप प्रसन्न वाटले. माझा पीएचडीचा काळ आठवला. सर्वच सुंदर झाले आहे.

श्री. कमलाकर सोनटक्के

महाराष्ट्र आणि विदर्भाचं आदरस्थान असलेली आपली ग्रंथसहवास ही वास्तू अशीच सेवाभावी ठरो.

श्री. कौशल इनामदार (संगीतकार)

मी पाहिलेलं मराठी पुस्तकाचं हे सर्वोत्कृष्ट ग्रंथालय. दरवेळी इथे येऊन मला शांतता आणि प्रसन्नता अनुभवायला मिळाली आहे. इतक्या उत्तम वातावरणात एखाद्या निरक्षर माणसालाही वाचनाची प्रेरणा मिळावी असे हे ग्रंथालय.

डॉ. उषा चौसाळकर

आपली सुसज्ज ग्रंथनगरी पाहून आनंद झाला. इंग्रजीचा प्रभावाचा सारीकडे अंमल सुरू असताना ही मराठी साहित्यनगरी पाहून मन भरू लागले.

अनुक्रमणिका

श्रीमती दुर्गाताई कानगो

ग्रंथसहवास मध्ये प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने विदर्भ साहित्य संघाच्या नव्या वास्तूत मी यापूर्वी ५० वर्षीपूर्वी आले होते. ग्रंथसहवास येथील सहकाऱ्यांचा मनःपूर्वक सहभाग असल्याने या ग्रंथांचा सहवास असंख्यांना मिळो.

श्री. ल. त्र्यं. जोशी

ग्रंथालयाच्या भावी प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा.

श्री. केशव जोशी

विदर्भ साहित्य संघ व लायब्ररीचे नवीन रूप पाहून अतीव आनंद झाला. ग्रंथालय कसे असावे याचे उदाहरण म्हणजे आजचे हे ग्रंथालय.

श्री. चंद्रशेखर पांडे

जुन्या ६० वर्षांपूर्वीच्या आठवणी उजळून निघाल्या. एक गौरवशाली परंपरा आधुनिक युगात पाहायला मिळाली.

सौ. श्यामला वनारसे

विदर्भ साहित्य संघाच्या नव्या वास्तूत सरस्वतीच्या उपासकांना प्रिय असणारे निवांत वैभव पाहून फार बरे वाटले. मराठीची वाचन संस्कृती यासारख्या आधारावरच विकसित होत राहील.

श्री. विश्वास पाटील

भव्य आणि प्रशस्त वास्तू उत्तम ग्रंथालय आणि साहित्याची सदोदित नवदृष्टी बाळगणारा विदर्भ साहित्य संघ आपले धवल कार्य असेच निर्विघ्न घडत राहो.

श्री. सदाशिव अमरापूरकर

अप्रतिम ग्रंथालय, प्रत्येक शहरात असावे असे.

श्री. नारायण कुळकर्णी कवठेकर

एकूणच लायब्ररीचे अंतरंग पाहून एकदमच आनंद. एखाद्या समृद्ध, सांस्कृतिक आणि क्रांतीक पर्यावरणात आल्यागद् झाले. माणसे ग्रंथाशी कशी एकरूप होऊ शकतात याचा नमूना !

श्री. रमेश थोंडगे

फारच सुंदर वास्तू. ग्रंथालयातील सोई अप्रतिम विश्वस्तांना धन्यवाद.

श्री. सुबोध केंभावी

या ग्रंथालयाची एखादी चित्रफीत असायला हवी इतके सुंदर, आकर्षक व निवांत मोकळेपणा देणारे ग्रंथालय इतरांसाठी प्रेरक ठरू शकते. चित्रफीत महाजालावर सुद्धा उपलब्ध करून ठेवावी.

श्री. किशोर कुळकर्णी अवर सचिव मराठी भाषा विभाग

अभ्यासक, जिज्ञासू, व्यासंगी या सर्वांसाठीच अत्यंत उपयुक्त ग्रंथालयाची रचना मनाची एकाग्रता साधण्यासाठी अत्योत्तम.

श्री. वर्षा जोशी कक्ष अधिकारी मराठी भाषा विभाग

ग्रंथ संपदा वृद्धींगत करण्याचे कार्य निःशब्द करणारे आहे.

श्री. भारत सासणे

वाचनालय उत्कृष्ठ आहे. आनंद वाटला.

अनुक्रमणिका

अजून येतो वास फुलांना,
अजून माती लाल चमकते;
खुरट्या बुंध्यावरी चढून
अजून बकरी पाला खाते.

-बाळ सीताराम मर्ढेकर



चित्र : श्वेता पोईनकर, श्री ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय, नवरगाव, जि. चंद्रपूर

युगवाणी

अनुक्रमणिका

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन त्रैमासिक

युगवाणी



वार्षिक वर्गणी : १५० रूपये

पत्ता :
विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

संपादकीय पत्रव्यवहार :
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,
वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी : ९८५०५९३०३०
ई-मेल : srushti_ajay@rediffmail.com
yugwanivss@rediffmail.com

अनुक्रमणिका